नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

ए/मे/जू-जु/ऑ/स-


ऑक्टो, नोव्हें, डिसें-२०११

अनुक्रमणिका


युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

एप्रिल-मे-जून २०११



अनुक्रमणिका



चित्रे : प्रा. विजय रुद्रकार श्रीज्ञानेश चित्रकला महाविद्यालय, नवरगाव

अनुक्रमणिका

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वतीजन्मभू: ॥
मकर संक्रांत १९२३

वर्ष ६१ वे अंक पहिला

एप्रिल / मे / जून २०११

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

संपादक
प्रा. अजय देशपांडे

©विदर्भ साहित्य संघ,नागपूर

मुखपृष्ठ
निवृत्ती बावणे
अंतीम वर्ष, जी.डी.आर्टस्
श्रीज्ञानेश चित्रकला महाविद्यालय,नवरगाव,ता.सिंदेवाही,जि.चंद्रपूर

आतील चित्रे
प्रा. विजय रूद्रकार
श्रीज्ञानेश चित्रकला महाविद्यालय,
नवरगाव,ता.सिंदेवाही,जि.चंद्रपूर

रेखाटने
प्रा. वसंत आबाजी डहाके
प्राचार्य सदानंद बोरकर

अक्षरजुळवणी व मुद्रण
ॲक्टिव्ह कॉम्प्युटर,वणी,जि.यवतमाळ.

मूल्य ४० रूपये

वार्षिक वर्गणी १५० रूपये

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९, २५५३७६७
फॅक्स ०७१२-२२८७९४३, २५४००१४

संपादकीय पत्रव्यवहार
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,
वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com
yugwanivss@rediffmail.com

अनुक्रमणिका

// संपादकीय //

'युगवाणी' हे विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक कसलाही पूर्वग्रह न ठेवता आणि कुठलाही अभिनिवेश न बाळगता नियमित प्रकाशित करण्याचा प्रयत्न यापुढे केला जाईल.

साहित्य, चित्र, शिल्प, नृत्य, नाट्य व संगीत या कलाप्रवाहातील नव्या विचारांचे 'युगवाणी'त स्वागत केले जाईल. ललित लेखनासह समीक्षा, संशोधन व वैचारिक लेखनही 'युगवाणी'त प्रकाशित केले जाईल. भारतीय व जागतिक भाषांमधील नव्या आणि दर्जेदार साहित्याचा अनुवाद यापुढे 'युगवाणी'त असेल. नव्या दर्जेदार, सकस साहित्यकृतींचा साक्षेपी परामर्श घेणारे लेखन 'युगवाणी'तून नियमितपणे प्रकाशित करण्याचा प्रयत्न राहील.




मराठी भाषा आणि वाङ्मय यांच्या संवर्धनार्थ प्रयत्न करीत असतानाच इतर भाषांमधील साहित्य प्रवाह व इतर प्रांतांमधील कलाप्रवाह यांच्या स्थितीगतीच्या नोंदी आणि निरीक्षणे देखील 'युगवाणी'च्या विचारपीठावरून मांडली जातील. साहित्य व कला प्रवाहातील वर्तमानकाळाची स्पंदने टिपताना 'युगवाणी'ला भूतकाळाचे समंजस भान असेल, आणि भविष्यकाळाचा सुजाण वेध घेण्याचे द्रष्टेपण असेल.

'युगवाणी' कोणत्याही एका विचाराचे, गटाचे, समूहाचे, प्रवाहाचे नाही, ते सर्वांचे आहे. 'युगवाणी'ची भूमिका निखळ वाङ्मयीन आहे. निखळ वाङ्मयीन भूमिकेस नख लागू न देण्याचा आणि प्रकाशनातील नियमितता सांभाळण्याचा प्रयत्न यापुढे प्राधान्याने केला जाईल.

प्रारंभी एवढेच !

▮ अजय देशपांडे

अनुक्रमणिका




युगवाणी
विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

अ | नु | क्र | म

अनुक्रमणिका

।। लेख ।।



फिनीशियन सौंदर्यदेवता इस्तरूख्त आणि ग्रेस यांच्या दिव्यात्म प्रेमदेवता

▌डॉ. मधुकर वाकोडे

सांजवेळी मातृवनातून जातांना एखाद्या जुनाट वडाच्या झाडाखाली निखळलेल्या पारावरील शेंदरी तांदळे पाहून आपला जीवन वाराहुरी व्हावा आणि रानफुले पाचोळा तुडवित आपण भारावल्या सारखे देवतांकडे खेचल्या जावे, त्या अद्‌भूत गूढरम्य देवतांचा अंगात संचार होवून समोरच्या मारेपिसांच्या चवरीने त्यांना वारा घालता घालता त्या देवताच मातृरूपातून प्रियारूपात परिवर्तीत झाल्यावर... चकवा बसावा. त्या मंत्रभारल्यास्थितीत

पृथ्वीपल्याडून चंद्रा अल्याडून
ये सांध्यपर्वातली वैष्णवी...

ते पारदर्शी दर्शन घेतांना 'तुझे शरीर मंत्रफूल देहवून वैखरी'संवाद व्हावा... कर्पूरवत कपडे वितळून आपणासही जलसदृश्य नागवेपण प्राप्त व्हावे आणि अंतःसृष्टीतील अतिवास्तवाच्या गूढ व अज्ञात प्रदेशातील मूल्यस्त्रोतांनी

भिजलेल्या आत्म्याने ती शक्तिकेंद्रे तोलून धरावीत असा आत्मानुभव यावा... त्याप्रमाणे ग्रेस यांची काव्यनिर्मितीची सृजनावस्था सतत जाणवते. ग्रेस यांची प्रेमकविता ही रती, सौंदर्यवती नि स्त्री सौंदर्योपासनेची दिव्यात्म अशी शेजारती आहे. त्यांच्याच शब्दात त्यांची आई म्हणजे त्यांच्या प्रातिभिक स्वप्नसृष्टीतील प्रेयसी... त्यांच्या सुख दुःखाचे प्रतीक...त्यांच्या वासनांचे स्मृतीरूप सुंबरान, स्त्री देहाच्या शक्तीचे अंतिम विराट केन्द्र. त्यांच्या कवितेतील सौंदर्यवती ह्या त्यांच्या आईच्या व्यक्तिमत्वतील अस्थीशैलीचे अंशरूपदर्शन घडविणाऱ्या पारदर्शी प्रतिनिधी आहेत. अद्‌भूताचे नि गूढरम्य धुसर वातावरणाचे त्यांना अचाट आकर्षण असल्याने त्यांच्या काव्यातील दुर्बोधता ह्या अद्‌भुताच्या अवतरणामुळे येते असा त्यांचा समज आहे, परंतु त्यांच्या काव्यातील गूढता स्त्री सौंदर्यातील दिव्यात्म आवरणामुळे नि अनावृत पादरर्शीमुळे निर्माण होते.

त्यांच्या काव्यातील दुर्बोधतेला ते रहस्यशरणाची दैवी लिपी मानतात, तर त्यांच्या काव्यातील गूढतेला स्त्री सौंदर्याक्षरतेची आरास मानावी लागेल. खरे तर ग्रेस यांना गूढतेचे विलक्षण आकर्षण आहे आणि म्हणूनच त्यांची कविता स्वप्न आणि वास्तवाच्या द्वैती तणावत सापडलेली असते. ते द्वैती आहेत हे जितके खरे तितकेच ते शाक्त आहेत हे ही खरेच.

मी शाक्तपंथीय, तू स्पर्श द्यावा
स्तनांचा, तरंगून ये वैखरी

स्त्रीचे स्तन त्यांना दैवी इंद्रिय वाटतात कारण त्यांचा देहपिंड प्राक् प्राचीन मातृकालयातील लोकधर्मिय विधीविधानांच्या मूल द्रव्यावर पोसलेला आहे तसाच त्यांचा मनःपिंड मध्ययुगीन सिद्ध साधकांच्या...सुफी सांप्रदायिकांच्या तंत्रसाधनांच्या विचार शैलीवर घडलेला आहे. ही घडण आणि भावन त्यांच्या काव्यनिर्मितीला बळ देणारे द्रावण आहे.

ह्या सौंदर्यदेवता त्यांच्या अंतःस्थ कुलस्वामिनी आहेत तर बहिःस्थ त्यांच्या प्रेमस्वामिनीही आहेत.

कुलस्वामिनी स्त्रग्धरे शाक्त आम्ही
स्तनांच्यापुढे प्रार्थना मांडणे

ही त्यांची आराधना राधाधारा आहे. ग्रेस यांचा कर्मविपाक सिद्धांतावर अतूट विश्वास आहे आणि किती तरी जन्मातील रहस्यांची बिंदुबिंदूनी रांगोळी सजवावी त्याप्रमाणे ते आकृती रेखाटतात. गत जन्मातील भेटलेल्या सौंदर्य देवतांची त्यांना आलेल्या ग्लानीत ते पुनर्भेट घेतात. संगीत आणि संभोग ही स्वत्वविलयाची साधने आहेत आणि यामुळे ईश्वर प्राप्ती साध्य असल्याची त्यांची जाणीव ही सुफी परंपरेतील वाट तुडवितांना दिसते.

तिचे स्तन शृंगारतो माझा भोळा संत

ही ग्रेस यांची उच्चतर स्थिती आहे. त्यांच्या काव्यातील स्त्रीदेहाचे आणि गुप्तागांचे वर्णन हे वासनांचे प्रदर्शन नसून उदात्त असे 'दर्शन' असते.

शिवेपी शक्तिरहित कर्तुमशक्तो न किंचनः

गौरीविना शिवशंकर हतबल तिथे माणसाचा काय पाड ?

शाक्त तांत्रिकांनी देवीच्या मूर्तीतील 'स्तन' आणि 'योनी' हेच अवयव मातृत्त्वनिदर्शक मानले आहेत. मानवी संस्कृतीतील मातृका ही 'आद्यशक्ती' आहे. कन्याकुमारी ते काश्मिर सर्व शिल्पात 'स्तन' उठावदार वर्तुळाकार का आढळतात ? भूमातेच्या देहावरील डोंगर...टेकड्या स्तनाकार का दिसतात ? कारण स्त्रीच्या उत्तान स्थितीचे ते निदर्शक आहेत.

'उत्तानानेव वै योनिर्गर्भविभर्ती'

असा ब्राह्मणग्रंथानीच निर्वाळा दिला आहे. द्रविडपूर्व

भूमीरूप मातृदेवतारूपीच आहे.

जळात जरि नागवी सलग इंद्रियांची दिठी

ग्रेस यांच्या कवितेतील नागवेपण पाण्याचे पारदर्शीपण आहे.

सालिलं सर्व आ इदम् ।

ह्या ऋग्वेदीधारणा म्हणजे लोकधर्मिय जीवनजाणिवा आहेत.

वामा भूला यजेत परम् ।

ह्या वास्तवापोटीच ग्रेस स्त्रीरूपे घेतात... स्त्री सौंदर्यात रमतात, कारण ते मातृदेवतांचे साधक..पूजक नि आराधक आहेत.

सुफी विचार परंपरेत स्त्री सौंदर्यास अढळस्थान आहे. शमुराखिया सुफीपंथानुसार परमेश्वर सुंदर स्त्रियांमध्ये वास्तव्य करतो आणि स्त्री सहवासातच साधक ईश्वराच्या निकट पोहचत असतो. आत्मानंद आणि मदहोशी या सुफी संज्ञांपैकी मदहोशी ही सर्वश्रेष्ठ अवस्था आहे, कारण या अवस्थेत साधकाला स्वतःची जाणीव नसते. ईश्वराशी खरे तादात्म संभोगावस्थेतच साधता येते म्हणून स्त्रीसौंदर्यापासना सुफी विचारधारा अधोरेखित करते. शहावाले उल्ल देहलवी यांच्या विषयी एक दंतकथा प्रचलित आहे. त्यांच्या वडिलांच्या स्वप्नात एक अतिशय सुंदर स्त्री येत असे आणि तिच्याविषयी त्यांना जबदस्त आकर्षण वाटत असे आणि त्यांचा संभोगही होत असे.

भारतीय परंपरेत वज्रयानींनी स्त्री योनीस 'पद्म' मानले आहे. पद्म आणि वज्र यांच्या संयोगास वज्रौसी साधना म्हणूनच मान्यता होती. लोकपरंपेतील 'केळ कमळण असली प्रसूत दुपारी' या सारख्या संकेतावरून किंवा स्त्रियांच्या परवंटालगत भागाला केळ-कमळण का म्हणतात याचा उलगडा होतो.

साठेत्तरी मराठी कवितेत हा अज्ञात..धूसर नि प्राक्प्राचीन प्रदेश न्याहाळण्याची क्षमता ग्रेस यांच्या कवितेत आहे, कारण त्यांची प्रतिभा ही महाकवीची प्रतिभा आहे. महाकाव्य न लिहिताही ते दुःखाची पर्वे उजळत निघतात.

मी महाकवी दुःखाचा प्राचीन नदी परि खोल
दगडाचे माझ्या हाती वेगाने होते फूल...

ही प्रातिभिक नदी कोणती ?

'महाकवीच्या बरगड्यांखालून एक नदी'
वाहत असते. त्या नदीच्या तीरावर
सर्वच्या सर्व सूर्यास्त ओळीओळीने सजत
असतात. वार्तांचे संचित न तपासताच,
त्यांना दूरदूरच्या देशी देवदूतही
वाहून नेत असतात.
महाकवीच्या मिठीत चिमुटभर शुभ्र
रक्षा आणि फक्त
ओंजळभर अंधार असतो.
महाकवीच्या कवितेत, महामायेच्या
स्तनांखाली, अर्भकाच्या
रडण्याचे सूर रेंगाळत असतात...

ग्रेस यांच्या कवितेत महामायेच्या स्तनाखाली ज्या अर्भकाच्या रडण्याचे सूर रेंगाळतात ते अर्भक म्हणजे ग्रेस. ही देखील त्यांच्या शापित शैशवावस्थेतील एक दुःखद दंतकथाच आहे. स्वप्न आणि वास्तवातील हेच द्वैती तणाव या महाकवीच्या काव्यातील ताणेबाणे आहेत.

ग्रेस आणि खलील वृत्तीने फकीर. ग्रेस जसे फकीर तसे संत, आपल्या नागवेपणाविषयी बेफिक्र.

मी वस्त्रच होईन माझे अंगास झाकते संग
नागव्या त्वचेवर फुलतो कनवाळू मी निःसंग

अशी त्यांची शब्दांची आरास मनभावनी.. देखणी आहे.

स.ज.भागवत म्हणतात, 'जडाकडून चेतनेकडे, आधिभौतिकाकडून आध्यात्मिकाकडे जसे जसे जावे, तसतसे ज्ञानाचे स्वरूप विशाल आणि विराट होत जाते, पण त्याची स्वसंवेद्यताही वाढत गेल्यामुळे त्याचे प्रामाण्य दृढावत जाते.' ग्रेस यांची कविता त्यांच्या स्वसंवेद्यतेची साक्षात परिणती आहे. लावण्यवतीने आपली चीर-चोळी शोधण्यासाठी सखी साजणीची मदत घ्यावी त्याप्रमाणे ग्रेस आपले श्रेयस् शोधण्यासाठी पूर्व संचिताचा धांडोळा घेतात.

मुळात ग्रेस यांच्या मनःपिंडावर भयाचा भार फार आहे. विशेषतः सायंकाळची वेळ त्यांना अधिक त्रस्त करतांना दिसते.

मनात भय वाजते
गडद सांज येता घरी

त्यांना सांज सतावते..सादावते तशीच त्यांना कमालीची थकवते.

कुठल्याही संध्याकाळी मला पहा,
मी थकलेलाच दिसतो

कधी त्यांना ही सायंवेळ उदास वाटते... थकलेल्या वृद्धेच्या खिन्न अभंगासारखी तर कधी कातरवेळेला मंगळसूत्रावर हात ठेवणाऱ्या पुरध्रीसारखी. या त्यांच्या आत्मानुभवात वास्तवाचा आंधळा प्रपंच जसा दडलेला आहे तसाच त्या दुःखावर फुंकर मारणारी एक स्वप्नसृष्टी देखील त्यांनी लिलया तोललेली आहे. ते ताणतणाव दुखरे आणि खुपरे आहेत.

पुरंध्री जेव्हा सायंवेळेला पुश्चली च्या मार्गाचे अनुसरण करते तेव्हा भयग्रस्तता शिशूला अधिकच भेडसावते.

असुराणामयं कालः
क्रुराणां दैत्य राक्षसाम्
क्षणमेकं प्रतीक्षस्व प्रदोषे वर्तत प्रिये !

प्रदोष समयी.. सायंवेळी राकावती कृतवीर्याशी हट्टाने रतली परिणामी असूरवसा गर्भी सांभाळणारी ती कुलटा ठरली. ग्रेस अशा बाल्यावस्थेतील भयग्रस्ततेत आईला पर्याय म्हणून संध्यामाईस आपले मानतात. स्थळीळ देवतांची देऊळे मग त्याच्या भयास निवारतांना रंगांचे तरंग उधळणाऱ्या क्षितिजांना निमंत्रित करतात.

संध्याकाळी माझ्या जवळी सर्व देऊळे जमली
तरंग पसरूनी रंग दिशेने क्षितिज उतरते खाली

अंतर्मनातला काळजलेला... काळवंडलेला प्रदेश न्याहाळण्याची नि तो अभिव्यक्त करण्याची ग्रेस यांची तऱ्हा म्हणूनच रसिकांना तऱ्हेवाईक वाटते.

काट्याने काटा काढणे हा हँग ओव्हरवरील जसा एक उपचार तसा ग्रेस यांचा तृषार्ततेवरील उपचार आहे. संध्यासमई कडेवर घेणारी आई नाहीतर नाही, संध्या हीच आता माई...

तू तरीही घेते
मज कुशीत संध्यामाई

या त्यांच्या आत्मिक गरजेपोटी ईस्तरूख्त सारख्या प्रेमदेवता त्यांच्या आंतरिक... मानसिक पोकळीस भरून काढतात. अशा सौंदर्यवतींची ग्रेस यांच्या काव्यसृष्टीतील चहलपहल मोठी वेधक आणि गूढरम्य आहे.

ग्रेस यांच्या कवितेतील सौंदर्यवती तीन पातळ्यांवर संचार करतात. जान्हवी, नर्मदेसारख्या काही देवतामयी, मिथिला, माधवी सारख्या स्नेहमयी, तर मागधी, वैष्णवी, स्त्रग्धरा सारख्या सौंदर्यवती प्रेममयी देवता म्हणून त्यांच्या मानसप्रदेशावर अधिराज्य गाजवितात.

विशेषतः स्त्रग्धरा, मागधी, वैष्णवी आणि वैखरी ह्या मातृका रमणीय... दिव्यात्म आणि आरस्पानी

आहेत. ह्या सौंदर्य देवतांच्या दिव्यात्मतेची आत्मानुभूती ते नोंदवितात. या संदर्भात स्वतःशी संवाद साधतांना ते म्हणतात, ''कलावंत स्वतःचा शोध घेतो म्हणजे नेमके काय करतो ? भूतकाळातील आपल्या चरित्राला वर्तमान काळातील आपल्या आत्मचरित्राचे गुरफटलेले पदर कधी सलग तर कधी विलगच करीत असतो ना? भूत- वर्तमानाच्या या सरमिसळीतून, जर त्याच्या प्रतिभेचा वरदहस्त असेल तर, मला मात्र त्याच्या अनुभवाला अनुक्रमे काव्यानुभव नंतर सौंदर्यानुभव असे परिणाम मिळण्याची शक्यता असते. पुनर्निर्माण या कुळाचे आहे. या सर्व प्रक्रियेत क्रियेत वैचारिक, बौद्धिक किंवा तार्किक प्रक्रिया पूर्णपणे लोप पावलेली आहे असे वाटण्याचा संभव असतो, तसे ते नसतेच. कुठल्याही अनुभवाच्या प्रक्षेपणांत, प्रक्रियेत असा विचार प्रक्रियेचा, तर्कप्रक्रियेचा खरोखरच लोप झाला असता तर सौंदर्यानुभवाला अंतिम मूल्य म्हणून मिरवणारी सौंदर्यसत्ता आजपर्यंत अबाधित राहिलीच नसती.'' 'चंद्र उदयिनी वेळा'तील ग्रेस यांची ही साक्ष उद्धृत करण्याचे कारण त्यांच्या अनुभवाला अनुक्रमे काव्यानुभव व नंतर सौंदर्यानुभव असे परिणाम मिळण्याची जी शक्यता ते वर्तवितात त्यामध्ये आणखीन एक त्यांचा अनुभव जमेस धरावा लागतो... तो म्हणजे दिव्यात्मक व्हीजनचा. ह्या व्हिजनचा परिपाक म्हणजे सौंदर्यदेवतांची निर्मिती.

साठोत्तरी मराठी कवितेत ईस्तरूख्त सारख्या दिव्यात्म सौंदर्य देवतांच्या मांदियाळीचे देणे हे मराठी कवितेतील एक अपूर्व लेणे आहे. त्या सौंदर्यदेवता मिथकरूपात आज वावरत नाहीत हे खरे, पण त्यांच्यात मिथकीय क्षमता मात्र निश्चित आहे. आज त्या प्रतिमारूपात वावरतात कारण ग्रेस यांच्या व्यक्तिगत चेतनेची त्या उपज आहेत. कॉडवेल Myth ला मनुष्याच्या सामूहिक चेतनेची उपज मानतो... एवढाच फरक.

वैष्णवी ही प्रत्यक्षात योनीरूप व्यंजनातील चवथ्या 'त' गटाची अधिष्ठायी वर्णमातृका आहे. आणि सप्तमातृका परंपरेतील मातृदेवताही आहे. मातृदेवता वैष्णवी पुढे ग्रेस आत्मनिवेदन करतांना म्हणतात –

'वैष्णवी'ची पाऊले
मांडताना मी त्या त्या
पाऊलांच्या जागीच
गेलो, नव्हे वैष्णवीने
मला त्या त्या वेळी
आपल्या पाऊल मार्गावर
आणून उभे
केले.''

देवतांची शुभसंकेत म्हणून पाऊले रेखाटण्याची... नववधूची कुंकूम मंडित पाऊले उमटविण्याची धारणा ही लोकजीवनातील जीवनाला उभारी देणारी एक रीत आहे.. मंगल मांडणा आहे. नव्या घरात नव्याने प्रवेश करणारी नवरी ही केवळ गृहस्वामिनी नसते, तर श्रद्धाविश्वात कुळाचार पार पाडणारी उद्याची कुलस्वामिनी ही असते.

वैष्णवी प्रमाणेच स्त्रग्धरा ही देखील ग्रेस यांची स्वप्नगत कुलस्वामिनी आहे. तिची प्रार्थना करतांना –

देहातली धूळ देहात झाकून
एकांत नादातले चालणे,
कुलस्वामिनी स्त्रग्धरे शाक्त आम्ही
स्तनांच्यापुढे प्रार्थना मांडणे.

मातीचाच देह.. मातीचेच आभरण.. अशी ही भूमातृका, ग्रेस यांची कविता बाह्यता वैखरीची देण, अक्षरांची कुळे. पण तिच्यामुळेच त्यांच्या अंतर्मनात 'गवाक्षांतल्या नादनक्षीत ठेवी कुणी अमृताची निनावी फळे', परिणाम दिव्यात्मक अनुभूतीचा.

आता शब्द माझे सुमंदार कविता
कशा ठेवू मी सांग चरणावरी ?

मी शाक्त पंथीय, तू स्पर्श द्यावा
स्तनांचा, तरंगून ये वैखरी

ह्या सौंदर्यवती दिव्यात्मक अशा त्यांच्या प्रिया, मुळातच अशरीरी आहेत. ग्लानीत त्यांचा साक्षात्कार होतो आणि असे भास हेच त्यांच्या निर्विकार सौंदर्यवतींचे साज आहेत.

फुलवुनी कळी पुन्हा । फूल झाले भास ।।
तिच्या संभोगात माझा । दरवळो श्वास ।।

हा भोग घेणारा कुणी भोगी नाही... तर तो आहे एक योगी. हा भोळा योगी ग्रेस यांच्या अंतर्मनातील एक संतच आहे. समुद्राप्रमाणे भारावलेला अस्तगामी सूर्य आणि हाडातल्या वाळवंटी सांडलेला चंद्र यांना झाकण्याचे दैवी सामर्थ्य ते या प्रेमदेवतांच्या एका चुंबनाने प्राप्त करू शकतात. वैखरी, स्त्रग्धरा, वैष्णवी, मागधी ह्या सौंदर्यवती तेजःपुंज आणि भासमान देवता आहेत. त्यांच्या शाक्तपंथीय सौंदर्योपासनेतील साधनीभूत आहेत, एरव्ही त्यांच्यापुढे ते निरागस मुलासारखे आहेत.. ही केवळ ग्लानी आहे.

ग्लानीत भास माझे झाले विदग्ध सत्य
आई तुझ्या मुलातील हा एवढाच संत

संतकुळीचा वसा चालविण्याऱ्या ह्या कवीचे हे सत्यनिरूपण आहे.

ग्रेस यांच्या मातृदेवतांच्या मांदियाळीतील सर्वात तेजस्वी प्रेमदेवता म्हणजे मागधी. एकीकडे नर्मदेच्यासाठी स्त्रग्धरा वाहते तर दुसरीकडे मागधीच्या मागे नर्मदा वाहते.

मागधीच्या मागे नर्मदेचे पाणी
त्याच्या पुढे कोणी जाऊ नये !

अशी ते अपेक्षा करतात. नर्मदा म्हणजे लोकपरंपरेतील हिवंजा कोळीयाची कन्या. साक्षात कोळी रूपातील शिवकन्या. संगमरवराला चिरत जाणारी तिची तलवारीसारखी धार... मागधीची पाठराखण करतांना दिसते.

वरवर पाहता मागधी म्हणजे मगध मधील ती मागधी. गौतमाची जन्मभाषा. त्या भाषेतूनच त्याने धम्मचक्रास गती दिली. वामाचारी बौद्धांनी पुढे सहजपंथाची मांडणी केली. निर्वाणप्राप्तीचे मुख्यसाधन म्हणून त्यांनी स्त्री सौंदर्योपासना प्रतिष्ठित केली. इथे ग्रेस यांच्या अंतर्मनातील माधवीचे खरे स्वरूप कळते. माधवी समोर आपले आर्त प्रकट करतांना जसे ते आद्यशक्तीचे सुंबरान मांडतात, आणि आत्मरूपात शिणलेल्या ईश्वराला अधोरेखित करतात, केवळ ईश्वरच अधोरेखित करतात असे नाही, तर मागधीला आपल्या अंतःर्मनातील खळबळ सांगतात.

मागधी; जगन्मातेच्या
स्तनांवरून, खालीच खाली ओघळणाऱ्या,
लसलसत्या जिभेची शपथ घेवून
सांगतो मी; मी चिरडत जातो
शब्दा शब्दांवर, वाक्यावाक्यांवर
महावाक्याच्या टोकावर....

ही मागधी म्हणजे साक्षात लवलवणारी लालभडक लांबलचक जीभ धारण करणारी महाकाली. त्यांच्या कवितेतील शब्द, वाक्य आणि सिद्धांत, त्यांना किती चिरडतात, या निर्मिति प्रक्रियेची जाणीव इथे होते. त्यांच्या सिद्धार्थ वाणीला या मातृकेच्या गर्भाशयाचे गुणधर्म चिकटून आलेत ह्याची तीव्र जाणीव त्यांना होते.

मातृकांच्या विविध रूपांची मांडणा तीच प्रतिभा करू शकते जी भूस्पर्शी संचितदर्शी प्रतिभा आहे. ग्रेस यांची प्रतिभा आदिम-प्राक्प्राचीन लोकसांस्कृतिक लांच्छनांचा वेध घेते आणि लोकधर्मिय जीवन जाणिवांचा मळवट माळी रेखते. त्यांच्या नादमयी सौंदर्यशैलीस अधिक उठाव देणारी प्राचीन-अर्वाचीन

अनुक्रमणिका

सामग्री पुरविते. या अलौकिक प्रतिभेचे देणे ते आपल्या कवितेत जेव्हा जेव्हा सौंदर्यबद्ध करतात तेव्हा तेव्हा ते प्रसूतिकळेपेक्षा प्रखर अशी मरणकळा अनुभवतात, प्रतिकात्मक पातळीवरील मरणसोहळे लोकधर्मिय विधिविधानांत पार पडतांना दिसतात, पण ग्रेस त्या क्षणी स्वतःला मृत्यूच्या स्वाधीन करीत असल्याचा आत्मानुभव घेत असतात. सृजनवेळी स्वतःला मृत्यूच्या स्वाधीन करणारा हा कवी दुसरे एक जीवन... चैतन्य जन्मास घालतो ही बाब सृष्टीव्यवहारातील काही लोकविलक्षण सर्जनाशी अनुबंध राखते.

भंगर होऊन मोहोळ उठलेल्या पोळ्यातील राणीमाशी आकाशात इतके उंच उड्डान करते की सहस्त्रावधी नरांपैकी एखादाच नर उतुंग झेप घेवून तिच्याशी जुगतो. राणीमाशीने बीज धारण करताक्षणी मात्र नर मरून पडतो... असा लोकसमज आहे. विराट निसर्गातील अशी पुनर्निर्माणातील दिव्यात्मकता जशी अचंबित करणारी तशीच ग्रेस यांची. अशा मरणकळांची त्यांना कवितेतील दुःखवैभवी स्फोटासारखी दाहकता सोसावी लागते.

मागधीच्या जननेद्रिंयातील रसद्रव्य आपल्या जिभेने शोषल्यावर ते असेच पुन्हा पुन्हा मरून पडतात. ज्या जगन्मातेची ते शपथ घेतात त्या महारूद्रा.. महाउग्राने आपल्या गळ्यात नरमुंडमाळाच धारण केलेली असते. मृत्यतून नवनिर्मिती.. विनाशातून पुन्हा विकास हीच खरी दिव्यात्म आरास आहे. ग्रेस यांच्या दिव्यात्म प्रेमदेवता तंत्रमंत्र, विद्याकला आणि दैवी सामर्थ्यांनी परिपूर्ण आहेत. त्या सौंदर्यशालिनी आणि मनस्विनी आहेत. नागवेपणाचे त्यांना विलक्षण वेड आहे. ह्या प्रिया पारदर्शी... आरस्पानी नि अशरीरी आहेत. आणि म्हणूनच ग्रेस यांच्या काव्यातील नागव्या सौंदर्यवती दिव्यात्म वाटतात. हा नागवेपणा नागडेपणा नाही. हा नागवेपणा पाण्यासारखा नितळ नि नागासारखा चपळ आहे.

मग नागवी मी झाले
प्राणरतिचिया चाडा

असा त्यांचा सहज चाळा आहे. त्यांची प्रीतिकविता खरे तर 'प्राणरती कविता' आहे. त्यांच्या प्रियांची स्थितिगतीच कर्पूरवत आहे. आत्म्याचा परमात्म्याशी संयोग हा दैवी योग. मागधी, वैष्णवी, स्त्रग्धरा, वैखरी या सारख्या त्यांच्या प्रेमदेवता दिव्यात्मक मातृका आहेत, म्हणूनच उतराई होण्यासाठी ते पूजा बांधतात, ती जगन्मातेच्या स्तनांची... या मातृकांच्या ओटीपोटी पुन्हा नव्याने जन्म घेण्यासाठी. प्रेमी युगुलांची प्रिय अशी सौंदर्यदेवता ईस्तरूख्त तारूण्य आणि कारूण्य, प्रीती आणि भक्ती, औदार्य आणि सौंदर्याची मूस आहे, तर ग्रेस यांच्या दिव्यात्म प्रेमदेवता सर्जनाची कूस आहेत. ◆◆◆

▌डॉ. मधुकर वाकोडे
अंजनगाव सुर्जी,
जि. अमरावती-४४४७०५
मो. ९४२१८२६८६३





विदर्भातील साठोत्तर कादंबरी : प्रेरणा व स्वरूप

डॉ. किशोर सानप

मराठी कांदबरीच्या समृद्धीत विदर्भातील कादंबरीकारांचे योगदान अनन्यसाधारण आहे. ग्रामीण कादंबरी, आदिवासी कादंबरी आणि शहरी मध्यमवर्गीय जीवन चित्रण करणारी कादंबरी अशा अंगाने विदर्भातील कादंबरीकारांनी मराठी कादंबरीच्या क्षेत्रात आपली कामगिरी बजावल्याचे दिसते. एकट्या विदर्भाचा जरी विचार केला तरी जवळपास तीस महत्त्वाच्या कादंबरीकारांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी लेखनाने मराठी कादंबरीच्या दिशा उजळ केल्याचे दिसते. विशेषतः ग्रामीण कादंबरीकारांनी तर ग्रामीण जीवनाचे आणि बदलत्या ग्रामीण वास्तवाचे सम्यक आकलन मांडणाऱ्या आणि ग्राम समाजाचे सार्वत्रिक प्रश्न कादंबरीत मांडून, एकूणच बदलत्या ग्रामीण आणि अर्ध नागरी जीवन शैलीचा वेध घेत, कादंबरीचा अवकाश समर्थपणे पेलल्याचे दिसते. रूपबंधाचा कच्चेपणा हा एकूणच मराठी कादंबरीच्या संदर्भात चिंतेचा विषय असल्यामुळे विदर्भातील कादंबरीही त्याला अपवाद ठरलेली नाही.

विदर्भातील कादंबरीकारांनी केलेले कादंबरी लेखन हे कित्ता-आवृत्ती गिरवणारे लेखन नसून एकापेक्षा अधिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकांनी प्रत्येक कादंबरीला स्वायत्त आकार दिल्याचे दिसते. काही कादंबरीकार तर एका कादंबरीच्या पुढे लिहू शकलेले नाहीत. त्यात वाईटही काही नाही. कचरावृत्ती निर्माण करण्यापेक्षा एकच समर्थ

कलाकृती निर्माण करून, पुढच्या श्रेष्ठ कादंबरीची वाट पाहात उमेद संपणेही मराठी कादंबरीसाठी उपकारकच मानले पाहिजे. ज्यांनी एकापेक्षा अधिक कादंबऱ्या लिहिल्या त्या वेगवेगळ्या कांदबऱ्या ह्या रूमालबंद आणि पसरट तपशील पुरविणाऱ्या असल्याची तक्रार केली जाते, ती खरी असून विदर्भातील कादंबरीने पारंपरिक रूपबंधाचे कुंपण ओलांडल्याचे दिसत नाही. विदर्भातील कांदबरीकारांच्या मर्यादा मान्य केल्या तरी एकूणच मराठी कादंबरीच्या प्रांतात विदर्भातील कादंबरीकारांनी आपला दबाव गट निर्माण केला आहे, हे सत्यही नाकारता येणार नाही. नामदेव कांबळे, सदानंद देशमुख, आशा बगे यांना सर्वोच्च साहित्य संस्था-साहित्य अकादमीने पुरस्कृत केले आहे आणि रवीन्द्र शोभणे तसेच रमेश इंगळे उत्रादकर यांना महाराष्ट्र फाउंडेशनचे पुरस्कार मिळाल्यामुळे ह्या पाच कादंबरीकारांनी विदर्भातील कांदबरीचे स्वायत्त आणि स्वयंभूपण जोपासल्याचे दिसते.

विसाव्या शतकातील सन १९६० हे मराठी साहित्यविश्वात वास्तववाद आणि देशीयतेचे मूल्य वाङ्मयात रूजविणारे आणि साक्षात लेखकांवर मूल्यदबाव निर्माण करणारे वर्ष मानले तर विदर्भातील सन १९६० ह्याच परिवर्तनवर्षात उद्धव शेळक्यांच्या धग कादंबरीने जोमदार प्रारंभ केला. 'धग' ही मराठी कांदबरीतील ऐतिहासिक अशी वास्तववादी मूल्याची सुरूवात करणारी कादंबरी मानली जाते. जीवन आणि साहित्याचा एकास एक अनुबंध मानणारी आणि जीवनालाच साहित्यरूप देणारी ही मराठीतील मौलिक ग्रामीण वास्तववादी कादंबरी आहे. 'धग' मधली कौतिक ही वैदर्भिय ग्रामीण नव्हे तर एकूणच महाराष्ट्रातील-हिंदुस्थानातील ग्रामीण जीवनातील दुःखाचा पहाड तोलून धरीत, आपल्या कुटुंबाला जगवणारी आणि दुःखातून बाहेर काढण्याच्या प्रयत्नात झिजणारी प्रातिनिधिक ग्रामीण स्त्री आहे, असे म्हणायला हरकत नाही.

पुढे सन १९६३ मध्ये मनोहर तल्हारांनी 'माणूस'ची निर्मिती करून विदर्भातील ग्रामीण-नागरी-अर्धनागरी जीवनातील हिंदु-मुसलमान अशा सर्वधर्मसमभावाने एकाच समाजात जगणाऱ्या निम्न स्तरातील रीक्षा-टांग्यावाल्या मोलमजूरी करणाऱ्या श्रमकरी लोकांच्या जीवनाचे वास्तव रेखाटले आहे. 'धग' आणि 'माणूस' या कादंबऱ्यांनी कधी नव्हे त्या खेड्यापाड्यातल्या कष्टकरी स्त्री पुरूषांना नायकत्व देऊन अभिजात नायकांची श्रीमंती परंपरा लयास गेल्याचे पहिल्यांदा वाचकांच्या निदर्शनास आणून दिले. ह्याच दरम्यान निम्न स्तरातील जीवन जगणाऱ्या समाजातून शेतकरी-वारकरी-श्रमकरी-मजूर आदी तळागाळांतून मुलं-मुली शिक्षण घेत आपल्या भाषिक अस्मितेसह आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करीत, संस्कृती आणि बोलभाषेचे मौलिकत्त्व जाणून घेत होते. जगण्याचे वास्तव आणि साहित्यातले वास्तव एकच असावे, असा आविष्कार पहिल्यांदा शेळके-तल्हार यांच्या पिढीने केल्यामुळे विदर्भातील ह्या कादंबरीकारांनी एकूणच मराठी कादंबरीला वास्तववादी आणि जीवननिष्ठ नैतिकतेचे वळण लावले. वाङ्मयातील नैतिकतेच्या मूल्यांची पायाभरणी केली. तुलनेत बाजीराव पाटलांनी 'भंडारवाडी' कांदबरीची निर्मिती केली, परंतु कल्पित आणि रंजनवादी आशयनिष्ठांमुळे 'भंडारवाडी'ला 'धग' आणि 'माणूस'ची उंची गाठता आली नाही. तृष्णा हे दुःखाचे मूळ असल्याचे लक्षात घेतले तरी सर्वसामान्यांच्या जीवनातील दुःखे ही तृष्णेशिवायही रोजच्याच जगण्याच्या व्यवहारांतून-कलहांतून निर्माण होतात आणि ती पुढे विराट रूप धारण करीत जगण्यालाच शोषून घेण्याचा प्रयत्न करतात. 'धग' आणि 'माणूस'मधली जीवन-दुःखे ही अशी सर्वसामान्यांच्या जीवनातील सर्वांच्या परिचयाची आणि अनुभवाची असल्यामुळे, 'धग'-'माणूस' ह्या

कादंबऱ्यांना मराठी कादंबरीच्या अग्रस्थानी जाता आले.

शेळके-तल्हार-बाजीराव पाटील हे विदर्भातील कादंबरीचे प्रतिभ. आशयाच्या सशक्तपणावरच त्यांची अधिकाधिक भिस्त होती. मराठी कादंबरीच्या रूपबंधाचा परंपरागत साचा कायम ठेवून त्यांनी कादंबरी लेखन केले म्हणून आणि रूपबंधाच्या नवतेचे भान त्यांना पेलता न आल्यामुळे पुढे भालचंद्र नेमाडेंची 'कोसला' ही मराठी कादंबरीत आशय आणि रूपबंधाचे नवे भान जागविणारी कादंबरी म्हणून मान्यता पावली. आशय निर्मितीच्या नवतेवर आणि जीवनसदृश्य वास्तवनिष्ठांवर 'धग'-'माणूस'चे महात्म्य सिद्ध झाले तर आशयनिष्ठेतील देशीयतेवर आणि जीवनसदृश्य वास्तवनिष्ठेला रूपबंधाचे नवे भान; देशीय, वारकरी-महानुभाव, फुले-चिपळूणकरी-राजवाडे शैली आणि बोली भाषेची क्षमता वापरून, 'कोसला'चा परिणामकारक रूपबंध नेमाडेंनी निर्माण केल्यामुळे; नेमाडे हे मराठीतील साठोत्तर कादंबरीकारांना दिशा देणारे मार्गदर्शक आणि मीमांसक ठरले. नेमाड्यांचा वास्तववाद हा जीवनाची समग्रता व्यापणारा वास्तववाद असल्यामुळे साठोत्तर कादंबरीकरांना तो दीपस्तंभासारखा आकर्षित करणारा ठरला. नेमाडेंना अपेक्षित असलेला वास्तववाद हा आशयाच्या दिशा रूंदावणारा होता. परंतु रूपबंधाचे समग्र भान मात्र कादंबरीकारांना पुढे पेलता आले नाही आणि 'कोसला'सारखी कादंबरी अपवाद ठरली. पुढे केवळ रूक्ष-तपशीलवजा ढिगारे उपसणाऱ्या कादंबऱ्यांची मात्र निर्मिती वाढली आणि आशय आणि रूपबंधाचा एकास एक तोल सांभाळणे एकूणच मराठी कादंबरीकारांना पेलवले नाही. परिणामतः मराठी कादंबरीत उत्तुंग अशा शिखर गाठणाऱ्या कादंबऱ्यांची निर्मिती झाली नाही आणि त्यामुळे मराठी कादंबरीच्या विकासाच्या दिशा खुंटत गेल्याचे चित्र अधिक ठळक होत गेले.

विदर्भातील कादंबरी ही प्रामुख्याने कृषिसंस्कृती आणि वऱ्हाडी बोली भाषेच्या वापरातून विदर्भाची स्वतंत्र अस्मिता जोपासत निर्माण झाल्याचे दिसते. सुरेश द्वादशीवार - आशा बगे आणि काही नागरी-मध्यमवर्गीय लेखकांचा अपवाद वगळता तर विदर्भातील कादंबरी तिच्या ग्रामीणतेच्याच वैशिष्ट्यांनी मराठीत ओळखली जाते. विदर्भाचा प्रदेश, तिथल्या बोली भाषा आणि खेड्यापाड्यांतून जगणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या-ग्रामीण-अर्धनागरी संस्कृतीच्या आपल्या स्वतंत्र खूणा सांगत, विदर्भातील खेड्यापाड्यांतून शिक्षित झालेल्या आणि पुढे साहित्याच्या प्रांतात उमेदवारी करणाऱ्या लेखकांनी साहित्याची निर्मिती केली. उद्धव शेळके ते आजच्या रमेश इंगळे उत्रादकरांपर्यंत कादंबरीकारांची परंपरा सशक्त दिसून येते.

ग्रामीणता हे आशयिक विशेषण असले तरी ग्रामीणता हाच खरेतर मराठी समाज जीवनाचा मूलभूत घटक आहे. भारतीय समाजाच्या केंद्रस्थानी कृषिसंस्कृती असल्यामुळे ग्रामीणता हे मूल्य मानावे लागते. कृषिव्यवस्थेशी निगडित असलेल्या मानवी आणि मानवेतर व्यवस्थेच्या मूलभूत प्रेरणांचा अंतर्भाव ग्रामीणतेत होतो. स्थलावकाशाच्या परिघात तिथल्या ग्रामीण जीवनाची आणि संस्कृतीची जडणघडण होत असते. संक्रमणकाळातही देशीय संस्कृतीत असलेल्या अस्मिता घटकांमुळे नागरी संस्कृतीच्या दडपणातही आपले स्वयंभूपण जपण्याची शक्ती ग्रामीणतेत असते. ग्रामीणतेला अपेक्षित असलेले आशय मूल्य सर्व सामाजिक संदर्भांसह कादंबरीतून प्रकटत असते. ग्रामीणता हे आशय मूल्य ग्रामीण भाषेच्या सूक्ष्म छटांसह अभिव्यक्तीच्या तंत्रांना ग्रामीणतेचा संदर्भ देत, कादंबरीकार कादंबरीचा अवकाश भरून काढत असतो. सन १९८० नंतर विदर्भातील ग्रामीण कादंबरीकारांनी एकाहून एक सरस आणि सशक्त आशयद्रव्य मांडणाऱ्या कादंबऱ्यांची निर्मिती केली. बाबाराव मुसळ्यांची

'हाल्या हाल्या दूधू दे' सन १९८५ मध्ये प्रकाशित झाली. वाशिम भागातील एक खेड्यात अन्यायाने पिचली जाणारी ग्यानबा-आनसासारखी शेती करणारी माणसं प्रचंड दुःखाचं ओझं पेलूनही जगण्यासाठी अखेरपर्यंत संघर्ष करतात. 'धग' मधल्या कौतिकचे कालसापेक्ष रूप म्हणून आनसा या कादंबरीतून समर्थपणे उभी राहाते. वऱ्हाडातल्या शेतीवर उपजीविका करणाऱ्या माणसांची ससेहोलपट कालपरिवर्तनासह या कादंबरीतून व्यक्त झाली आहे. 'पखाल' (१९९५) ही बारा बलुतेदारांपैकी कोळी समाजाच्या पखालीने पाणी भरण्याच्या बलुत्यावर आधारलेली कादंबरी आहे. नव्या युगात बलुतेदारीचे सर्वंच व्यवसाय मोडकळीला आले परंतु जुन्या जमान्याच्या व्यवसाय संस्कृतीशी कायम जुळलेली माणसं मात्र मोडतील पण वाकणार नाहीत अशाच वृत्तीची असतात. 'पखाल' मधला पुंजा हा असाच ठसनी आणि सनकी माणूस. गिरजा ही जणू दुसरी कौतिकच. नव्या पिढीचा दगडू आणि त्याची पत्नी आणि बाप-लेकांत होणारा संघर्ष आणि आर्थिक ताणतणावात पुंजा-गिरजा गुरफटतात. दुःख आणि ताण यांच्या असह्य चटक्यांनी पोळून निघाल्यावरही मूळचा स्वाभिमानी पिंड सुटता सुटत नाही. माणुसकीशी कुठेही तडजोड करायला ही माणसं कधीच तयार होत नाहीत. अशा संस्कृती संक्रमणाच्या अभिसरणाची शोकात्मता व्यक्त करणारी ही कादंबरी एका उंचीला पोहोचते. आशय आणि अभिव्यक्तीची तंत्रे पारंपरिक रूपबंध विणत असली तरी रूपबंधाची विण घट्ट जाणवते. बाबाराव मुसळ्यांची 'वारूळ' (२००४) ही कादंबरीही नामदेव कांबळेंच्या परिसरातील मांग समाजाच्या सामाजिक प्रगतीच्या आंदोलनाची पार्श्वभूमी लक्षात घेत, परभू या प्रगतिशील मांग नवनायकाची निर्मिती करणारी आहे. 'वारूळ' चा अवकाश मोठा आहे. गाव, गावकी, भावकी, परंपरागत जातिसंघर्ष, धर्म, अर्थ, शिक्षण, समाजकारण, राजकारण, विकासाच्या सरकारी योजना, समाजकारण आणि राजकारणातले स्वार्थांध, आधुनिक काळात नव्यानं आकाराला येणारा मानवतावाद, छुपा जातियवाद, गावागावातलं सडकं राजकारण आणि त्यातून आकाराला येणारी बिभत्स हिंसा आदिंचा विचार करीत करीत बाबाराव मुसळे यांनी मातंग समाजाच्या दोन पिढ्यांचे चित्रण, 'वारूळ' कादंबरीतून केल्याचे दिसते. मातंग समाजाच्या परिवर्तनाची गाथाच बाबाराव मुसळे यांनी या कादंबरीतून समर्थपणे मांडली आहे.

सन १९८७ मध्ये पुरूषोत्तम बोरकरांची 'मेड इन इंडिया' ही कादंबरी प्रकाशित झाली. आशय आणि रूपबंधाचे नवे भान या कादंबरीने जागवले. या कादंबरीने बदलते ग्रामीण जीवन आणि त्यात युवकांची होणारी गोची अत्यंत तीव्र आणि काव्यात्म शैलीने संमिश्र अशा भाषिक शैलीची नवनिर्मिती करून व्यक्त केली आहे. 'कोसला' शैलीशी साम्य असलेली परंतु वऱ्हाडी भाषेचे स्वतंत्र अस्तित्वभान जोपासणारी प्रयोगसिद्ध निर्मितीक्षम असलेली नवनवोन्मेषशाली शैलीचा आविष्कार करणारी कांदबरी म्हणून-देश्य शैलीचा वस्तुपाठ-म्हणून 'मेड इन इंडिया' कादंबरीकडे पाहावे लागते. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण संस्कृतीने जे अपभ्रंशाचे रूप साकार केले त्यातल्या विकृती-विसंगतींसह लेखकाने आपल्या जीवन-जाणिवांच्या प्रतिक्रियांसह या कादंबरीतून आत्मनिवेदन केले आहे. पंजाबराव साहेबराव गरसोळीकर पाटील हा गरसोळी खुर्दच्या निमित्ताने भारतातील बदलत्या खेड्याचे जिवंत चित्र साकार करतो. 'मेड इन इंडिया' या शीर्षकापासूनच या कांदबरीच्या नवतेचा प्रवास सुरू होतो. एका खचत चाललेल्या गढी संस्कृतीची, संक्रमणावस्थेतून प्रवास करणाऱ्या खेड्याची, शहरी संस्कृतीने गिळू पाहणाऱ्या व अधांतरीच गुदमरू पाहणाऱ्या ग्रामीणतेची, विसंगती आणि विरोधाची, मानवी जीवनातील सूक्ष्म ताण्याबाण्याची तीव्र आणि उत्कट भाषिक शैलीचा

प्रयोग करीत समग्र ग्राम जीवनाला आपल्या अवकाशात घेणारी ही कांदबरी आहे. अनेक कांदबऱ्या निर्माण होऊ शकतील एवढे विषय या कांदबरीकाराने एकाच कादंबरीत हाताळले आहेत. फेअरफॅक्स ते बोफार्स, टीव्ही इडियट बॉक्सचे आक्रमण, आकाशवाणीची बदललेली दुनिया, गावातले घाणेरडे राजकारण, जागतिक उलाढालीचा डायरेक्ट गावावर होणारा परिणाम, अणुबॉम्ब, क्रिकेटचं वेड, सिनेमाचा प्रभाव, प्रशासनातील गलथानपणा, भ्रष्टाचार, दारू-जुवा ही व्यसनं, कलाक्षेत्रातील गमती जमती, शेतकरी संघटना आणि विफलता, परिसरातील मानव-मानवेत्तर सृष्टी, व्यक्ती आणि वल्ली, गावातील लोकांच्या वृत्ती-प्रवृत्ती-अपप्रवृत्ती, रूढी आणि परंपराग्रस्त जीवन, सांस्कृतिक संक्रमण आणि भाषेवर होणारा परिणाम आणि त्यातून नव्याने उदयाला येणारी बोली भाषा आदी जीवनांगे 'मेड इन इंडिया'त लेखकाने साकार करून; कादंबरीच्या विस्तृत अवकाशाला रूपबंधाच्या सक्षम घटकांनी पेलून एक नवाकोरा रूपबंध साकार केला आहे. 'कोसला' नंतर नवनिर्मित रूपबंधाच्या संदर्भात 'मेड इन इंडिया'चा उल्लेख करावा लागतो. 'मेड इन इंडिया' ग्रामीण कांदबरीच्या विकासाचे खरेतर प्रारूप ठरायला हवे होते, एवढी ती सक्षम अशी सामाजिक आणि नैतिक कृती आहे. अस्सल देशीय कृती आहे.

कवी आणि लेखक-कांदबरीकार असलेल्या रमेश इंगळे उत्रादकरांची 'निशाणी डावा अंगठा' (२००५) त्यांच्या नैतिकतेची-प्रमाणिक निर्मितीची साक्ष आहे. कांदबरीच्या निर्मितीत अनेक उणिवा असल्या, तरी कलाकृतीच्या निर्मितीमागील मूल्यभाव-समर्थ आणि नैतिकतेचा कस व्यक्त करणारा आहे. रमेश इंगळे उत्रादकरांची मूळ प्रकृती कवीची असली, तरी कांदबरीसारखा विस्तृत अवकाश असलेला गद्य-वाङ्मय प्रकारही त्यांनी नीट हाताळलेला आहे. कवी प्रकृतीचे लेखक कादंबरी सुद्धा कवितेसारखीच लिहितात. कांदबरी की कविता ? असा वाचकांचा गोंधळ त्यामुळे उडतो. सुखदेव ढाणकेंची 'चेडा', विठ्ठल वाघांची 'डेबू' ही काव्यमय कादंबरीची उदाहरणे आहेत. रमेश इंगळेंच्या बाबतीत मात्र अशी गल्लत जाणवत नाही. विशेषतः प्राथमिक शिक्षक म्हणून समाजात जगतांना होणारी सार्वत्रिक गोची जशी लेखकाने अधोरेखित केलेली आहे, तसेच उच्च शैक्षणिक ध्येय गाठण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या नवसाक्षरता अभियानाचे विकृत आणि भयकारी वास्तव लेखकाने ह्या कांदबरीच्या गाभ्यातून मांडलेले आहे. 'निशाणी डावा अंगठा' या कांदबरीच्या रूपबंधाचे खास वैशिष्ट्य असे आहे की, लेखक एकूणच कथाभागाला-व्यक्तिदर्शनाला-घटनाप्रसंगांना आणि इतरही सर्व रूपबंधाच्या अवकाशांना कमालीच्या नाट्यमयतेने एका विशाल नाटकाच्या - तमाशाच्या रूपात सादर करतो. विनोद-उपरोध-उपहासाच्या ढंगातून ही सर्व मांडणी होत असल्यामुळे, जीवनाच्या एका नाजूक भागाची शल्यचिकित्सा करीत लेखक जीवनातले एक जीवघेणे-नकोसे असलेले-अवघड जागीचे दुखणेच जणू वाचकांसमोर मांडत आहे, असेही वाटते. लेखक हा साने मास्तरांच्या वंशावळीशी नाते सांगत, मास्तरांच्या मूल्यविचारांची नकळत सबंध कादंबरीच्या रूपबंधातून पेरणी करतो. मूल्यभावांचा प्रभावी प्रचार-प्रसारही त्यामुळे साधला जातो. हे सर्व साधतांना तो नाटकीपणा आणि आदर्शांच्या अनाठायीपणाला बळी पडत नाही, हेही या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. साक्षरता अभियानाचे वास्तव आणि विकृत नाट्य उभे करतांना लेखक बरेचदा पात्रांच्या समग्रतेकडेही दुर्लक्ष करतो. रूढ अर्थाने ह्या कांदबरीचे कथानक चिंचोळे आहे. जवळजवळ कथानक नसलेलीच ही कादंबरी आहे. पूर्णवेळ कार्यकर्ता असलेला तरूण प्राथमिक शिक्षक रंभा डुकरे हाच या कादंबरीचा सूत्रधार नायक आहे असे वाटत असतांनाच, तो गायब होतो

आणि प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बंडू भावडा राठोड उर्फ भाऊसाहेब यांचेच व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर अधिकाधिक गडद होतो जाते. साक्षरता अभियानासाठी पूर्णवेळे कार्यकर्ता झाल्यावर डुकरेची उडालेली झोप आणि अभियानाची अमंलबजावणी करून घेण्याची जबाबदारी असलेले मुख्याध्यापक राठोड, ही दोन पात्रे खरेतर सूत्रधार पात्रे आहेत. ह्या दोघांच्या निमित्ताने संपूर्ण अभियान राबविणारे शिक्षक-अधिकारी-निरक्षर-गावकरी आदींच्या जीवनातले त्यांना नकोसे झालेले नाट्य लेखकाने उभे केले आहे. हे सर्व करतांना अत्यंत सूक्ष्म असा तपशीलही लेखकाने विस्ताराने कादंबरीच्या रूपबंधात भरला आहे. अनेक ठिकाणी तपशीलांचा विस्तार कंटाळवाणाही होतो. अनेक ठिकाणी तपशीलात येणारी कलात्मकता, काव्यात्मता कृत्रिमही वाटते. तपशीलांची मांडणी करतांना लेखक जाणीवपूर्वक शैली घडवतो आणि तरी त्यातून जाणवण्याइतकी कृत्रिमता निर्माण होत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे कादंबरीचा आणि कादंबरीकाराच्या बैठकीचा कणा अत्यंत मजबूत आणि अनुभवाधिष्ठित आहे. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर मराठी कादंबरीने भक्कमपणे पाऊल रोवल्याचे खास उदाहरण म्हणून या कादंबरीकडे पाहाता येते.

सन १९९० नंतर मात्र बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे आणि रवीन्द्र शोभणे या कादंबरीकारांनी विदर्भातील भिन्न परिसरातल्या बदलत्या ग्रामीण जीवनाचे आणि जातिजमातींचे वास्तव चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचे लेखन केलेले आहे. रवीन्द्र शोभणे यांनी नागपूर जिल्ह्यातील काटोल नजिकच्या नरखेड भागातील शेतमजुरांच्या जीवन संघर्षाचे चित्रण 'कोंडी' (१९९२) कादंबरीतून केले आहे. सन १९९३ साली नामदेव कांबळे यांची वाशिम जिल्ह्यातील एका खेड्यातील मांग समाजात जन्मलेली आणि गावकुसाबाहेर जगणारी, नवऱ्याच्या मृत्युनंतर जिद्दीने आपल्या रघू व इतर मुलांना शिक्षित करून संस्कारित करणारी आणि गावगाड्याशी जुळवून आपल्या संसाराचं ओझं समर्थपणे आणि स्वाभिमानाने पेलणारी वालंबी आणि तिचा आंबेडकरी विचारांचा कृतिशील मुलगा रघू यांच्या जीवन संघर्षाचं चित्रण करणारी कादंबरी 'राघववेळ' (१९९३) आणि पुढे हाच जीवन संघर्षाचा धागा पुढे रेटणाऱ्या 'ऊनसावली' (१९९७) आणि 'सांजरंग' (१९९९) ह्या कादंबऱ्या लिहिल्या. मांग आणि सवर्ण संघर्ष, गावकुसाबाहेरचे लाजिरवाणे जगणे, गावातल्या लोकांचा पाहण्याचा शोषक-टाकाऊ दृष्टिकोण, आंबेडकरी चेतना आणि मांग समाजातील परिवर्तनाचे वारे, शिक्षण आणि प्रगतीची वाट चोखाळतांना वालंबी आणि रघूला आपल्याच समाजाशी करावा लागणारा जीवघेणा संघर्ष, मांग आणि दलितांमधले वाद आणि त्याचा एकूणच समाजाच्या प्रगतीवर होणारा परिणाम-अशा अनेक अंगाने नामदेव कांबळेंनी आपल्या कादंबऱ्यांतून उपेक्षित-दुर्लक्षित परंतु समाजाच्या मुख्य प्रवाहात येणाऱ्या मांग समाजाच्या लोकजीवनाचे आणि लोकसंस्कृतीचे चित्रण करून मराठी कादंबरीचा प्रांत समृद्ध केला आहे.

सदानंद देशमुख यांच्या 'तहान' (१९९८) आणि 'बारोमास' (२००२) या कादंबऱ्यांनीही मराठी कादंबरीत एक नवे पर्व सुरू केले. आशयाच्या अंगाने त्यांच्या दोन्ही कादंबऱ्या सशक्त आणि अनुभवाधिष्ठित आहेत. ते स्वतः शेतकरी असल्यामुळे विसाव्या शतकातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेतकऱ्यांच्या कुटुंबाची वाताहत आणि बदलते नव वास्तव हे आशयविश्व त्यांच्या कादंबऱ्यांचे केंद्र आहे. खेड्याचे जीवनमान आणि शहरातले नागरी जीवनमान अलीकडच्या काळात समानतेच्या पातळीपर्यंत पोहचण्याची स्पर्धा करताना दिसत आहे. खेड्यातल्या आजच्या तरूणांच्या बदलत्या वास्तवाचे समकालीन चित्रण करण्याचा प्रयत्न सदानंद देशमुखांनी 'तहान'

अनुक्रमणिका

(१९९८) आणि 'बारोमास' (२००२) या कादंबऱ्यांतून केला आहे. खरेतर 'बारोमास' ही 'तहान'पेक्षा वेगळी आणि कांदबरीचा अवकाश समर्थपणे पेलणारी कांदबरी आहे. 'तहान' मधला कथालेखक 'बारोमास' मध्ये खऱ्या अर्थाने एक सशक्त कादंबरीकार म्हणून पुढे आला आहे. 'बारोमास' या शीर्षकापासूनच शेतजमिनीशी आपली नाळ बारोमास जुळवून ठेवत शेतीच्या जीवनातील बारोमास सतावणाऱ्या वेदना आणि समस्यांचे प्रत्ययकारी चित्रण आपल्या कादंबरीतून केलेले आहे. शेतीशी आणि मातीशी तिच्या सृजनाचे आणि नवनिर्मितीचे दरवर्षीचे उत्सव पाहतांना कधी शेतकऱ्याच्या डोळ्यातून दुःखाचे अश्रू वाहतात तर कधी आनंदाश्रूही वाहतात. शेतकऱ्याच्या जीवनाचं सोनं करणारी शेती बेभरवशाचा निसर्ग आणि सरकारच्या धोरणामुळे तसेच विश्वव्यापारामुळे-गॅट करारामुळे किंवा बदलत्या समाजव्यवस्थेमुळे संपूर्ण उजाड झाली आहे. आता शेतकऱ्यांची सधन घराणीही रसातळाला पोहोचलेली आहेत. ज्यांच्या घरात बारोमास अन्नधान्यानं भरलेल्या कणग्या असायच्या, बारोमास दुधाची गंगा वाहायची, बारोमास शेतीचं वैभव घरात नांदायचं आणि बारोमास घरात पैसाही खुळखुळायचा. ती सर्वच सधन घराणी आता कृषिरत्न पुरस्कार घेणाऱ्या रावसाहेब-नरूभाऊंसारखी आणि सुभाना तनपुरेंसारखी कमालीची दरिद्री आणि कर्जबाजारी झालेली आहेत. भारतीय शेती आणि शेतकरी आता पुरेपूर कंगाल आणि स्पर्धेच्या बाजारपेठेत कायमचा दिवाळखोर झालेला आहे. शेतकऱ्यांची सर्वदूर विपन्नावस्था झाल्यामुळे शेती विकणे, ओसाड पडणे, खेड्यांची शहरं होणे आणि शेती विकून नोकऱ्या मिळवण्यासाठी देणग्या देणे, शेतीचे कायम असुरक्षित जीवन त्यागून किंवा शेती करणाऱ्या बापाचे हालहाल पाहून शेतीचा तिटकारा करणे किंवा त्यागच करणे, ही भावना नव्या पिढीच्या मनात खोलवर आकाराला आलेली आहे. हा सर्व परिस्थितीचा रेटा शेतीवर जीव लावणाऱ्या सुभानाला आणि रावसाहेबांना आत्महत्या करण्यास शेवटी प्रवृत्त करतो. 'बारोमास' ही आजच्या शेतीयुगाशी निगडित असलेल्या शेतकऱ्याची आणि खुद्द शेतीचीही करूण शोकगाथा आहे. शेतकऱ्याच्या जीवनाचे आजचे -समकालीन वास्तव आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या शोधाची करूण कहाणी 'बारोमास' या कादंबरीतून सदानंद देशमुखांनी मांडली आहे. ग्रामजीवनाशी समरस झालेल्या आणि शेतकऱ्याचा मुलगा असल्यामुळे आपल्या शेतकरी बापाची दुर्दशा पाहून अस्वस्थ झालेल्या लेखकाने आपल्याच लोकांचं आणि मातीचं दुःख 'बारोमास'मधून समर्थपणे मांडलं आहे. या कृतीला लेखकाची खास नैतिक बूज मिळाल्यामुळे 'बारोमास' ही एकूणच मराठी ग्रामीण कादंबरीत शेतकऱ्यांच्या जीवनाचे कटुसत्य मांडणारी लक्षणीय सामाजिक कृती आहे.

'मेड इन इंडिया', 'तहान', 'कोंडी', 'बारोमास' या कादंबऱ्यांत बदलत्या ग्रामीण जीवनात तरूणांची जी कोंडी होतांना दिसते, त्याचे प्रातिनिधिक चित्रण आढळते. 'कोंडी'तला वसंता, 'मेड इन इंडिया'तला पंजाब, 'तहान' मधला बबन, 'बारोमास' मधला एकनाथ ग्रामीण जीवनातले बारकावे टिपणारे आणि त्यावर आपल्या परखड प्रतिक्रिया देणारे नायक आहेत. ग्रामीण व्यवस्थेत जगतांना अनेक ताणतणाव त्यांना सहन करावे लागतात. काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे याबाबत त्यांच्या मनात कधी संभ्रम असतो तर कधी स्पष्टताही असते. नागरी जीवनाची ओढ कधी प्रचंड असते तर कधी त्यांचं समग्र अस्तित्त्वच गांगरून टाकणारी असते. पंजाबच्या तुलनेत वसंता बबन आणि एकनाथ मात्र अभावग्रस्त कुटुंबात जन्मलेले नायक आहेत. परिस्थितीशी जुळवून घेतांना त्यांना अनेक कष्ट सोसावे लागतात. त्यांच्या मुळातल्या चांगुलपणाची कदर होत नाही म्हणून व्यवस्थेचा त्यांच्या

मनावर सतत दबाव येतो. मार्ग सापडत नाही म्हणून 'कोंडी'मध्ये वसंता गावाच्या विरूद्ध बंडखोरी करतो तर 'तहान'मध्ये बबन घर सोडून निघून जातो. एकनाथ शेवटी शेतकरी संघटनेचा सक्रिय कार्यकर्ता होण्यात धन्यता मानतो.

प्रतिमा इंगोले यांनीही 'बुढाई' (१९९९), 'पार्टटाईम' (२००२) या दोन कादंबऱ्यांची निर्मिती करून विदर्भाच्या ग्रामीण कादंबरीत ग्रामीण स्त्रीवादाची मुहूर्तमेढ रोवली. प्रतिमा इंगोले ह्या मूळ कथाकार असल्यामुळे त्यांच्या 'बुढाई' कादंबरीचे कथाबीजही लघुकथेएवढेच चिंचोळे आहे. खेड्यातून शहरात येणाऱ्या केवळ एकाच कुटुंबाचे विस्तारपूर्वक चित्रण 'बुढाई'त आले आहे. एका कुटुंबाचेही विस्तृत चित्रण करून सबंध समाजाच्या संदर्भात विविध पात्रानिशी आशयाचे रूप विस्तारता आले असते. गोकर्णा एका खेड्यातील मोलमजुरी करणारी स्त्री आहे. तिच्या मनात माणूसपण जपणाऱ्या स्त्रीचे भावगर्भ विश्व सामावलेले आहे. ती ज्या गावात आपल्या भावकीत गुण्यागोविंदाने नांदते त्या गावकी आणि भावकीचे अत्यंत त्रोटक चित्रण कादंबरीतून पुढे येते. गाव स्वतंत्रपणे उभे राहायला हरकत नव्हती. गावाच्या संदर्भातच गोकर्णाच्या आणि लुकळा महाराच्या जगण्याला आणि धडपडीला अर्थपूर्णता आली असती. 'पाटटाईम' ही 'बुढाई' नंतरची दुसरी कांदबरी असल्यामुळे आणि स्त्री जाणिवेच्या अंगाने ही कादंबरी साकारत गेल्यामुळे नोकरी करणाऱ्या स्त्रियांना रोजच्या आयुष्यात सामोरे जाताना त्यांचे स्वतःचे आणि सामाजिक असे विविध प्रश्न, अशा अनेक बाजू प्रतिमा इंगोलेंनी या कादंबरीतून मांडल्या आहेत.अनुराधा या नायिकेचा जितका विकास कादंबरीत आढळतो तितकेच अन्य पात्रांचे चित्रण दुर्बळ झाले आहे. अनुराधा विरूद्ध प्राचार्य हा संघर्ष मात्र प्रखरपणे आणि आवेशाने व्यक्त होतो. अनुराधाचा बाणेदारपणा आणि तिच्या व्यक्तिमत्त्वाची उभारी निर्देशित करतांना असूया आणि मत्सराने पेटलेला पुरूषी अहंकार तिचे भावविश्व कुस्करून टाकतो. हीच एक केंद्रभूत बाजू या कादंबरीतून अधिक स्पष्टपणे पुढे येते.

रमेश अंधारे यांची 'पागोरा' (१९९९) ही संयुक्त कुटुंबातील बाप-मुलगा संघर्षाची कथा आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झालेला बाप-मुलगा असा संघर्ष 'पागोरा'त खऱ्या अर्थाने पूर्णत्वास गेला आहे. बाप आणि मुलगा यांच्यातील संघर्षाला जे एक करूणात्मक परिमाण लाभलेले आहे ते, अन्य कादंबऱ्यांच्या तुलनेत 'पागोरा'तून अधिक वास्तव पद्धतीने व्यक्त झाल्याचे आढळते. संयुक्त कुटुंबाची नाळ जपतांना बापाने घेतलेल्या कष्टाला जेव्हा कुटुंबातीलच चुलत्यांच्या घरातले विषाणू कुरतडू लागतात तेव्हा दुःखाचे कढच्या कढ पचवतांना बापाची होणारी तगमग ही जीवघेणी असते आणि ह्या सर्व आघातांचा परिणाम म्हणून तो आपल्या मुलांकडे सुद्धा मनात असूनही पुरेसे लक्ष देऊ शकत नाही. मुलाला वाटते की बाप शोषक आहे. खुद्द बापाचेच शोषण सुरू असतांना - वयोमानाने आलेले शैथिल्य आणि हाडाची काडं झालेली असतांना - मोठ्या मुलाने घरी राहावे आणि आपला शेतीचाच व्यवसाय नेटाने सांभाळावा, आपली शेतकऱ्याची परंपरा पुढे न्यावी, हा खरे तर देश्य जाणिवेचाच एक अपरिहार्य विचार आहे. तो न्याय्यही आहे. परंतु नव्या काळाच्या परिप्रेक्ष्यात बापाला परंपरावादी ठरवण्याऱ्या नायकाला बापाचे देश्य मन तावडतोब कळत नाही. मूल्यसंघर्षात तो बापाच्या परंपरेचे भानही हरवून बसतो. 'कोसला' ते 'पांगुळवाडा'पर्यंत खरेतर बापलोकांच्या वाट्याला असेच काहीसे दुर्दैव आलेले आहे. परंतु 'पागोरा'मध्ये मात्र रमेश अंधारेंनी 'कोसला' परंपरेतील बाप-मुलगा मूल्यसंघर्ष अधोरेखित करतांना, बापाला खलनायक ठरवूनही- बापाच्या मनात खोलवर असलेले अपत्यप्रेमही व्यक्त केलेले आहे. बापाच्या जीवनातील दर्शनी वाटणारे दोष हे जीवनातील अनुभवाचा आणि

समाजव्यवस्थेत सावधपणे जगण्याचा पर्याय म्हणून आलेले असतात. बापाचे खलत्व दर्शविणे हे दर्शनी उद्दिष्ट, नायकावर होणारा अन्याय सिद्ध करण्याचे साधन बनत नाही, ही 'पागोरा'ची खरेतर जमेची बाजू आहे. 'कोसला' पासून तर 'पागोरा'पर्यंतचे सर्वच बाप हे आपल्या तोऱ्यातच जगत आले आणि त्यांना आपल्या मुलांचा मूल्यविचार कधीच पटला नाही म्हणून मुलांसारखा तुसडेपणाही त्यांनी कधी दाखविला नाही. मुलाशी आपली नाळ जुळवून त्याला विरोध करूनही पुन्हा तोच आपल्या कुटुंबाच्या वंशाचा दिवा आहे, ही जाणीव बापलोक विसरलेले नाहीत. कादंबरीकार जेव्हा जेव्हा अस्सल ग्राम आणि शेती संस्कृतीचे वर्णन करतो तेव्हा तेव्हा त्याची शैली तेजस्वी असते तर अन्य वर्णनात मात्र शैलीची तेजस्विता तर जाणवत नाहीच उलट एका कृत्रिम शैलीलाच कादंबरीकार बळी पडतांना दिसतो. शैलीची ही सरमिसळ 'पागोरा'त जाणवत असली तरी रूपबंधाचा शिथिलपणा टाळूनही कादंबरीचे जबरदस्त देश्य आशयद्रव्य आणि आन्याजीचे स्वभावचित्र, या दोन खास जमेच्या गोष्टींमुळेच 'पागोरा' ही वाचकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरली आहे.

अनंत भोयर यांची 'आभाळझुंज' (२००५) ही मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेली त्यांची पहिली कांदबरी. अभियांत्रिकीची पदविका धारण करून आपल्याच नागपूर जिल्ह्यातील काटोल जवळच्या कचारी सावंगा या गावात पोटापाण्याचा व्यवसाय करीत, आपल्या भोवतालचे बदलते वास्तव टिपणाऱ्या ह्या कथाकाराने, धरणग्रस्तांच्या - विस्थापितांच्या जीवनातील दुःखाची करूण कहाणी मांडली आहे. नैसर्गिक जीवनाच्या विद्ध्वंसाकडे वाटचाल करणाऱ्या गावाचे जिवंत वास्तव कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. खेड्यातील खेडूतांची भाषा आणि शैली वापरून भोवतालच्या अनुभवक्षेत्रातील व्यक्तींचे सूक्ष्म चित्रण करतांना, त्यांच्या जीवन मूल्यांच्या आंतरिक संघर्षाची विविध रूपेही त्यांनी आपल्या कादंबरीतून मांडली आहेत. पारंपरिक व्यवसाय मोडकळीला आल्यामुळं जिवंतपणीच मरणयातना भोगणाऱ्या वामन म्हाल्याच्या जीवन संघर्षाची सूक्ष्म रूपं कादंबरीकाराने रेखाटली आहेत. लोकचेष्टेचा विषय बनल्यावर एकाचवेळी अस्मानी आणि सुलतानी संकटांना सामोरे जातांना, आजच्या बाजारवादाशी संघर्ष करतांना, जीवनाचा वृक्षच उन्मळून पडल्याचं दुःख गाठीशी बांधून, माणुसकीशी कुठलीही तडजोड न करणारा वामन म्हाली म्हणजे आजच्या ग्रामव्यवस्थेत अजूनही टिकून असलेल्या मानवतावादी अस्तित्व संघर्षाचं चैतन्यमयी रूप आहे. आपला ताठा, परंपरा, व्यवसायाची अस्मिता, अभिमान, शेजारधर्म, सत्याचा मार्ग न सोडणाऱ्या, चिवट अशा जीवन संघर्षातही आपलं अस्तित्व ढळू न देणाऱ्या सामान्य माणसाचं प्रतिनिधित्व करणारा वामन म्हाली, संपूर्ण आयुष्य अंधारल्यावरही लोकजीवनात आमूलाग्र क्रांतीची उर्जा चेतवणाऱ्या लोकनायकाची भूमिका पार पाडतो. सामान्य माणसाच्या अस्मितेचे पाणी समाजात खोलवर मुरत गेले आहे, ही जाणीव आशादायक आहे. आजच्या खेड्यातल्या उखडलेल्या जीवनाचे सूक्ष्म पदर आपल्या समयोचित भाष्यांसह कादंबरीकाराने कादंबरीत मांडले आहेत.

रा. गो. चवरे याची 'आरंबळ' (२००६) ही पहिलीच कादंबरी. 'आरंबळ' मध्ये यसोदीचं मनाला हेलावून सोडणारं समर्थ पात्र लेखकानं उभं केलं आहे. रवीचं पात्रही यसोदीच्या खालोखाल वाचकांना अंतर्मुख करणारं आहे. आजकाल शिकलेले मुलं आपल्या दारिद्र्यात खितपत पडलेल्या मायबापांना विसरून जातात. परंतु रवी मात्र आपल्या मायवर नितांत श्रद्धा ठेवणारा आणि प्रेम करणारा मुलगा असतो. परिस्थितीच्या अडकित्त्यात तो सापडतो आणि यसोदीपासून काहीसा दूर जातोही परंतु तिचीच चिंता

त्याला अस्वस्थ करणारी असते. शेवटी तो तिच्या सुखासाठी भावांचं आजारपण, गावातलं शेत आणि घर चालवतो. मायच्या सुखासाठी गावात तो भरपूर पैसा पाठवतो परंतु यसोदीच्या सुना पैसा हडप करून तिची अन्नान्नदशा करतात. रवीला हे सर्व कळतं आणि वळतंही. परंतु आपल्या मायला ह्या दुःखभोगातून मुक्त करण्याचा मार्ग त्याला अखेरपर्यंत सापडत नाही. रवी केवळ उभा असतो तो ययोदीमुळेच त्याची जाणीवही त्याला असते. माणूस म्हटला की दुःखभोग अटळच असतो. हे जीवनाचं थरारक रहस्य यसोदीला कळलेलं असतं. यसोदी आपल्या कुटुंबाला घडवते आणि कुटुंबातले सर्व सदस्य आपले भोग भोगत जगतात आणि त्यांची पडझडही होते. सर्वांना आधार असलेली यसोदी अत्यंत निराधार होवून मरते तरी तिने अखेरपर्यंत प्रपंच नेटका केलेला असतो आणि प्रपंचातली दुःखं आपली आपल्यालाच भोगावी लागतात म्हणून तिनं आपल्या मनाची तयारीही केलेली असते. कौतिकाचीच सख्खी बहीण शोभावी एवढी यसोदी मनात ठसणारी आहे. चवरेंची ही पहिली कादंबरी असली तरी कादंबरीतल्या रूपबंधाच्या अनेक जागा त्यांनी चांगल्या हाताळल्या आहेत. गावगाड्याचे चित्रण काहीसे अधिक करता आले असते आणि गावातल्या पाटलांचं चित्रणही करता आलं असतं तर कादंबरीला आहे त्यापेक्षाही अधिक सरसपणा आला असता. शेवटी 'आरंबळ'चं केंद्र यसोदी आहे आणि लेखकानं कुठेही सूटू दिलेलं नाही.

विठ्ठल वाघांनी संत गाडगे बाबांच्या बालपणावरील 'डेबू' (१९९९) या चरित्रपर कादंबरीची निर्मिती केली. एखाद्या नव्या दमाच्या कादंबरीकारने जोरदार मुसंडी मारून सर्वांना थकीत करावे अशा पद्धतीनेच 'डेबू' ची निर्मिती झाली आहे. ''आता आता मला डेबू भेटला. त्याचाच पुढे गाडगेबाबा झालेला. ते महारूख. त्याची पाळंमुळं ज्या मातीत रूजलेली तिचा हा शोध. मागोवा.'' असे लेखक प्रास्ताविकात म्हणतो. कवी मनाने डेबूचा शोध घेतला. डेबू ज्या मातीत वाढला त्याच मातीत लेखक वाढला. मातीच्या साधर्म्याने आणि भाषिक जाणिवेच्या पातळीवर कवी डेबूशी एकरूप झाला. डेबूची पाळंमुळं शोधण्यात यश आले. कादंबरीचा रूपबंध कलात्मक आहे. तथ्य-वास्तवाला काटशह न देता गाडगेबाबांची बालरूपातील जडणघडण कादंबरीचे मुख्य कथ्य आहे. 'डेबू' ही चरित्रात्मक कादंबरी आहे. चरित्रात्मक कादंबरीचे बरेचसे तपशील चरित्रांच्या प्रसिद्धीमुळे आणि व्यक्तिमहात्म्यामुळे लोकांना परिचित असतात. अशा व्यक्तींच्या जीवनातील अनेक घटनाप्रसंगही लोकांना सोदाहरण माहीत असतात. गाडगेबाबा जेव्हा महात्मा झाले तेव्हापासूनचा वृत्तांत बहुतक त्यांच्या चरित्रग्रंथातून लोकांसमोर आलेला आहेत. परंतु डेबूचे बालपण हे डेबूच्या नातेवाईकांनाच माहिती. विठ्ठल वाघांनी आपली निर्मितीची क्षमता पणाला लावून डेबूच्या म्हणजेच गाडगेबाबांच्या विचारांचा अर्क असणाऱ्या घटनाप्रसंगांची मालिकाच 'डेबू'त मांडली आहे. गाडगेबाबा बालपणात कसे होते आणि कसे खेळत होते, कसे वागत आणि जगत होते. त्यांची वैचारिक जडणघडण कशी झाली. याची सूक्ष्मातिसूक्ष्म माहिती लोकांना असण्याचे कारण नाही. चरित्रग्रंथातही या माहितीला फारसे स्थान नसते. परंतु कांदबरीत मात्र चरित्रग्रंथात अनावश्यक असलेल्या माहितीला अधिक महत्त्व असते. कारण कुण्याही मोठ्या माणसाची जडणघडण ही त्याच्या बालपणापासूनच्या संस्कारांतून आणि निरीक्षणातून होत असते. विचारांचा आणि चिंतनाचा परिपक्वपणा व्यक्तीची थोरवी वाढवित असतो. समाजासाठी काम करणाऱ्या लोकांना आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवावे लागते. व्यक्तीच्या मोठेपणातील रहस्य हे त्याच्या बालपणात दडलेले असू शकते, हे 'डेबू' कादंबरीतून वाचकांच्या समोर आलेले आहे. गाडगेबाबांचे बालपण हेच त्यांच्या बाबा होण्याचे मुख्य स्रोत होते, हे 'डेबू' वाचल्यावर पटण्यासारखे आहे.

म्हणून रूढ अर्थाने डेबू ही चरित्रात्मक कादंबरीपेक्षा वेगळी अशी निखळ कादंबरीची वाट चोखाळणारी, कादंबरीकाराच्या प्रतिभेतून आकारत जाणारी आणि तरीही डेबूच्या उत्तुंग अशा मानुषतेशी तादात्म पावणारी कादंबरी आहे. कादंबरीकाराचे कसब पणाला लागले ते अशा वेगळ्या वाटेने कादंबरीला आकार देण्यातच दिसून येते.

मराठी ग्रामीण कादंबरी लिहिणारे बहुतांश लेखक हे लघुकथाकार आहेत. विदर्भातील बाबाराव मुसळे , सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले हे खरेतर मूळ लघुकथाकारच आहेत. लघुकथाकार पुढे कादंबरीची निर्मिती करतांना, कादंबरीच्या आशयिक संकल्पना आणि कादंबरीची रूपतत्त्वे, कादंबरीच्या निर्मितीतही लघुकथेसारखीच वापरतात. मराठीतील बहुतांश ग्रामीण कादंबऱ्या ह्या लघुकथांचा विस्तार करणाऱ्या, निव्वळ वास्तवाचे वर्णन करणाऱ्या वर्णनात्मक कादंबऱ्याच आहेत, असे निरिक्षण खेदाने नोंदवावे लागते. त्याला विदर्भातील कादंबरीकारही अपवाद नाहीत. आनंद यादवांनी १९८० मध्येच, ''लघुकथेसारखा स्फुट प्रकारच हाताळण्याच्या अनुकरणात अजून नवा ग्रामीण साहित्यिक अडकलेला आहे.'' अशी तक्रार नोंदविली होती. 'ग्रामीण कादंबरीकारांची खरी प्रकृती ही कथाकाराची आहे आणि त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांनाही व्यक्तिवादाचे वर्तुळ पार करता आल्याचे दिसत नाही,' अशी तक्रार नागनाथ कोत्तापल्लेंनीही एका चर्चासत्रात मांडली आहे. सदानंद देशमुखांची 'तहान', प्रतिमा इंगोलेंची 'बुढाई' अशी उदाहरणे कथेचा आवाका असणाऱ्या ग्रामीण कादंबऱ्यांची देता येतील.

ग्रामीण कादंबरीतील वर्णनपरता आणि रूपबंधाच्या अत्यंत क्षीण निर्मितीवर भाष्य करतांना भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''जमवलेल्या सामग्रीची कथानकं ढकलत नेणं एवढंच ह्या कादंबऱ्या साधतात. व्यक्तिचित्रणप्रधान किंवा घटनाप्रधान वर्णनपरता, प्रसंगनिष्ठ कथन, त्या त्या प्रदेशातील भाषा अशा घटकांच्या ढळढळीत वापरामुळे आशयाच्या रूपहीनतेवर अंकुश ठेवणाऱ्या रूपतत्त्वांशी कदर, हे कादंबरीकार करतांना दिसत नाहीत. आविष्काराची दर्शनी बाजू, संरचनेचे आकार, रूपबंधांच्या आकृत्या, शैली आणि कथनतंत्रे - ह्या व अशा आशयाव्यतिरिक्त कादंबरीत महत्त्वाचे कार्य करणाऱ्या रूपतत्त्वांबद्दलची बेपर्वाई ह्या कादंबऱ्यांना मोठ्या प्रमाणावर भोवते. जवळपास सर्वच ग्रामीण म्हणवणाऱ्या कादंबऱ्या ह्या प्रकारामुळे अवाचनीय ठरल्या आहेत आणि आश्चर्य म्हणजे खुद्द कादंबरीकारच ह्या अवाचनीयतेला जबाबदार आहेत. ह्या बेबंदशाहीला आधार म्हणून दलित साहित्य, ग्रामीण साहित्य असे अशास्त्रीय वाङ्मयप्रकारही कोणत्याही सिद्धांताशिवाय मराठीत रूढ करून टाकल्याने ह्या कादंबऱ्या आताच रूमालबंद होऊन गेल्या आहेत.'' नेमाड्यांचे ग्रामीण आणि दलित साहित्याला अशास्त्रीय ठरवणारे मत मान्य होण्यासारखे नसले तरी ग्रामीण कादंबरीच्या एकूणच रूपबंधाबाबतचे त्यांचे निरीक्षण ग्रामीण कादंबरीकारांनी आणि ग्रामीण कथाकारांनीही गंभीरपणे विचारात घेणे आवश्यक ठरते. विदर्भातील ग्रामीण कादंबरीकारांनीही कादंबऱ्यांचा रूपबंध ह्याच अंगाने हाताळल्याचे दिसून येते.

वास्तवाला कल्पिताचे रूप कादंबरीत प्राप्त होत असल्यामुळे कादंबरीकाराला सत्यदर्शनाच्या परिघातच वास्तवाची निर्मिती करावी लागते. वास्तवाचे अद्भूत पद्धतीने - रोमँटिक पद्धतीने वर्णन करण्यावरच कादंबरीच्या रूपबंधाचे यश अवलंबून असते. विदर्भातील कादंबरीने मात्र रूपबंधाचे तंत्र पारंपरिकच स्वीकारलेले असले तरी आशय मूल्याच्या अंगाने मात्र उद्धव शेळके, मनोहर तल्हार, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, पुरूषोत्तम बोरकर, रवीन्द्र शोभणे, रमेश इंगळे

उत्रादकर यांच्या कादंबऱ्यांनी एकूणच ग्रामीण आणि मराठी कांदबरीत उंची गाठणाऱ्या कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत. पुरूषोत्तम बोरकर यांची 'मेड इन इंडिया' आणि रमेश इंगळे उत्रादकरांची 'निशाणी डावा अंगठा' ह्या कादंबऱ्यांनी मात्र आशय आणि आशयाचा आविष्कार करणारी तंत्रे तिरकस आणि उपहासगर्भ शैलीने हाताळल्यामुळे रूपबंधाचाही संपन्न आविष्कार ह्या कादंबऱ्यांनी केल्याचे जाणवते. सदानंद देशमुखांची 'तहान' लघुकथेला जवळची आहे तर 'बारोमास' ही आशय आणि रूपबंधाचा गंभीरपणे विचार करणारी कृती आहे. बाबाराव मुसळ्यांना 'पखाल' मध्ये जे जमले ते 'वारूळ'मध्ये साधले नाही. 'वारूळ' ही रूपबंधाच्या बाबतीत ढिसाळ आणि सैल असल्याचे जाणवते. पुन्हा 'पाटीलकी' ही चित्रपटाच्या रंजक तंत्रांना स्वीकारते आणि कादंबरीपासून दुरावतांना दिसते. रवीन्द्र शोभणेंची 'कोंडी' मात्र आशय आणि रूपबंधाचे कालभान आणि स्थलभान जपणारी असल्याचे जाणवते. नामदेव कांबळे 'राघवेळ'मध्ये जसे उभे राहतात तसे पुढच्या 'ऊनसावली', 'साजरंग' या कादंबऱ्यांतून वालंबी सोडली तर त्यांचा रघू हा नायक वास्तवापासून दूर जातांना दिसतो. वालंबी आणि कौतिक ह्या मराठी साहित्य क्षेत्रात अजमरामर अशा विदर्भातील ग्रामीण स्त्री नायिका आहेत.

विदर्भातील कादंबरीचा प्रवाह तीन दिशांनी वाहत गेल्याचे दिसते. ग्रामीण हा एक प्रवाह. आदिवासी आणि भटक्या विमुक्तांचे जीवन चित्रण करणारा दुसरा प्रवाह, नागरी मध्यमवर्गीय जीवन चित्रणाला प्राधान्य देणारा तिसरा प्रवाह. मधुकर वाकोडे, सुरेश द्वादशीवार, दिनकर दाभाडे, एकनाथ साळवे, माधव सुरकुंडे यांनी या प्रकारातले कादंबरीलेखन कलेले आहे. 'झेलझपाट' (१९८८) आणि 'सिलीपशेरा' (१९९८) ह्या वाकोडे यांच्या दोन कादंबऱ्या. अगदी कादंबरीच्या शीर्षकांपासून वाकोडेंच्या कादंबऱ्यांची लोकतत्त्वीय अंगाने वाटचाल सुरू होते. अमरावती जिल्ह्यातील - चिखलदरा - धारणी तालुक्याचा परिसर हा कोरकू - बहुल आदिवासी गावांचा आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील झिंगाभोई या भटक्या जमातीचे वास्तव्य आहे. 'झेलझपाट' कादंबरीत कोरकूंच्या आदिम जीवनाचे चित्रण केले आहे तर 'सिलीपशेरा' या कादंबरीत झिंगाभोयांच्या हलाखीचे चित्रण केले आहे. दोन्ही जमातींचे लोक कमालीचे दरिद्री, अडाणी, निरक्षर आणि लोकदैवतांना मानणारे - लोकश्रद्धांना जपणारे आणि आपल्या वाट्याला आलेले दुःख हे आपल्याच चुकांमुळे - दैवतांच्या प्रकोपांमुळे आलेले असल्याचे मानून कायम दुःखभोगात जगणारे हे लोक आहेत. आदिवासी कोरकूंना परतवाडा-आकोटचे व्यापारी-ठेकेदार-अधिकारी-पोलीस-जांगडी लुबाडतात. त्यांच्या मूल्यवान मालाचा झेलझपाट करून त्यांचे शोषण करतात. 'झेलझपाट' या शीर्षकांतूनच लेखक कोरकूंच्या जीवनाची सून्न करणारी वाताहत सूचित करतो. झिंगाभोई सुद्धा कोरकूंसारखेच रानवट-अडाणी-निरक्षर लोक. भटके आणि नागरी शोषणाच्या चरकांतून पिळले जाणारे. आपल्या परंपरा आणि श्रद्धांची जपणूक करतांना शिक्षणाचं - विज्ञानाचं नव वारं म्हणजे आपल्या जीवनात येणारं दुःख असून, ते आपल्या दैवतांच्या कोपामुळेच आलेलं आहे, असं मानणारी ही जमात. सुधारणा म्हणजे आपलं मरण असल्याची जाणीव ह्यांना होते. हे लोक भयभितपणे जगतात. झिंगाभोई रानबोक्यांची शिकार करतांना पाळीव कुत्र्यांना सोडतात. तोंडाने पिल्लीपाशी जा रं ऽऽऽ सिल्लीपाशी जा रं ऽऽ सिलीपशेरा ऽऽ सिलीपशेरा ऽऽऽ असे ओरडतात आणि सिलीपशेराच्या रूपात एक नवे भाषिकरूप तयार होते. सिलीपशेरा.... ब्रह्मानंद ! उत्कट आनंद !! जा पोरी जाऽऽ ची हुतलय... झपूर्झा !!! केशवसुतांनी झपूर्झा शब्द मराठीला दिला. वाकोंडेंनी 'सिलिपशेरा' हा शब्द मराठीला दिला. उत्कट भावावस्था सूचित करणारे हे

शीर्षक आहे. 'झेलझपाट' आणि 'सिलीपशेरा' ही दोन्ही शीर्षके लोकतत्वीय जाणिवेतून लेखकाला सूचलेली आहेत या दोन्ही कादंबऱ्यातील लोकतत्त्वीयभानामुळे मधुकर वाकोडे यांनी मराठी कादंबरीची कलात्मक उंची वाढविली आहे. 'झेलझपाट' आणि 'सिलीपशेरा' या दोन्ही कांदबऱ्यांतून वाकोडेंनी वापरलेल्या लोकतत्त्वांचा उपयोजित आणि कलात्मक वापर लक्षात घेता, ह्या दोन्ही कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीच्या क्षेत्रात लोकतत्त्वांचे उपयोजन करून मोठी उंची गाठली आहे, असे म्हणता येईल.

दिनकर दाभाडे यांची 'बिलामत' (१९९४) ही शामा कोलाम या आदिवासी नायकाच्या जीवनावर बेतलेली उत्कृष्ट कादंबरी. शामा कोलामच्या जीवनातील परिवर्तनाचे चित्रण अत्यंत मनोवेधकपणे लेखकाने केलेल आहे. 'गयपातं' (२००५) ही दिगू पाटील या खेड्यातल्या दहावी-बारावीचं शिक्षण घेतलेल्या आणि शिक्षणातलं वैयर्थ जाणवताच शिक्षण सोडून-बापाच्या धाकानं खेडंगाव सोडून आपल्या मित्रांच्या घरी मुक्काम करीत समाज निरीक्षण करीत जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरूण नायकाची किंवा दिगू उर्फ दिनकरची कथा मांडणारी दुसरी कादंबरी. या दोन्ही कादंबऱ्यांची प्रकृती भिन्न आहे. 'बिलामत' ही चरित्रपर तर 'गयपातं' ही आत्माविष्कारात्मक कादंबरी आहे. एकनाथ साळवे यांची 'एनकाउंटर' (१९९८) ही गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद-आदिवासी गोंड माडिया यांच्या संदर्भात पोलिसांच्या अन्यायाची चित्तथरारक कहाणी सांगणारी कादंबरी आहे. ह्या कादंबऱ्यांनी आशयद्रव्य जितके सकसपणे हाताळले आहे तितकेच कादंबरीच्या रूपबंधाकडे मात्र कमालीचे दुर्लक्ष केल्याचे दिसते.

सुरेश द्वादशीवरांची 'हाकुमी' (१९८९) ही माडिया गोंड समाजाचे चित्रण करणारी कादंबरी तर 'अलकनंदा' (१९८८), 'तांदळा' (१९८९), 'वर्तमान' (२००२) ह्या मानवी जीवनातले वैचित्र्य, दैव आणि नियती, वर्तमान राजकारण, अध्यात्म आणि तत्त्वज्ञान आदी विषयांना हाताळणाऱ्या कादंबऱ्या आहेत. '' 'वर्तमान' ही कादंबरी इ.स.२००० ते २००२ या कालखंडातील राजकारणावर आणि त्यातल्या मातब्बरांवर प्रकाशझोत टाकणारी आहे. केंद्र सरकार, राज्यातील सरकारे, पक्ष, संघटना, प्रसार माध्यमे आणि लोकमानस यांचा आढावा घेत वर्तमान राजकारणाचा पट उलगडणारी राजकीय कादंबरी आहे,'' असे एक अवतरण कादंबरीच्या मलपृष्ठावर दिलेलं आहे. हे या कादंबरीचं स्वरूप असलं तरी तेवढ्यांपुरतीच ही कादंबरी मर्यादित नाही. या कादंबरीला एक समृद्ध अवकाश प्राप्त झाला आहे. त्यात माणूसपणावरील श्रद्धा जिवंत राहावी म्हणून, धार्मिक ऐक्य राखून, मानवी जगण्याला सौंदर्य प्राप्त करून देण्यासाठीचे कळकळीचे आवाहनही लेखकाने केलेले आहे. या कादंबरीलाही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वासारख्याच अनेक समृद्ध बाजूही लाभल्या आहेत. देशाच्या विविध राज्याचा भौगोलिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, ऐतिहासिक आणि पौराणिक तसेच वर्तमानकालीन संदर्भांसह एक चिंतनशील प्रवास लेखकाने अधोरेखित केला आहे. आसाम, ओरिसा, महाराष्ट्र, तामिलनाडू, आंध्र, कर्नाटक, बिहार, गुजराथ अशा अनेक प्रदेशाचे वर्तमान लेखकाने अत्यंत जाणीवपूर्वक आणि चिंतनात्मक रीतीने मांडले आहे. राज्यातल्या राजकीय घटनांचा तपशील पुरवणे आणि केंद्र सरकारच्या मुखवट्याचा अस्सल परिचय करून देणारी सुप्तकेंद्र लोकांसमोर प्रकट करणे; असा एक मोठा पट कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. रूपबंधाचा अत्यंत सैल वापर केल्याचे जाणवत असले तरी चिंतन आणि निरीक्षणाचे वैभव लक्षात घेतले तर एक विशाल असा अवकाश आपल्या वाचनीय शैलीने कादंबरीकाराने भरून काढल्याचे जाणवते.

अनुक्रमणिका

ग्रामीण कादंबरीच्या तुलनेत विदर्भातील नागरी कादंबऱ्यांची निर्मिती ही मराठी कादंबरीच्या मुख्य प्रवाहाशी समकक्षता साधत, तिनेही आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. आशा बगे, रवीन्द्र शोभणे, सुरेश द्वादशीवार या कादंबरीकारांनी एकूणच मराठी कादंबरीत आपले स्वतंत्र असे स्थान निर्माण केलेले आहे. डॉ. रवीन्द्र शोभणे यांनी 'प्रवाह' (१९८३), 'रक्तध्रुव' (१९८९), 'कोंडी' (१९९२), 'चिरेबंद' (१९९५), 'सव्वीस दिवस' (१९९६), 'उत्तरायण' (२००१) ह्या कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. 'पडघम' (२००७) ही त्यांची बृहत् कादंबरी. सन १९७५ ते १९८४ च्या दरम्यान भारतीय राजकारण आणि समाजकारणांत ज्या काही घडामोडी घडल्या त्यामुळे सबंध देशाचं सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवन प्रभावित झालं - मूल्यांतर झालं - त्या एका मोठ्या कालावकाशाचा चिंतनपट शोभणेंनी या कादंबरीच्या निमित्ताने वाचकांसमोर मांडला आहे. इंडिया गांधींनी देशात सन १९७५ मध्ये आणिबाणी लागू केली. ह्या घटनेमुळं विविध प्रांतांमध्ये विभागलेल्या एकूणच भारतीय समाजाच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून आली. इंदिरा गांधींनी माध्यमांवर बंदी आणली, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही बंदी आणली. आणिबाणीच्या काळात सबंध देशात व्यक्ती स्वातंत्र्यावर, विचार-स्वातंत्र्यावर दहशतवादी अंकुश होता. देशातल्या दलित, पीडीत, शोषित लोकांवर ह्या घटनेचा दूरगामी परिणाम उलट झाला. इंदिरा गांधींच्या वीस कलमी आणि संजय गांधींच्या पाच कलमी कार्यक्रमामुळे मागासलेल्या समाजाच्या विकासाच्या दिशा मात्र अधिक मोकळ्या झाल्या. मध्यमवर्गीय आणि भांडवलदारी वर्गाच्या एकूणच जीवनावर आणिबाणीनं सरळ आक्रमण केल्यामुळे आणि मिडिया सुद्धा ह्याच सूत्रधारी व्यवस्थेचा भाग असल्यामुळे - ह्यांना आणिबाणी म्हणजे पारतंत्र्य वाटले. आणिबाणी ही भारतीयांच्या घटनादत्त अधिकारांवर घाला घालणारी होती, हे सत्यही होते. परंतु समाज व्यवस्थेतल्या प्रत्येक घटकाने आणिबाणीचा अर्थ लावतांना आपल्या निहित हिताचाच विचार केलेला होता, हे सत्यही होते. एकूणच आणिबाणीमुळे समाजात एक मूल्यसंघर्ष उभा झाला. प्रभावित प्रत्येक समाज घटकाने आणिबाणीला आपल्या परीने होईल तेवढा विरोधच केला. शेवटी हा सत्तासंघर्ष होता. उच्चभ्रू आणि मध्यमवर्गीय पांढरपेशा लोकांना आणिबाणी गैरसोईची होती, म्हणून ह्या वर्गानं आणिबाणीच्या विरोधात महाराष्ट्रासह सर्वच प्रांतात आपापल्या परीने लढा उभारला आणि निकराने त्यांनी तो समाजमनातही उतरवला. आणिबाणी विरूद्धचा संघर्ष - लढा हा दुसऱ्या स्वातंत्र्याचा लढा होता-असं जनमतही तयार झालं. ह्या जनमतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पुढाकार अधिक होता. याला कारणही होते. एकतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी आणली गेली आणि त्यांच्या आविष्कार स्वातंत्र्यावर कुऱ्हाडीचे घाव घातले गेले. ह्या वर्गानं खरोखर दुसरं स्वातंत्र्य म्हणावं एवढा निकराचा लढा दिला. अनेकांचे संसार त्यात उद्ध्वस्त झाले. ज्या संघनिष्ठावंतांनी देशाच्या स्वातंत्र्यात उड्या घेतल्या होत्या, त्यांनाही संशयित म्हणून मिसाखाली बंदी बनविले गेले. पोलिस यंत्रणेने मिसाचा कमालीचा दुरूपयोग केला. अनेकांच्या कुटुंबाची वाताहत झाली. आणिबाणीच्या आणि सत्ताबदलाच्या ह्या कालावकाशाचा एकूणच भारतीय सामाजिक आणि राजकीय जीवनावर दूरगामी परिणाम झाला. ह्या परिणामांतूनच पुढे मूल्यपतनाचाही आलेख गतीने चढत गेला. मूल्यऱ्हास आणि मूल्यांच्या पडझडीचा परिणाम एकूणच समाज व्यवस्थेवर झाला. जगण्याचीही मूल्ये बदलली. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात ह्या कालावकाशाचे गडद पडसाद उमटले. कला, साहित्य, संस्कृतीसह सामाजिक व राजकीय जीवनातही मूल्यपतनाची नवी नवी स्थित्यंतरे घडू लागली. त्याची झाडाझडती रवीन्द्र

अनुक्रमणिका

शोभणे यांनी 'पडघम' या कादंबरीत घेतली आहे.

वसंत आबाजी डहाके यांच्या 'अधोलोक' (१९७५), 'प्रतिबद्ध आणि मर्त्य' (१९८१) या लघुकादंबऱ्यांनी अस्तित्ववादी जीवनजाणिवांचा स्वीकार करीत– मानवी जीवनातील एकाकीपण आणि क्षणभंगुरता तीव्रतेने व्यक्त करून, मानवी जीवनाला आतून हादरे देणारी संवेदनशीलता व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांची निर्मिती केली. प्रभाकर सिरासांच्या 'निळेकमळ' (१९७९) कादंबरीतून सुद्धा अस्तित्वजाणिवा व्यक्त करणारा नायक आपली आत्मकथा सांगतो. जननिष्ठ जाणिवांचा आणि जनसाहित्याचा पुरस्कार करणाऱ्या सुभाष सावरकरांनीही 'व्हायरस' (१९७७), 'सूर्यसूक्त' (१९७९), 'आत्मा' (१९८२), 'आहुती' (१९८५), 'आटपाट' (१९८९) अशा सरस कादंबऱ्या लिहून विदर्भात जनकादंबरीची परंपरा निर्माण केली. सावरकरांना कादंबरीची परिपक्व जाण आहे. कादंबरीचा आशय, अवकाश, रूपबंध यांचा उचित उपयोग करून कादंबरीचे वेगळेपण त्यांनी सिद्ध केले आहे. त्यांच्या पाचही कादंबऱ्यांची निर्मितीप्रक्रिया आणि त्यांचे आशयबंद, केवळ साठोत्तरीच नव्हे तर एकूणच मराठी कादंबरीच्या संदर्भात वेगळेपणामुळे निश्चितच अभ्यासनीय आहेत. त्यांच्या कादंबऱ्या रूढ प्रवाहापेक्षा आणि कालसापेक्ष कादंबरीतील मूल्यव्यवस्थेपेक्षा प्रयोगाच्या अंगाने आणि सामाजिक मूल्यव्यवस्थेच्याही अंगाने वेगळेपण सिद्ध करणाऱ्या आहेत. अर्थात त्यांच्या कादंबरीतील वेगळेपण हे त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांचे सामर्थ्य ठरत नाही. आशयमूल्यांची मांडणी करतांना आणि त्यासाठी पोषक असलेला कादंबरीचा रूपबंध निर्माण करतांना, त्यांच्या कादंबरीत सैलपणाही जाणवतो आणि मांडणीत दोष जाणवतात. त्याचाच परिणाम म्हणून त्यांच्या कादंबऱ्यांकडे समीक्षकांचे दुर्लक्षही झाले असण्याचा संभव आहे. 'व्हायरस'ची शैली आकर्षक आणि कमालीची वाचनीय आहे. 'व्हायरस'चा रूपबंधही मजबूत आहे. मराठी कादंबरीला सवयीचे असलेले आशयद्रव्य या कादंबरीत नसून, काहीसे दिल्ली – मुंबई – बंगलोर वगैरे महानगरी जीवनातील उच्चवर्गीय आणि मध्यमवर्गीय जीवनाचे एकजीव आणि काहीसे हिंदी – उर्दूशी साधर्म्य असणारे समज जीवन 'व्हायरस'च्या केंद्रस्थानी आहे. कादंबरीची पारंपरिक रचना टाळून नाटक आणि कादंबरी असा संयुक्त रूपबंध कादंबरीसाठी वापरला आहे. कादंबरीतील आशयाची व्यापकता आणि नाटकातील जबरदस्त नाट्य, कादंबरीतील अवकाश भरून काढणारे आहे. मानवी जीवनातील एक मोठे जीवननाट्य सावरकरांनी 'व्हायरस'मध्ये तत्त्वज्ञानात्मक आधार घेऊन मांडले आहे. 'व्हायरस'चे निवेदन, भाषेचा वापर, शैलीची चित्तवेधकता, 'व्हायरस'च्या प्रतीकाचा अर्थबहुल वापर, कमालीचे चित्तवेधक जीवननाट्य, पात्रांची निवड आणि त्यांच्यातले परस्परसंबंध आणि कमालीचे ताणतणाव, नाटकातील संवादबहुलता, आशयाला दिलेल्या आकस्मिक कलाटण्या आणि त्यामुळे वाचकांना मनोमन जाणवणारे सुखद, दुःखद आणि बौद्धिक धक्के, अशा अनेक अंगाने 'व्हायरस' ही मराठीतील एक महत्त्वाची कादंबरी मानावी लागते.

वि. स. जोग यांची 'आम्ही' (१९९०) मध्यवर्गीय मार्क्सवादी नायकाची व्यथा मांडणारी कादंबरी आहे. नवनीत देशमुख याची 'अंगणवाडी' (१९८६), 'कॉलनी' (१९९१), 'बंदिस्त' (१९७८), 'झेडपी' ह्या समस्या प्रधान कादंबऱ्यांनी विदर्भातील सामाजिक समस्यांना वाचा फोडली आहे. सुखदेव ढाणके यांची 'चेडा' (२००१) ही साठपासष्ट पानी कादंबरी. 'चेडा' ही कादंबरी आहे काय ? हा प्रश्न उपस्थित व्हावा. कादंबरीचा पारंपरिक रूपबंध लक्षात घेता 'चेडा' ही कादंबरीचा रूपबंध पेलणारी कादंबरी

नाही. कादंबरीकरिता जी आशयसूत्रे, पात्रसंच, शैली आणि जो एक मोठा अवकाश लागतो तो 'चेडा' या कृतीमध्ये आढळत नाही. परंतु कादंबरीला आवश्यक असलेले एक व्यापक आशयसूत्र 'चेडा'मध्ये आहे. कादंबरीच्या अंगाने सुखदेव ढाणके यांना ते फुलवता आलेले नाही. 'चेडा' ही लघुकादंबरी किंवा एक दीर्घकथा म्हणूनच वाचकांसमोर आलेली आहे. जेव्हा एखादा कवी किंवा कथाकार कादंबरीलेखन करतो. तेव्हा त्याच्या लेखनाचा मूळ पिंडच कादंबरीतून निर्देशित होतो. 'चेडा' ही एक कलाकृती मानली तर ती कादंबरीपेक्षा दीर्घ कवितेला अधिक जवळची ठरते. 'चेडा' ही आत्माविष्कार करणारी कादंबरी आहे की काय ? असाही एक प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण होतो. किंबहुना 'चेडा' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे असाही संशय घ्यायला, कादंबरीतील काही वास्तव तपशिलांच्या आधारे जागा आहे. कादंबरी ही आत्मचरित्रात्मक नसते आणि जर ती तशी असेल तर त्या कृतीला आपण आत्मचरित्रच म्हणायला हवे. शिवाय 'चेडा' अलीकडच्या दलित आत्मकथनांना जवळची आहे, असेही वाटायला लागते. परंतु दलित स्वकथनांचा – आत्मकथनांचा घाट लक्षात घेता 'चेडा' ही दलित आत्मकथनांपेक्षा एक वेगळीच कलाकृती आहे, असे म्हणावे लागते. एका भावकवीचे – संवेदनशील कवीचे हे प्रदीर्घ चिंतन आहे. प्रदीर्घ काव्य आहे. दीर्घ कवितेला जवळचा असलेला रूपबंध ढाणके यांनी अत्यंत तरल अशा भाषिक अवकाशासह हाताळलेला आहे. 'चेडा' या कृतीत काही प्रयोग करण्याचाही प्रयत्न केलेला आहे.

अलीकडच्या काळात स्त्रीवादी विचारांचा आविष्कार करणाऱ्या विदर्भातील स्त्री कादंबरीकारांनीही मराठी कादंबरीला योगदान दिल्याचे दिसते. आशा बगे, प्रतिमा इंगोले, शुभांगी भडभडे, सुनिता कावळे, उत्तरा हुद्दार, अरूणा सबाने, विजया ब्राह्मणकर आदींनी हा प्रांत समृद्ध केला आहे. आशा बगे यांच्या 'मनस्विनी', 'त्रिदल', 'झुंबर', 'सेतू', 'भूमी' आदी कादंबऱ्यांनी मात्र आपले स्वयंसिद्धपण अधोरेखित केलेले आहे. नव्या युगात स्त्री चळवळी आणि शहरी-नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या वाढल्या. स्त्रीमुक्ती आणि व्यक्तिवाद आधुनिक स्त्रीला प्रिय वाटू लागला. कौटुंबिक समस्या आणि लैंगिक समस्याही वाढल्या. नव्या युगाच्या ह्या नव्या शहरी मध्यमवर्गीय आणि उच्चभ्रू स्त्री जीवनाचे चित्रण हा या कालखंडातल्या स्त्रीवादी कथा-कादंबऱ्यांचा विशेष पैलू आहे. आशाताईंच्या कादंबऱ्यांतून येणारी स्त्रीरूपे सनातनी आणि बहुतांश उच्चभ्रू समाजातली आहेत. त्यांच्या कादंबरीतल्या स्त्रियांना स्वातंत्र्य आणि मुक्ती हवी आहे परंतु स्वैराचाराला आणि कुटुंबाला अधोगतीच्या दिशेने नेणाऱ्या स्त्रीवादी वृत्तीचा त्या कधीच पुरस्कार करीत नाहीत. सानिया-गौरी देशपांडे-शांता गोखले-सुलोचना देशमुख-मेघना पेठे यांच्या कादंबऱ्यातील धीट व्यक्तित्ववादाचाही त्यांच्या नायिका पुरस्कार करीत नाहीत. आशाताईंच्या नायिका पुरूष वर्चस्वाविरूद्ध केवळ प्रतिक्रिया व्यक्त करून कौटुंबिक तणाव निर्माण करण्यात रस घेत नाहीत, तर त्या अधिक समंजसपणे कुटुंबातली भावसत्ये जोपासण्याचा प्रयत्न करतात. आशाताईंच्या नायिकांनाही लैंगिक स्वातंत्र्य हवे असते आणि स्त्रीत्वाच्या नैसर्गिक प्रेमानुकूल शरीर संबंधांचीही आस असते. परंतु प्रणयापेक्षा-शृंगारापेक्षा वात्सल्याचं स्त्रीरूप त्यांना अधिक भावते. लैंगिक संबंध हाच स्त्रीजीवनाचा परमोच्च बिंदू त्या मानत नाहीत. स्त्रीवादी जाणिवेचा नैतिक आणि संयमित आविष्कार करणाऱ्या आशाताई म्हणूनच, स्त्रीवादी लेखनाचा दिशादर्शक दीपस्तंभ ठरतात. 'भूमी' (२००४) मधली तमिल-ख्रिश्चन-हिंदू असलेली मैथिली ही नायिका मध्यमवर्गीय उच्चभ्रू नायिकांशी समांतर असली, तरी मैथिलीच्या मनात सनातन स्त्रीत्त्वाचे काही प्रश्न उपस्थित करून

अनुक्रमणिका

आशाताईंनी, नव्या जगातल्या नव्या प्रश्नांना सामोरी जाणारी नायिका उभी केले आहे. धर्म-वंश-गोत्र-जातीपेक्षा मैथिलीला मानवता मौलिक वाटते. शंतनूच्या मनात ईर्षा निर्माण झाली. तरी मुलाच्या संगोपनात आणि त्यालाही प्रेमाचा वाटा देण्यात ती कमी पडत नाही. शंतनूचा तिरस्कार न करता-आपल्या व्यक्तिमत्त्वाला नवीन उभारी देतांना-तिला जगण्याची नवी भूमी प्राप्त होते. एका प्रगल्भ आणि परिपूर्ण स्त्री रूपात तिला आत्मसामर्थ्याची जाणीव होते. मैथिली ही आधुनिक जगात नव्याने उभी राहणारी-कुठेही नैतिकतेशी तडजोड न करणारी - स्वयंसिद्ध व्यक्तित्त्वाची नायिका निर्माण करून - आशाताईंनी स्त्रीवादी विचारांवर श्रद्धा ठेवत - 'भूमी'च्या रूपात एक विधायक कृती केली आहे. अरूणा सबाने यांची 'विमुक्ता' (२००६) कौटुंबिक चौकटीच्या संस्कृतीतून बाहेर पडून आपले आयुष्य उभारणाऱ्या नव्या युगातल्या स्त्रीचे दर्शन घडविणारी आहे. 'मुन्नी' (२०१०) या त्यांच्या कादंबरीने तर मुन्नीचे नवे जग साकारले आहे. मराठीत स्त्रीवादाचा जोरकस पुरस्कार करून अहंमन्य पुरूषी संस्कृतीचा कडाडून विरोध करणाऱ्या ह्या कादंबऱ्या आहेत. नव्या युगातल्या नव्या स्त्री जाणिवांची चाहूल यानिमित्ताने मराठी कादंबरीच्या वाचकांना झालेली आहे.

एकूणच मराठी कादंबरीला विदर्भातील विविध प्रवाही कादंबऱ्यांनी समृद्ध केल्याचे समाधानकारक चित्र विसाव्या शतकातील साठोत्तर कालखंडात दिसून येते. विदर्भातील कादंबरीची ओळख मुख्यत्त्वे विदर्भातील ग्रामीण कादंबरीकारांनी ठळकपणे सिद्ध केली आहे, हेही अधोरेखित करायला हवे. तुलनेत विदर्भातील अन्य प्रवाही आणि नागरी कादंबऱ्यांची चर्चा मात्र मराठी कादंबरीच्या प्रांतात विशेषत्वाने झाल्याचे दिसत नाही. नामदेव कांबळे, सदानंद देशमुख, बाबाराव मुसळे, रवीन्द्र शोभणे, आशा बगे, सुरेश द्वादशीवार, रमेश इंगळे उत्रादकर हे विदर्भातील कादंबरीचे शिल्पकार मानले जातात. मराठी कादंबरीच्या प्रांतात आपल्या कादंबरी निर्मितीने ह्या लेखकांनी आपली अमीट छाप निर्माण केली आहे, हे नाकारता येणार नाही. ◆◆◆

संदर्भ

१. किशोर सानप , **मराठी कादंबरीतील नैतिकता**, बजाज पब्लिकेशन्स्,अमरावती,१९९८.

२. किशोर सानप, **मराठी कादंबरी :नव्या दिशा**,निर्मल प्रकाशन,नांदेड,२००५.

डॉ. किशोर सानप

कमला नेहरू शाळेजवळ,रामनगर,
वर्धा-४४२००१
भ्रमणध्वनी : ९३२६८८०५२३,
९४२२८९४२०५

अनुक्रमणिका

।। निमित्त : अमृतमहोत्सव ।।



डॉ. उषाताई देशमुख : व्यासंगाची अमृतगाथा

▌प्राचार्य मदन धनकर

महाराष्ट्र शासनाच्या तत्कालीन प्रसिद्धी संचालनालयात काम करीत असताना १९६६ साली नागपूर महाविद्यालयात सुरू झालेल्या मराठीच्या स्नातकोत्तर वर्गात दाखल झालो. व्यावसायिक कार्यालयातील माझे मित्र राम गुग्गूसकर यांचेसह महाविद्यालयीन अभ्यासात पडलेला खंड विसरून वर्गात मनःपूर्वक सहभागी झालो. प्रसिद्धी विभागात रूजू झालो तेव्हा 'सुसंगती सदाघडो' चा अनुभव आला तर नागपूर महाविद्यालयात 'सृजन वाक्य कानी पडो' चा रियाज सुरू झाला.

नागपूरातील सर्व सर्वोत्तम प्राध्यापकांची एकत्र उपस्थिती म्हणजे कनवाळू मांदियाळीच. प्राचार्य डॉ. मा.गो.देशमुख होते. नागपूर महाविद्यालयातील प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध, डॉ. सुरेश डोळके, डॉ. उषाताई देशमुख, डॉ. मालती पाटील तर बाहेरील डॉ. अ.ना.देशपांडे, डॉ. द.भि.कुळकर्णी, प्रा. श्री.मा.कुळकर्णी व प्रा. भा.श्री. परांजपे यांच्या अध्यापनाचा लाभ माझा जीवनयोगच असल्यामुळे अध्ययनातील रूची वाढून त्यास दिशा मिळाली.

प्राचार्य डॉ. मा.गो.देशमुख अध्यापक म्हणून लाभले. प्राचार्य निवास महाविद्यालय परिसरातच असल्यामुळे

चर्चेसाठी भेट सुलभ होती. दोन वर्षाच्या काळात डॉ. उषाताईनी पहिल्या वर्षी विशेष ग्रंथकार हरिभाऊ आपटे तर दुसऱ्या वर्षी अर्वाचीन कवितेतील काही भाग शिकवला. वर्गातील त्यांची उपस्थिती विद्यार्थ्यांचा अध्ययनातील आत्मविश्वास वाढवणारी असे. सलग दोन वर्षे त्यांच्या अध्यापनाचा लाभ झाला. डॉ. उषाताईंच्या व्यक्तिमत्वातील दोन वैशिष्ट्ये सर्वप्रथम जाणवली ती अगत्य व आत्मियता. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाबद्दल अगत्य व आत्मियता बाळगत असताना अध्यापन विषयाशी असलेले त्यांचे अनुसंधान अध्यापन विषयाशी एकरूप असलेल्या ज्ञानोपासनेचे वलय घेऊन होते. पुढे चर्चासत्रे व प्राध्यापक परिषदांची व साहित्य संमेलनाची अधिवेशने यात त्यांची भेट होत राहली. त्यात या बाबींचा मी सतत अनुभव घेतला. आजही कौटुंबिक विचारपूस होते तशी अभ्यास चौकशी देखील.

मुंबई विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागात त्यांनी अध्यापन केले. अध्ययन, अध्यापनासोबत त्या सतत लिहीत आहेत. अध्यापन व लेखन यांना मर्यादा घालून शिकवणारे प्राध्यापक असतात. पण आपल्या अध्ययन - अध्यापनाला स्थलकाल आणि वाङ्मय प्रकाराच्या मर्यादा न घालता त्यांचा व्यासंग व लेखन सुरू राहिले. त्यामुळे त्यांच्या अध्यापनविषयात जशी समग्रता राहिली तशी लेखनविषयात देखील आली. महानुभाव, वारकारी व राम (समर्थ) संप्रदाय व त्यातील ग्रंथकार यांच्याबद्दल त्यांनी विपुल लेखन केले. तसेच अर्वाचीन कवी, नाटककार, ललित लेखक, समीक्षक व संशोधक यांच्या लेखनाची साक्षेपी समीक्षा केली. अनेक संपादनातून आपल्या चौफेर व्यासंगाचा प्रत्यय मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना दिला आहे. मिळेल तो विषय लेखनगम्य करण्याची सिद्धता त्यांनी बाळगली. साहित्य, संगीत व कला यांच्या अभिरूची संपन्न माहेरचा वारसा पुढे आपल्या लेखनातून अभ्यासकापुढे मांडला.

'मराठीचे साहित्यशास्त्र रामदास ते रामजोशी' हा ग्रंथ म्हणजे डॉ. मा.गो.देशमुख यांच्या 'मराठीचे साहित्यशास्त्र ज्ञानेश्वर ते रामदास' या ग्रंथाचा सक्षम व गौरवास्पद उत्तरार्धच. डॉ. श्री.व्यं.केतकर यांच्या 'महाराष्ट्रीयांचे काव्य परीक्षण' पासून उषाताईंच्या प्रबंधाचा परामर्श घेताना प्राचार्य राम शेवाळकर यांनी 'गुरू माऊली' म्हणूनच त्यांना अभिवादन केले. आपल्या आचार्य पदवीच्या प्रबंधातून त्यांनी डॉ. देशमुखाचे साहित्यशास्त्रीय कार्य केवळ पुढे नेले नाही तर पूर्ण केले.

डॉ. उषाताई देशमुख यांच्या नावावर ४० वर ग्रंथ आहेत. प्राचीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास करण्यासाठी वेद, उपनिषदे हे आर्ष ग्रंथ, रामायण, महाभारत ही महाकाव्ये आणि भागवतासारखे महापुराण यांच्या अभ्यासाची पार्श्वभूमी हवी. त्यामुळे संस्कृतचाही अभ्यास हवा तो त्यांनी केला. वेद व उपनिषदे यांच्या तत्त्वज्ञानाचे सार ग्रथित करणारी भगवतगीता अभ्यासकांना टाळता येत नाही. भारतात विद्यापीठे सुरू झालीत. ब्रिटीश राजवटीने उच्च अभ्यासाची दारे मोकळी करताना तत्त्वज्ञान विषयाच्या अभ्यासाला प्राधान्य दिले. कारण भारतीय तत्त्वज्ञानाचे प्राचीनत्व, जागतिक प्राश्र्वभूमी आणि असाधारण वैश्विक मान्यता. विद्यापीठाच्या पातळीवर मराठी साहित्याचा अभ्यास नंतर आला. गुरूदेव डॉ. रा. द. रानडे, प्राचार्य शं. वा. उर्फ सोनोपंत दांडेकर यांच्यापासून के.वि.बेलसरे यांच्यापर्यंतचे अभ्यासक - संशोधक मूलतः तत्त्वज्ञानाचे अभ्यासक होते.

प्राचीन मराठी वाङ्मयाला तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा जसा आयाम आहे तसा सांप्रदायिक किंवा पंथीय दृष्टीकोनाचाही आहे. शंकरस्वामी शिरूरकर, वासुदेवबाबा देहूकर, विष्णुबुवा जोग बंकटस्वामी यांच्यापासून तर किसन महाराज साखरे व बाबा महाराज सातारकर यांच्यापर्यंतच्या तपस्वी अभ्यासकांनी पंथीय

पावित्र्याचा ध्वज फडकवत ठेवला आहे. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांसाठी नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त व समर्थ (राम) या पाच पंथाच्या विचार-आचारांची दिशा लक्षात घ्यावी लागते.

१९१० साली इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांनी महानुभावांच्या सांकेतिक लिपींचे कोडे उलगडले त्यानंतर पंथातील आचार्य व पंथाबाहेर असणारे अभ्यासक यांच्या संशोधन- अभ्यासाला नवी पण व्यापक दिशा लाभली. विदर्भात य.खु.देशपांडे, हरिभाऊ नेने, वा.ना देशपांडे व नी.ब.भवाळकर यांनी संशोधन सुरू केले. डॉ. वि. भि. कोलते या क्षेत्रातील मानदंड आहेत. डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. सुरेश डोळके, डॉ.यु.म.पठाण यांच्यापासून सांप्रदायिक अभ्यासक मुरलीशास्त्री आराध्ये ते नागराजबाबा यांच्या पर्यंतच्या अभ्यासकांचा परामर्श आवश्यक आहे. अलीकडे तर या क्षेत्रातील संशोधकांची संख्या खूपच कमी झाली आहे.

या पार्श्वभूमीवर २००५ साली डॉ. उषाताईंचे प्रकाशित दोन ग्रंथ विचारात घेतले पाहिजेत. 'महानुभाव साती ग्रंथ' आणि 'महानुभाव साहित्य दर्शन' यात त्यांनी विस्तारपूर्वक परामर्श घेताना महानुभाव पंथ व वाङ्मय याचे अनुपम दर्शन घडविले आहे. महानुभाव पंथ द्वैती आहे. वैदिक व अवैदिक यासंबंधी डॉ. वि.भि.कोलते यांनी ''श्रीचक्रधर स्वामींनी स्थापना केलेला पंथ अवैदिक आहे. तथापि श्रीचक्रधर स्वामी वैदिक नसले तरी त्यांनी वेदांना विरोध केला नाही तसेच त्यांचा अनादर किंवा उपहास केला असे मात्र नाही.'' असा निर्वाळा दिला आहे. मराठी भाषेला धर्मभाषा म्हणून महानुभावांनी प्रतिष्ठा दिली. ग्रंथभाषा म्हणून पुरस्कार केला. स्त्रीया व अस्पृश्य यांच्या संबंधी उदार भूमिका घेतली. महानुभाव पंथाशी आपली नाळ कायम राखून असलेली कितीतरी कुटुंबे, पूर्वास्पृश्य समाजातील आजही विद्यमान आहेत. एवढेच नव्हे तर डॉ. तु. वि. गेडाम यांच्यासारखे शिक्षण महर्षी पंथासंबंधीचे आचार-विचार विषयक प्रबोधन कार्यात सक्रीय आहेत.

डॉ. उषाताई देशमुख यांनी या दोन ग्रंथाच्या रूपाने आजवर झालेला महानुभाव पंथ व साहित्य यांचा अभ्यास त्यातील अद्यतन संशोधन व बारकावे यांच्यासह मांडून दाखवला आहे. महानुभाव साती ग्रंथ (१) रूक्मिणी स्वयंवर-नरेंद्र कवी (२) शिशुपाल वध - कवीश्वर भास्करभट्ट बोरीकर (३) उद्धवगीता - कवीश्वर भास्करभट्ट बोरीकर (४) वछाहरण - दामोदर पंडित (५) सह्याद्रिवर्णन - रवळो व्यास (६) ज्ञानप्रबोध - विश्वनाथ बाळापूरकर आणि (७) रूद्धिपूर वर्णन - नारो व्यास उर्फ नारायण पंडित आहेत. कृष्ण-रूक्मिणी विवाह कथा असलेले संस्कृत ग्रंथ, मराठी काव्य व महानुभाव काव्य अशी मांडणी करून त्यांची वैशिष्ट्ये विशद केली आहेत.

गीतामहात्म्य व श्रीकृष्णमहात्म्य वर्णन करणारे ज्ञानेश्वर आणि दामोदर पंडित यांनी दिलेल्या दृष्टांतातील साधर्म्य त्यांनी दाखवून दिले. गणेश वंदन, शारदावंदन करून विषय प्रवेश करण्याची मंगलचरणाची पद्धती ज्ञानेश्वरी व महानुभाव काव्यग्रंथात सारखीच दिसते असा निर्वाळा देऊन मराठी भाषेचा अभिमान, संतमहंताचा आशीर्वाद, कथेची वैशिष्ट्यपूर्णता, भक्तीरसाचा परिपोष, वर्णनात्मकता, ईश्वरचिंतन, श्रोतावंदन या संदर्भात ज्ञानेश्वरी आणि साती ग्रंथ यामध्ये बरेच साम्य असल्याचे त्यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. हे दोन्ही ग्रंथ त्यांच्या सखोल व्यासंगाची साक्ष आहे. साती ग्रंथात कृष्णभक्ती आणि चक्रधर स्वामी भक्ती एकरूप असून कृष्णगौरव व स्वामीगौरव या धाग्यांनी साती ग्रंथ विणले आहेत असा निर्वाळा व निष्कर्ष त्यांनी दिला आहे.

'महानुभाव साहित्य दर्शन' मध्ये एकूण १५

अनुक्रमणिका

लेख आहेत. पंथ व तत्त्वज्ञान यांचा आदर त्यांचे लेखनात आहे. असीम काव्य प्रेम, साहित्यशास्त्रीय अभ्यासाची पक्की बैठक आणि रसज्ञ समीक्षकाची भूमिका यामुळे ग्रंथाची विश्वसनीयता व वाचनीयता समृद्ध झाली आहे. यातील १५ लेख म्हणजे महानुभाव साहित्यावर विविध प्रकारे टाकलेले १५ प्रकाशझोतच आहेत. वादांपासून मुक्ती, साहित्यसमीक्षेची रसाळ संगती आणि समग्र महानुभाव साहित्य कवेत घेण्याची शक्ती या लेखांच्या विवेचनात आहे. महानुभाव साहित्य विवेचनात अखेरचा शब्द ठरावा अशी या दोन्ही ग्रंथांची मांडणी आहे.

संत वाङ्मयाच्या प्रभावी भाष्यकार म्हणून डॉ. उषाताई देशमुख मराठी वाचकांना परिचित आहेत. वारकरी पंथाने 'अवघी दुमदुमली पंढरीचा' प्रत्यय सर्वांना दिला आहे. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकाराम गाथा वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी आहे. ज्ञानेश्वरी आणि ज्ञानेश्वर महाराज महाराष्ट्राचे संजीवक सामर्थ्य आहे. 'ज्ञानेश्वरी एक शोध', 'ज्ञानेश्वरी चिंतन' आणि 'ज्ञानेश्वरी विलसिते' असे त्यांचे तीन ग्रंथ रसिकमान्य झाले आहेत. त्यानंतर 'भावगंध ज्ञानेश्वरीचा' हा ग्रंथ दोन वर्षापूर्वी प्रकाशित झाला. गीतेचे वर्णन सर्वांनी श्रुती माऊली म्हणून केले आहे. वेदार्थसागर भगवंताचे निश्वसित आहे, तर गीता 'स्वयं श्री सर्वेश्वरु प्रत्यक्ष अनुवादला' स्वरूपाची असल्यामुळे साक्षात ईश्वरोपदेश आहे. गीता सर्वांगाने प्रबोधन आहे.

डॉ. उषाताई देशमुख यांचे ज्ञानेश्वरी विषयक लेखन समग्रतेचा शोध घेणारे आहेत. त्यांची साहित्यशास्त्रीय बैठक निश्चित आहे. अध्यात्मशास्त्रीय बैठक समजून घेण्याइतके त्यांचे मन संवेदनशील आहे. पंथीय किंवा सांप्रदायिक बैठक विचारात घेण्याइतके त्यांचे मन उदार आहे. ज्ञानेश्वरीतील भक्तीमार्ग स्पष्ट करणारा भावबंध त्यांनी जपला आहे. ज्ञानेश्वरीतील साहित्यधर्म उलगडून दाखविण्याइतपत रचनाबंधाचे त्यांना भान आहे. ज्ञानदेवीतील ज्ञानमार्गाचे महत्त्व विशद करण्याइतका तत्वबंध त्यांनी अभ्यासला आहे. आणि ज्ञानेश्वरीतील कर्ममार्गाचे विवेचन करण्यासाठी आवश्यक आचारबंधाचा त्यांना परिचय आहे. त्या रसज्ञ अभ्यासक आहेत. त्यांची दृष्टी व्यापक व राष्ट्रीय म्हणजे भारतीय पातळीचा वेध-विचार घेणारी आहे.

धर्म,पंथ,जात यांच्या अभिनिवेशाला बाजूला सारून साहित्य ग्रंथाकडे पाहणारी त्यांची दृष्टी व्यापक व विशाल आहे. उपस्थित विषयाचे तलस्पर्शी विवेचन करणारी, भावगंगेत सुस्नात होणारी पण वाहून न जाणारी आहे. ज्ञानेश्वरीच्या १८ अध्यायांचा परिचय त्यांनी 'चकोरतलगे' हळूवारपणे करून दिला. उपक्रम व उपसंहार अशा शास्त्रीय पद्धतीपासून तर भावगंधाच्या मानसिक अवस्थेपर्यंतच्या सर्व पातळीवर ज्ञानेश्वरीच नव्हे तर सर्व संत वाङ्मयाचा ठाव घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. ही त्यांची स्वतंत्र अभ्यासदृष्टी आहे.

'मांदियाळी', 'अवघी दुमदुमली पंढरी' व 'संत काव्य संचित' ग्रंथातील लेखातून या सर्वांचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. संत मंडळातील नामदेव, मुक्ताबाई, जनाबाई, चोखामेळा व बहिणाबाई यांच्या वाङ्मयाची त्यांनी वेधक समीक्षा केली आहे. भागवत धर्माचे आधारस्तंभ एकनाथ महाराज आणि कळस संत तुकाराम महाराज यांच्या ग्रंथावर, जीवन कार्यावर त्यांनी विस्तृत प्रकाश टाकला आहे.

'पसायदाना'वर भाष्य करणारे त्यांचे स्वतंत्र विवेचन आहे. संस्कृत काव्यात महाकवी कालिदासाचे 'मेघदूत' रसिकांचे मनोज्ञ आकर्षण आहे. जीवनाच्या विभिन्न क्षेत्रातील अभ्यासकांनी मेघदूतचा अनुवाद करून मान्यतेची मोहोर ठायीठायी उमटवली आहे. तसेच पसायदान आहे. सांप्रदायिक दृष्टीने किंवा आध्यत्मिक पार्श्वभूमी घेऊन शिरीष शांताराम कवडे यांनी दिलेल्या

उत्कृष्ट २४ प्रवचनांचा संग्रह 'हा होईल दान पसावो' ग्रंथात आहे. सुमारे साडेपाचशे पृष्ठांचा ग्रंथ उपासकांना अनेक ठिकाणी अंतर्मुख करणारा आहे. संत काव्याचे अभ्यासक डॉ. यशवंत पाठक यांचे पसायदान विवेचन मराठी भाषा विलासाचे हृद्य दर्शन घडवते. त्या पार्श्वभूमीवर ७५ पृष्ठात डॉ. उषाताईंनी पसायदानाचे मर्म उलगडून दाखविले आहे.

पसायदानाचे वैश्विक प्रार्थना मूल्य समजावून सांगताना त्या प्रथम ज्ञानेश्वरीची अपूर्वता व आकृतिबंध विचारात घेतात. ज्ञानेश्वरीतील प्रत्येक अध्यायाचे प्रास्ताविक विचारात घेऊन गीतारत्न प्रासादाच्या कळसातील अर्थ चिंतामणी वाचकांच्या हाती सोपवतात. एकाध्यायी गीतेच्या कळसाचे रचनावैभव व पावित्र्य समजावून सांगतात. महाकवीच्या वैश्विक प्रतिभेवर लक्ष केंद्रित करताना काव्यरचनेची प्रक्रिया स्पष्ट करतात. प्रसाद किंवा प्रासादिक काव्यनिर्मितीमागील रचनेचा शोध अभियंत्याच्या जिज्ञासेने त्यांनी घेतली आहे. रचना सौष्ठव लक्षात घेतल्याशिवाय कळसाचे अपूर्व, वंदनीय पावित्र्य कळणार नाही. यादृष्टीने ज्ञानेश्वरीतील मानव चारित्र्याची त्यांना भावलेली कल्पना महत्त्वाची व नेमकी आहे. जीवनव्यवहार व ग्रंथविचार यांच्या एकात्म अनुभवातून मानव चारित्र्याची संकल्पना साकार झालेली दिसते. व्यवहार म्हणजे संसारकार्य. संसारातील नित्याची कामे पार पाडताना ग्रंथातून आलेले विचार आपल्याला मदत करतात काय? आपल्या जडणघडणीस हातभार लावतात काय? याचा शोध घेण्याचा प्रयत्न यात आहे. वाङ्मय वाचन, अध्ययन ही जर एक यात्रा असेत तर त्यातून मानव चारित्र्य आकार घेऊ शकते.

संत एकनाथ महाराज म्हणजे भागवत धर्ममंदिराचा आधारस्तंभ. ज्ञानेश्वरी अर्जुनाला केलेला उपदेश आहे तर एकनाथी भागवत उद्धवाला केलेला उपदेश. उषाताईंच्या 'नाथवाणी' लेख संग्रहात संत एकनाथविषयक १२ लेख आहेत. 'ज्ञानाचा एका' असे सर्वांनी मान्य केले आहे. 'ज्ञानाची नीतीशी सेसभरी' असे धर्मकार्याचे मर्म ज्ञानेश्वरांनी सांगितले. धर्मकार्य म्हणजे नीतीनियमांचे पालन हे एकनाथांनी आपल्या जीवनकार्यातून सिद्ध केले. नाथांना दीर्घायुष्य लाभले. त्यांनी विपुल ग्रंथरचना केली. अंतःकरण प्रवृत्तींना स्वच्छ करून स्वभावतःच सद्गुणांचे आचरण करणारी मानसिकता नाथांना तयार करायची होती. नाथांची नीतीमत्ता सामाजिक संबधातून कर्तव्यरूपाने उगम पावते, निःस्वार्थीपणाने त्यामध्ये विकास पावते आणि अखेर सर्वात्मभावरूपाने अध्यात्मात विलीन पावते हे लक्षात घेतले तर त्यांची भारूडे समजतात, लोक शिक्षणासाठी लोककलांचा आधार घेत काव्यरचना व्यापक जनतेपुढे त्यांनी ठेवली. भावार्थ रामायण आणि रूक्मिणी स्वयंवर कथा काव्यांना तत्कालीन प्रतिमा-प्रतिकांचा साज चढवून एकनाथांनी सादर केले. 'नाथवाणी' तील लेख याच पार्श्वभूमीवर लक्षात घेतले पाहिजे.

डॉ. उषाताई देशमुख यांनी गद्य-पद्य ग्रंथाची जशी समीक्षा केली तशी आधुनिक कवी, नाटककार व अभ्यासक यांच्यासंबंधी विस्तृत लिहले. त्यात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांच्या संबंधी त्यांची तीन पुस्तके वाचकाप्रत पोचली आहेत. 'कुसुमाग्रज साहित्य दर्शन', 'कुसुमाग्रज एक प्रकाशयात्रा' व 'गर्जा जयजयकार एक जागरण' या पुस्तकांचा समावेश करावा लागेल. काव्याभ्यासक म्हणून कुसुमाग्रजांची कविता व नाटके यांचा अभ्यास त्यांनी केला. प्रसंगी पत्रव्यवहार करून खुद्द कुसुमाग्रजाशी चर्चा केली. 'क्रांतीचा जयजयकार' कवितेला प्रेरक चिरंतन मूल्य आहे. 'क्रांतीचा जयजयकार' कवितेवरील लेखांचे स्वतंत्र संपादन त्यांनी केले आहे. पूर्वरंग व उत्तररंग अशा दोन विभागात हे संपादन आहे. पूर्वरंगात कवितेचा पुनःशोध घेणाऱ्या समीक्षालेखांचा समावेश असून

उत्तररंगात कविता कशी भावली यासंबंधी स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी व्यक्तींची मनोगते आहेत. कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' काव्य संग्रहास १९९२ साली ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त 'विशाखा अर्घ्यदान' ग्रंथाचे त्यांनी संपादन केले आहे. 'वाङ्मयीन व्यक्ती', 'साहित्य चिंतन', 'स्नेहबंध' व 'प्रियोळकर आणि संशोधन' ही त्यांची संपादने प्रसिद्ध आहेत. 'वाङ्मयीन व्यक्ती' आणि 'साहित्य तोलन' ही दोन्ही पुस्तके डॉ. मा.गो.देशमुख यांच्या लेखांची संपादने आहेत. 'स्नेहबंध' हा डॉ. वि.भि.कोलते यांच्या लेखांचा त्यांनी संपादित केलेला संग्रह आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सदस्य झाल्यावर दुसरे सदस्य आळंदीच्या साधकाश्रमाचे किसन महाराज साखरे यांच्या पुढाकाराने श्रीज्ञानेश्वर महाराज संजीवन महासमाधीची पूजा बांधताना उषाताईंच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. दुर्मिळ असणारी हीच संवेदनशीलता त्यांच्याठायी कायम आहे. समर्थ रामदासस्वामी यांच्या कवितेची वैशिष्ट्ये मांडणारे त्यांचे काही लेख समर्थांवर प्रकाशित अन्य संपादनात आले आहेत. श्रीधर आणि मध्वमुनी यांच्या कवितेवर त्या जेवढी मार्मिक समीक्षा करतील तेवढेच मार्मिक गोविंदाग्रज व बी कवी (नारायण मुरलीधर गुप्ते) यांच्यासंबंधी लिहितील. खंडनमंडनापेक्षा प्रतिपादनावर त्यांचा अधिक भर असतो. विषयाशी एकरूप होऊन केलेला अभ्यास त्या मांडतात. गुणदोष विवेचनात गुणदर्शनावर भर देऊन पूर्वसुरींचा सन्मानपूर्वक उल्लेख करतात. मनामध्ये संपूर्ण व्याख्यानाने ठाण मांडल्याशिवाय त्या वर्गात विद्यार्थ्यांसमोर उपस्थित होत नाहीत. मोठ्या गायकाच्या गळ्यात बसलेला पूर्ण ख्याल जसा त्याच्या बारकाव्यांसह समग्रपणे श्रोत्यांसमोर मूर्तिमान होतो तसे वर्गातील त्यांचे व्याख्यान असते. यातून त्यांच्या अभ्यासाला असलेली शिस्त जाणवते. मोठ्या कवींच्या गाजलेल्या कवितावर त्यांचे स्वतंत्र लेख आहेत. त्यात 'पिंगा' व 'चाफा' यासारख्या कविता आहेत. तशी 'शांतता कोर्ट चालू आहे' आणि 'लोककथा ७८' यासारखी नाटके आहेत.

अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'मैत्र'मध्ये विनोबा भावे, साने गुरूजी, तुकडोजी महाराज, अ.का. प्रियोळकर व डॉ.वि.भि.कोलते यांच्या साहित्यावर स्वतंत्रपणे लिहिले आहे. त्यात लेखनविषय वाचकांना आकलनासाठी सहज व्हावा याकरिता त्यांच्या वाङ्मय संपदेचे वर्गीकरण केले आहे. इंदिरा संत यांच्या कवितेवर लिहिताना, सावित्रीबाई फुले व अनंत काणेकर यांच्या लघुनिबंधावर देखील लिहिताना त्या तत्पर असतात. श्री. ना. बनहट्टी व चंद्रकांत बांदिवडेकर यांच्यासंबधी सन्मानाने लिहितील कारण श्री.ना.बनहट्टी, डॉ.मा.गो. देशमुख यांचे विद्यागुरू तर चंद्रकांत बांदिवडेकर हिंदी-मराठीचे सेतू म्हणून.

'कल्पतरूचे आरव' मध्ये १८ व्यक्तीसंबंधी त्यांनी चोखंदळपणे लिहिले आहे. मधुकर केचे, प्राचार्य राम शेवाळकर व डॉ. सुरेश डोळके, डॉ. मा.गो. देशमुख त्यांचे विद्यार्थी डॉ. द.भि.कुळकर्णी प्रत्यक्ष विद्यार्थी नसले तरी त्यांच्या व्यासंगाबद्दल आत्मियता आहे. वा.ल.कुळकर्णी त्यांचे विद्यागुरू. या सर्वासंबंधी त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व वाचकापुढे ठेवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या साऱ्यात लेखात जिव्हाळा व मनःपूर्वकता आहे. भ.श्री.पंडित यांच्यासारखे बहुभाषिक तर माधव आचवल यांच्यासारखे कलामीमांसक आहेत. डॉ.वि. भि.कोलते यांच्यासंबधी लिहिताना ''साहित्याचे संशोधन ही एक अतिशय व्यापक अशी संज्ञा आहे. ही एक ज्ञानात्मक बुद्धिगम्य अभिक्रिया ठरते. इतर ज्ञानशाखांच्या साह्याशिवाय साहित्याचे संशोधन परिपूर्ण होणार नाही''हा अभिप्राय संशोधन क्षेत्रातील साऱ्यांनाच मार्गदर्शक ठरणारा आहे.

अनुक्रमणिका

'कल्पतरूचे आरव' या लेख संग्रहात पत्र पंडित व कादंबरीकार ग.त्र्यं.माडखोलकर यांच्या साहित्यिक कर्तृत्वाचे गमक त्यांनी ''संस्कृत साहित्यशास्त्राचा उत्तम अभ्यास आणि इंग्रजी साहित्याचे आणि साहित्य समीक्षेचे उत्कृष्ट आकलन यांच्या संयोगातून माडखोलकरांची समीक्षा आणि साहित्य विचार स्फुरलेला आहे.'' असे नेमके दिले आहे. ग.त्र्यं.माडखोलकर यांनी डॉ.मा.गो.देशमुख यांचा 'भावगंध' सिद्धांत अमान्य केला. एवढेच नव्हे तर त्यावर टीका केली. परंतु माडखोलकरांची टीका मनावर न घेता. 'माडखोलकर व्यक्ती आणि वाङ्मय' पुस्तक साहित्य अकादमीसाठी ह्यांनी सिद्ध केले. जेष्ठ पत्रकार – साहित्यिक यांच्यावरील लेखनाचा वस्तुपाठ म्हणून या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. माडखोलकरांच्या वाङ्मयाचे योग्य व नेमके मूल्यमापन यात आहे.

डॉ. उषाताईंचे व्यक्तीगौरव लेख, गौरवग्रंथ व अन्य कारणास्तव प्रसिद्ध झाले. संदर्भमूल्य सांभाळून एरव्ही संशोधनाभिमुख असलेली समीक्षा त्यांनी वाचकांपुढे सतत ठेवली आहे. त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा आणि व्यक्तित्वाचा गौरव करण्यासाठी 'साहित्यव्रती' नावाचा सद्भाव ग्रंथ १६ जून २००१ साली प्रकाशित झाला आहे. डॉ.द.भि.कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. नंदिनी बाळ व डॉ.सुलभा हेर्लेकर यांनी त्याचे संपादन केले आहे. त्यातील पहिल्या 'स्नेहबंध' विभागात त्यांच्या सोज्वळ व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे १२ लेख आहेत. त्यात डॉ. विजया राजाध्यक्ष, डॉ.हे.वि.इनामदार, प्राचार्य वसंत पाटील, प्राचार्य राम शेवाळकर, सौ. आशा बगे, सौ. नीला उपाध्ये व डॉ. सुशीला पाटील यांनी आपले मन मोकळे करताना भरभरून आदर व स्नेह यांचा उत्सवच केला आहे. वाङ्मय चिंतन विभागात डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. अनंत अडावदकर, डॉ. श्यामला मुजुमदार, डॉ. आशा सावदेकर व डॉ. वा.पु.गिंडे यांनी उषाताईंच्या वाङ्मय सेवेचा गौरव केला आहे. 'आमची बाई' यात त्यांच्या विद्यार्थिनींनी ओतप्रोत जिव्हाळ्याने लिहिले आहे.

'वारसा' विभागातील लेख आप्तांची आपुलकी व्यक्त करणारे आहेत. ह्यातील नातीगोती व रेशीमगाठी यातून उषाताईंचा होणारा परिचय मनोज्ञ आहे. माहेर–सासर उभय बाजूनी असलेली संपन्न सांस्कृतिक पार्श्वभूमी विलोभनीय आहे. डॉ. प्र. न. जोशी व डॉ.निशिकांत मिरजकर यांनी अभीष्टचिंतन केले आहे. संसारातील विविध भूमिका पार पाडताना साहित्योपासनेचे व्रत त्यांनी सांभाळल्याचे तेजस्वी दाखले यात आहेत. संशोधनशास्त्र, पाठचिकित्सा यांच्यापासून तर नवे जुने सर्व विषय आपल्या भावसंपन्न समीक्षेने समृद्ध करणाऱ्या उदार व रसपूर्ण समीक्षेचा दाखला वाचकांच्या पदरी पडतो. वाङ्मयेतिहास व साहित्य विचार यांचा अनुबंध कायम राखून त्यांची समीक्षा प्रभावीपणे प्रतिपाद्य विषयाला वैचारिकतेचे वरदान देते.

'साहित्यव्रती' मध्ये 'संवादिनी'त त्यांची प्रदीर्घ मुलाखत डॉ. द.दि.पुंडे यांनी घेतली आहे. ही संपूर्ण मुलाखत सद्भाव ग्रंथाच्या केंद्रस्थानी आहे. बारा भागातून सुमारे २५ पृष्ठात शब्दबद्ध झालेली मुलाखत त्यांच्या वाङ्मयीन व्यासंगाची गाथा आहे. प्रस्तुत मुलाखतीत त्यांनी समीक्षा व संशोधन या वाङ्मयविषयक व्यापाराच्या दोन स्वतंत्र पध्दती असल्याचे नमूद केले आहे. मराठीची स्वतंत्र संशोधन विद्या निर्माण होणे – करणे अपरिहार्य आहे. समीक्षेमुळे संशोधनाच्या नव्या दिशा आकळत जातात, संशोधनाची नवी परिक्षेत्रे दृष्टीपथात येतात हे स्पष्ट करून त्याचा पुरस्कार केला, एवढेच नव्हे तर त्यादृष्टीने नव्या अभ्यासकांना मार्गदर्शनाची तयारी ठेवली आहे.

अनुक्रमणिका

मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागात मराठी भाषा व साहित्य विषयात त्यांनी ३५ वर्षे अध्यापन केले. विभाग प्रमुख म्हणून त्या निवृत्त झाल्यात. नवी दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान मंडळाने गौरववृत्ती देऊन सुप्रतिष्ठ प्राध्यापकाचा दर्जा व सन्मान दिला. मुंबई विद्यापीठात अध्यापन सुरू करण्यापूर्वी महाविद्यालयातून त्यांनी अध्यापन केले. अध्यापन आणि ग्रंथ निर्मिती दोन ध्रुव नसून व्यासंगाची परस्पर पूरक दोन टोके आहेत हे त्यांनी सिद्ध करून दाखविले. वाङ्मयीन अध्ययन किती स्वच्छ, निर्मळ व निर्वैर असू शकते हे दाखवून दिले. दीर्घकालीन सातत्यामुळे त्याला ज्ञानसाधनेचे स्वरूप आले. ज्ञान साधने सोबत मुंबई विद्यापीठात स्वतंत्र भाषा भवनाची त्यांनी निर्मिती केली.

विदर्भ साहित्य संघाने डॉ. उषाताई देशमुख यांची साहित्य सेवा लक्षात घेऊन त्यांना पुसद येथील ४० व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद दिले. 'साहित्य वाचस्पती' गौरव बहाल करून अभिवादन केले. १६ जून रोजी त्यांच्या वयाला ७५ वर्ष पूर्ण झालीत अमृतमहोत्सवा निमित्त या सत्वशील साहित्योपासनेला अभिवादन. ◆◆◆

▌ प्राचार्य मदन धनकर
'हरिवंश'
विद्यानगर, गजानन मंदिर मार्ग,
चंद्रपूर ४४२४०१
भ्रमणभाष ९८८१३०३४१४

।। डॉ. उषा माधव देशमुख यांची ग्रंथसंपदा ।।

स्वतंत्र ग्रंथ :

मराठीचे साहित्यशास्त्र : रामदास ते रामजोशी (१९७२).
साहित्यरंग (१९७४).
दीपमाळ (१९८२).
मराठी साहित्याचे आदिबंध (१९८२)
काव्यदिंडी (१९८७).
साहित्यशोधणी (१९८९).
कुसुमाग्रज साहित्यदर्शन (१९८९).
साहित्यमुद्रा (१९९०).
ज्ञानेश्वरी : एक शोध (१९९०)
कुसुमाग्रज : एक प्रकाशयात्रा (१९९२).
मराठी संशोधनविद्या (१९९४)
माडखोलकर : व्यक्ती आणि वाङ्मय (१९९४).
संतसाहित्य दर्शन (१९९४)
रामायणाचा आधुनिक साहित्यावरील प्रभाव (१९९५).
विविधज्ञानविस्तार साहित्य आणि साहित्यविचार (१९९६).
पसायदान (१९९८).
ज्ञानेश्वरीचिंतन (२०००).
संतकाव्य संचित (२००१).
साहित्यसंचित (२००१)
मांदियाळी (२००१).
नाथवाणी (२००२).
कल्पतरूचे आरव (२००४).
अवघी दुमदुमली पंढरी (२००४).
महानुभाव साती ग्रंथ (२००५).
महानुभाव साहित्यदर्शन (२००५).
ज्ञानेश्वरी विलसिते (२००५).
चांफा ते फुलवात (२००६).
भावगंध ज्ञानेश्वरीचा (२००९).
मैत्र (२०११).

संपादने :

वाङ्मयीन व्यक्ती (१९६७).
साहित्यचिंतन (१९७४).
स्नेहबंध (१९९४).
गर्जा जयजयकार : एक जागरण (१९८९).
ज्ञानेश्वरी दर्शन (१९९८).
वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास (१९९४).
मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास – खंड १ व २ (१९९५).
प्रियोळकर आणि संशोधन (१९९५).
विशाखा अर्घ्यदान (१९९६).
दलित साहित्याची स्थितीगती (१९९७).

।। टिपण ।।



सुर्वे यांच्या कवितेतील अध्यात्म : काही विचार

डॉ. शशिकान्त लोखंडे

कवी नारायण सुर्वे यांची कविता जनमानसाला स्वतःची असल्याची वाटू लागली आहे. स्वतःचेच विचार-विकार ही कविता बोलून दाखवित असल्याचा प्रत्यय येऊ लागला आहे. तिच्यातील सरलत्वामुळे ती वाचकांना भावलेली आहे. सुर्वे यांची कविता भौतिकवादी अनुभव मांडते आहे. हा भौतिकवाद सुर्वे यांच्या स्वीकारीत जीवन तत्त्वज्ञानातून अधिक पुनरावृत्त झाला आहे. माणसास केन्द्रवर्ती कल्पून ही कविता वास्तवदर्शन घडवित आहे. निदान तशी जाणीव आहे. 'जाणीवेतून जीवन ठरत नसते तर जीवनातून जाणीव निपजते' म्हणून सुर्वे यांची कविता माणसाच्या संदर्भातच आकार घेते. 'माणूस' हेच त्यांनी 'प्रमाण' मानले आहे. 'माणसाइतका सृजनात्मा मला भेटलाच नाही' असे म्हणत ते जिवंत क्रियाशील जीवनक्रमाची विश्लेषणात्मक बाजू मांडतात. मार्क्स एके ठिकाणी म्हणतो की, 'मानवाच्या प्रतिकूल स्वभावासंबंधी मला काही वाटत नाही. जे जे म्हणून मानुष्यिक त्यातले काहीही मला परके नाही' त्याप्रमाणे सुर्वे यांनी अनुभवाला सत्यत्व देताना जीवनातील विविध अंगांचा शोध घेतलेला आहे. त्यामुळे त्याचे वैयक्तिक जीवन आणि त्यांची अनुभवसत्य कविता यांचा द्वैतभाव आपणास कल्पून चालणार नाही.

सुर्वे यांची कविता ही एका विशिष्ट तत्त्वप्रणालीचा स्वीकार करते. ती तशाच स्वरूपात व्यक्त होताना आढळते. ही तत्त्वप्रणाली उघड उघड 'साम्यवादी' आहे. सुर्वे यांची कविता ही एका कम्युनिस्ट कार्यकर्त्याची आहे, असे अनेक समीक्षकांनी गृहीत धरले आहेच.

'धर्म ही अफूची गोळी आहे' असे मानणारा साम्यवाद धार्मिक तत्त्वज्ञानाला जुमानत नाही. तथापि, भारतीय तत्त्वज्ञान 'आत्मा' आणि 'ब्रह्म' या दोन गोष्टीशिवाय आणखी आहे काय ? तेव्हा 'आत्मा' मानणे म्हणजे ब्रह्म मानल्यासारखेच आहे. आत्मा मानणे म्हणजे अध्यात्म मानणे हे तर्कदृष्ट्या खरे ठरते.

कम्युनिस्ट विचारप्रणालीने हा अध्यात्मवादच बाद ठरविला आहे. तर सुर्वे यांची कविता सूक्ष्मपणे अध्यात्मवादाचाच विचार करते आहे. कार्लमार्क्स ''नीतितत्त्वे, धर्मतत्वे तदसंबंधीत तत्त्वज्ञान व इतर सर्व प्रकारची विचारधारा व त्यांना अनुसरून असलेल्या जाणिवांचे सर्व प्रकार यांना स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व काही नाही, त्यांना इतिहास नाही, त्यांना विकासक्रमच नाही'' असा इशारा देतो. त्या अनुषंगाने सुर्वे यांची 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील कविता तपासताना मला 'सत्य'(पृ.१७), 'एक आम्हीच असे निघालो'(पृ.२०), 'आम्ही आहोत'(पृ. २४), 'बरं कारे पोरा'(पृ.३०), 'गाणे'(पृ.६२), 'असा कसा दगड झालो'(पृ.३३), 'मुंबई'(पृ.३७), 'धीर'(पृ.४२), 'नायक'(पृ.४८), 'कर्जपुत्र'(पृ.५२) ह्या कवितांतून तात्त्विक विसंगती आढळली आहे.

आपण क्रमशः वरील कवितांचाच विचार करू. 'वाकलीस खणा नारळांनी' असे जेव्हा कवी 'सत्य' कवितेत म्हणतो तेव्हा आपणास काय आढळते ? 'ओटी खणा नारळानं भरणे' ही एक हिंदूधर्मीय सांस्कृतिक प्रथा आहे. आणि ही प्रथा कवी उल्लेखतो म्हणजे ती त्याला मान्य नसेल कशावरून ? 'खणा नारळांनी ओटी भरणे' ही तशी धार्मिक प्रथा, परंतु ती कवी कुठेच खोडताना आढळला नाही, तर तो तिचा उल्लेख करतो. म्हणजेच ती 'धार्मिकता' त्यास कुठेतरी खोलवर मान्य आहे असेच दिसते. हे मार्क्सवादी तत्त्वज्ञानात कुठे बसते ? तर दुसऱ्या गटात 'एक आम्हीच असे निघालो' किंवा 'आम्ही आहोत', 'बरं का रे पोरा', 'मुंबई', 'धीर' ह्या कवितांमध्ये 'प्रत्येक रात्र आत्म्याशी चर्चा करण्यात घालविली' (पृ.२०), आत्मा जो प्रत्येकाने दिवस भर तळघरात कोंडलेला असतो 'भूमिगतासारखा' - मी त्याच्याशी रोज बोलतो. कधी, दोघे बाहेरही फिरतो (पृ.२४), 'तो बघा आत्म्याचा बापुस - फुडारी' (पृ.३०), 'चुलाण्यात फटफटावे लाकूड तसा आत्मा चरफडू लागतो' (पृ.३७), 'माझा आत्मा तुझ्या कुडीत ठेव' (पृ.४२).

यात आपणास काय आढळते ? तर आत्म्याचा पुनःपुन्हा उल्लेख. मला कळते त्याप्रमाणे 'आत्म'वाद ही अध्यात्मवाद व पर्यायाने धार्मिक संस्कार स्वीकारल्याची जाणीवच आहे. 'आत्मा तुझ्या कुडीत ठेव !' याच सरळ अर्थ हे आत्म्यांचे संक्रमण मानणे होय. आणि हे संक्रमण म्हणजे पुनर्जन्मावर विश्वास ठेवल्याचे लक्षण नाही काय ? 'धर्म ही अफूची गोळी ठरवणारे' असा आत्मा मानतात तरी कसा ? पुनर्जन्म असा छुपेपणानं 'कमिट' तरी का करतात ? 'मी त्याच्याशी रोज बोलतो' 'आत्माशी चर्चा' वगैरे बाब भोंगळ आहे. आत्मा मानावाच का ? आणि तोही कम्युनिझमचे व्रत घेतलेल्या कार्यकर्त्याने का स्वीकारावा ? आणखी पुढे असे की, उपरोक्त सुट्यासुट्या ओळींतून आपणास एवढेच म्हणता येते की, मार्क्सवादी सुर्वे यांनी धर्मवाद बाद केलेला नाही.

'भरल्या पोटाने उगा पहातो जर चंद्र
आम्हीही कुणाची याद केली असती'(पृ.३२)

याचा अर्थ रित्या पोटाने कुणालाच कुणाचीच याद करता येत नाही आणि 'याद करता येत नाही' यातून सरळपणे 'तसं भाग्य नाही' असाच सूर निघतो. येथे सुर्व्यांनी 'दुर्भाग्य' मान्य केले आहे. 'दुर्भाग्य' मानणे म्हणजे 'दैववाद' नाही का ? हा 'दैववाद' साम्यवादी विचारांना पोषक आहे का ? ग्रीक कलेच्या संदर्भात मार्क्स लिहितो. ''ग्रीकांची प्रतिभा व ग्रीकांची कला ज्या निसर्गविषयक आणि सामाजिक संबंधविषयक दृष्टिकोनातून साकारली तो दृष्टिकोन आजच्या स्वयंचलित यंत्रांच्या, आगगाड्यांच्या, इंजिनांच्या व विद्युत तारायंत्रांच्या युगात शक्य आहे ? रॉबर्ट्स एन्ड कंपनीच्या जोडीला 'व्हल्कन' कुठे बसतो विद्युतशलाकेच्या बरोबर 'हर्मिसंसला' कोणते स्थान आहे ? सर्व पुराणे निसर्गशक्तीवर केवळ कल्पनेत व कल्पनेच्याद्वारा ताबा मिळवतात, प्रभाव गाजवतात व तिला वळण देतात. सहाजिकच जेव्हा माणूस निसर्गशक्तीवर प्रत्यक्ष ताबा मिळवतो तेव्हा ही निव्वळ कल्पना विलीन पावते. समाजात कलांवताची प्रतिभा पौराणिकतेपासून मुक्त असणेच आवश्यक असते.''

परंतु नारायण सुर्वे 'पिशाच्य' (पृ.३३) वगैरे कल्पनांना अस्तित्वावस्था देतात. सुर्वे यांचा 'भाविक भोळे'पणा त्यामुळे उघड झाला आहे. 'नायक' या कवितेत तर सुर्वे सरळ सरळ दैववादच सूचित करतात.

उदा. 'त्याचे दुर्भाग्य पुन्हा त्याच्या वाट्याला त्यांनी आणलेले आहे...'(पृ.४८)


'भाग्य-अभाग्य' यावर सुर्वे विश्वासच कसा ठेवतात ? 'दुर्भाग्य' म्हणजे परंपरागत अज्ञानाची उजळणीच होय. निसर्गावर सुद्धा मनुष्य मात करतोयं, त्यामुळे मार्क्सचा दृष्टिकोन माणसाच्या 'सृजन शक्तीला' प्राधान्य देणारा आहे. 'अपना हाथ जगन्नाथ' या विचाराप्रमाणे स्वतःचा विकास स्वतः घडवायचा असताना भाग्यवादावर दृष्टी का ?

'कर्जपुत्रात' तर अशीच भेदक विसंगती आहे. 'एका पुण्यरात्री' 'पुढे आक्रोशती टाळ', 'पुण्यवंत','कळो आले तेराव्यांत पिंडा शिवला न काक'(पृ.५२) या वरून पुन्हा स्पष्ट होते की, सुर्व्यांच्या ह्या निवडक कविता अजूनही त्यांच्या मनाचा झगडाच छुपेपणाने व्यक्त करीत आहेत. तेराव्यात पिंडाला कावळा शिवणे ही क्रिया धार्मिक भावनेतून निपजते आणि सुर्वे तिचा उल्लेख करून ती धार्मिक भावना अधिक महत्त्वपूर्ण करून ठेवतात. तेव्हा सुर्वे यांची कविता म्हणजे एक वदतोव्याघातच आहे. ◆◆◆

डॉ. शशिकान्त लोखंडे
बी-१२/१०४ शिवम.
लोकप्रभात सहकारी गृहनिर्माण संस्था(मर्यादित),
वॉळीज, आगाशी रोड. विरार (प.).
ता. वसई ४०१३०३. जि. ठाणे.
भ्रमणभाष ९८२०६५२६१२



॥ कथा ॥



धिंगाणा

▌बाबाराव मुसळे

संतोषचे वडील दिवसभराचे परेशान होते. सकाळपासून संतोष गायब होता. तो पाच दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसला होता. सोबत त्याचे वडील होते. म्हणजे ते उपोषणाला बसले नव्हते. तर त्या मंडपात हजर होते. राजू अन् त्याचे संघटनेतील काही मित्रही अधून-मधून जात-येत होते.

त्याच्या आमरण उपोषणासंबंधीच्या बातम्या वर्तमानपत्रांतून येत होत्या एवढंच नाही तर दोन-तीन वाहिन्यांवरूनही त्याच्यासंदर्भात लाईव्ह प्रदर्शन झाले होते. तीन दिवसांपर्यंत त्याला काही वाटले नव्हते. चौथा दिवस उगवला अन् त्याला जास्त थकवा जाणवू लागला. 'संतोष, सोडून दे आमरण उपोषण. जाऊ दे गेली तर आपली एखादी एकर जमीन.' त्याचे वडील म्हणाले, पण संतोषनं ऐकलं नाही.

जिल्हाधिकारी किंवा इतर कुठल्याही अधिकाऱ्यानं त्याच्या आमरण उपोषणाची फारशी दखल घेतली नाही. नाही म्हणायला एक पोलीस त्याच्या मंडपाला दिवसातून दोन-तीन वेळा भेट देऊन जायचा. तसे त्याच्यासोबत आमरण उपोषण किंवा साधं उपोषण करणाऱ्यांचे चार-पाच मंडप होते. त्यातल्या दोन मंडपातल्यांचे प्रश्न सुटले -

अनुक्रमणिका

म्हणजे त्यानां सरकारकडून आश्वासन मिळाले त्यामुळे त्यांचे तंबू उठून गले. बाकीचे राहिले.

तसा संतोषसाठी दबाब निर्माण करण्यासाठी ग्रामीण युवासेनेचे कार्यकर्ते धडपत होते. त्यांची मजल थेट कार्याध्याक्षांपर्यंत पोचली होती. कार्याध्यक्षांनी म्हणे जिल्हाधिकाऱ्यांना तंबी देण्यासाठी फोन केला. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना लक्ष घालतो म्हणून होकार दिला, पण जिल्हाधिकाऱ्यांनी तसं काहीच केलं नाही. त्यांच्यावर आणखी कोणाचा दबाब येत असणार. त्याचं कारण संतोषचा संघर्ष होता तो सत्ताधारी पक्षाच्या आमदाराविरोधात. त्यामुळे ते आमदार थोडेच गप्प बसणार होते ? त्यातही त्यांचा सख्खा साडू मंत्रीमंडळात म्हटल्यावर !

या संघर्षाची सुरूवात झाली तीन वर्षांपूर्वी. संतोष त्यावेळी एम.ए.,बी.एड्. झाला होता. तो नोकरीच्या शोधात होता. एक दिवस त्याला आमदारांचा निरोप आला. तो जिल्ह्याच्या ठिकाणी असणाऱ्या आमदारांच्या बंगल्यावर गेला. हॉलमध्ये त्याला बसविण्यात आलं. तो आल्याची आत वर्दी गेली. त्याला आत बोलावून घेतलं गेलं. आमदारांसोबत आणखी चार-पाच लिडर. त्यात एक बाई. अत्याधुनिक राहणीमान असलेली.

''हा आमच्या गावचा होतकरू तरूण संतोष काळे. त्यानं इंग्रजीत एम.ए. केलं. याचवर्षी बी.एड्. केलं. मास्तरकीच्या शोधात आहे. पवारसाहेब, तुम्ही आज येणार म्हणून त्याला मुद्दाम बोलावून घेतलं. तुमच्या संस्थेच्या चार-पाच शाळा आहेत. त्यापैकी कोणत्याही एका शाळेवर याला चिटकवून घ्या. काय पवारसाहेब, मी म्हणतो तसं करता येईल ?''

''व्वा, तुमचा आदेश अमान्य करण्याची आमची काय बिशाद ? आम्हालाही आमच्या गोरेगावच्या ज्युनिअर कॉलेजसाठी एक इंग्रजी विषयाचा लेक्चरर हवाच होता. बरं झालं, तुम्ही आमचा प्रश्न चुटकीसरसा सोडविला !'' हे एकून तर संतोषची थुंकी गुळ्यातच अटकली. किती कष्टानं त्यानं शिक्षण घेतलं ? बी.एड्. करतांना तर... नागपूरकडच्या एका कॉलेजात दीड लाख रूपये डोनेशन आणि वरून वर्षभर राहायचा खर्च. दोन लाखातच गेलं सारं ते. घरी शेती दहा एकर. त्यातून ओढा गेलेला. त्यात दोन-तीन एकर रान वाया गेलेलं. यावर्षी पावसाळा एवढा झाला की ओढ्याला आलेल्या पुरानं दोन्ही बाजूचं निम्मंशिम्मं शेत खरडून गेलं. उरलेल्या शेतातही फारसं उत्पन्न हाती आलं नाही. संतोषचे वडील धीराचे म्हणून ! नाहीतर त्यांच्याजागी दुसरं कोणी असतं तर आत्महत्या करून मोकळं झालं असतं. अशा परिस्थितीत संतोषच्या नोकरीसाठी प्रयत्न करणं म्हणजे...? डोनेशनाशिवाय मोठ्या संस्था दारात उभ्या करत नाहीत. कारण त्यांना सरकारी अनुदान असते. नवीन ज्युनिअर कॉलेजेस काढणाऱ्या संस्था ह्या संपूर्ण विनाअनुदानित तत्त्वांवरच्या. जुन्या संस्थांमध्ये लागायचं म्हटलं तर बारा-पंधरा लाख रूपये द्या. कोठून द्या ? शेत विका ? म्हणते, पण दोन एकराचे किती येणार ? त्यापेक्षा एखाद्या संपूर्ण विनाअनुदानित संस्थेवर काम करू. दोन-अडीच हजार रूपये महिना देतील. काहीजण एकाचवेळी चार चार ज्युनिअर कॉलेजवर काम करतात. सकाळी-रात्री ट्यूशन घेतात. दहा पंधरा हजार रूपये मागे टाकतात. त्यासाठी ते तालुक्याला व जिल्ह्याला राहतात. आपणही तसं काही करू... ''अरे या भानगडी करण्यापेक्षा लगन कर. कोणी तुला आठ-दहा लाख रू. हुंडा देईल. त्यातून डोनेशन भर..'' चुलता म्हणाला. त्यावर संतोष नुसता हसला...

नोकरीबाबत डोक्यात असा सारखा किडा वळवळत असतांना हे सोन्याचं पिंपळपान अलगद त्याच्या ओंजळीत येऊन पडावं, याचं त्याला नवल वाटलं. पण तरी तो सावध झाला. हा आमदार आपल्या

गावचा, तरी यानं कधी आपल्याला यापूर्वी बोलावून घेतलं नाही. आजच अन् अचानक हे असं का ? राजकारणी लोक वरवर वाटतात तितके सरळ नसतात. त्यातही हा भावकीचा माणूस.

काय संतोष, चालेल तुला ? आमदारांनी विचारलं.

संतोष एकदम काही बोलला नाही, गप्पच राहिला. ते पाहून आमदारांनी प्रश्न केला, काय रे, काही शंका ? तरीही त्यानं तोंड उघडलं नाही. त्यावर आमदारांनी पवार साहेबांना म्हटलं, ''पवार साहेब, याच्या मनात काहीतरी शंका आहेत.''

''हे बघ, मनात कुठलीही शंका बाळगायचं कारण नाही. तुला स्पष्टच सांगायचं म्हणजे गोरेगावच्या ज्युनिअर महाविद्यालयात पुढच्या वर्षी एकजण रिटायर्ड होत आहे. तो ओपनचा आहे, तूही ओपनचाच. त्यामुळे कसली अडचण जाणार नाही. मात्र यावर्षी पुरतं तुला तसंच काम करावं लागेल. राहिला प्रश्न डोनेशनचा. ते यावर्षी नव्हे तर पुढच्या वर्षी पाहू. शिवाय तुमच्या आमदारसाहेबांनी त्याबाबत हमी घेतली आहे. डोनेशनचा सगळा पैसा ते देणार. म्हणजे तोही प्रश्न सुटला..''

संतोषसाठी हा आणखी एक धक्का होता. त्याला पहिल्यांदा एक शंका आली, याच्या नात्यातली एखादी पोरगी आपल्या गळ्यात बांधायची याची योजना आहे की काय ? एखाद्या मेव्हण्याची, साळ्याची किंवा आणखी कोणा नातेवाईकाची ? तसं झालं तर - म्हणजे मुलगी जर आपल्यायोग्य असेल तर आपल्याला काही हरकत नाही. असा प्रकार संस्थेवाले नेहमी करतात. संस्था आमदारांच्या मित्राचीच म्हटल्यावर त्यांनी असा काही निर्णय घेतला तर त्यात गैर नाही. एवढंच की ती काळी-बेंद्री, आंधळी-हेकनी, लंगडी-खुळी नसावी.

''अरे, बोल ना काही ? आमदार जोर देऊन बोलले. यासाठी मी तुझ्या वडलांना - सखारामकाकांनाच बोलावून घेणार होतो, पण म्हटलं त्यांना यातलं किती कळेल, किती नाही ? म्हणून तुला बोलाविलं. तर तू असा मुका...''

सांगतो चार-सहा दिवसांत, असं सांगून संतोष उठला. घरी आला, आईला-वडिलांना त्यानं हे सारं सांगितलं. शेषराव पाटलाचा जया तसा गेल्या दहा वर्षांपासून राजकारणात. आधी पं.स.सदस्य, मग जि.प.सदस्य, आता आमदार तसं गावातल्या लोकांशी त्याचं वागणं इतकं काही वाईट नव्हतं. त्यामुळे संतोषच्या आई-वडिलांनी खूप खूप विचार करूनही नकार देण्यासारखं काही कारण त्यांना दिसेना. नक्कीच त्याच्या नात्यातली एखादी पोरगी संतोषच्या गळ्यात बांधायचं त्याच्या मनात असंल, हा संतोषचा विचार त्यांनाही पटला. ''आताचं तर हो म्हण, पुढचं पुढं पाहू'' असं म्हणून त्यांनी त्याला हिरवी झेंडी दाखविली.

संतोषनं होकार दिला अन् चमत्कारच चमत्कार घडू लागले. संतोषच्या वडिलांच्या शेताला लागून खालच्या अंगाला आमदाराचं बावीस एकर रान. पण आमदाराचं वा त्यांच्या घरच्याचं त्याकडे गेल्यावर्षीपर्यंत संपूर्ण दुर्लक्ष. गेल्यावर्षी आमदारांनी पुढकार घेतला. शेताचं नांगरण-वखरण, खोड-कुंधा, काटाकुपाट्या, झाडं-झूडं, बांध-बंदिस्ती इ. सारीकामं त्यांनी करून घेतली. एवढंच नाही तर ओढ्याच्या काठावर साठ हात खोल विहीर खोदली. दुर्दैवानं तिला पाषाण लागलं. तरी आमदारांनी ओढ्याला सिमेंटचा कट बांधून पावसाळ्यात ओढ्याचं पाणी विहिरीत येईल अशी व्यवस्था केली. भर उन्हाळ्यात संत्र्यांची डाळिंबांची, लिंबोणीची, चिकूंची, आंब्यांची, नारळींची अशी बारा-तेरा प्रकारांची झाडं सगळ्या शेतात लावली. ठिंबक संच बसविला. लोक हसत होते.

हा काय वेडेपणा करतो हा जयू ? शेतातल्या विहिरीत पाण्याचा थेंब नाही. तरी त्यानं हे सगळं सुरू केलं. एवढंच नाही विहिरीवर ठिबक संचासोबत मोटरही फिट केली ?... मात्र जेव्हा जिल्हापरिषदेचं टँकर दिवसातून आठ-आठ ट्रिपा करून त्याच्या विहिरीत येऊन पडू लागलं, तेव्हा गाववाल्यांचे तोंड गप्प बसले. आमदारांना विरोध करणारा गावातला यशवंत सावकारांचा राजू बोंबलत होता. अरे, हे टँकर आपल्या गावाला उन्हाळ्यात पाणी - पुरवठा करण्यासाठी. यानं वर दडपण वापरून मागून घेतलं. गावच्या लोकांच्या तोंडचं पाणी यानं याच्या शेतात पळविलं. मात्र गाव त्याच्या ओरडण्याकडे लक्ष देत नव्हतं. गाव गावा भोवतालच्या विहिरीवरून पाणी भरत होतं.

संतोषच्या होकाराचा परिणाम म्हणून संतोषचं शेत आमदारांच्या ट्रॅक्टरनं पुकटात नांगरलं गेलं. त्यांच्याच ट्रॅक्टरने वखरण झालं. पुढं पाऊस पडला अन् त्यांनी घरी निरोप पाठविला, आमच्या पेरणी यंत्रानं तुमचं रान पेरून घ्या. संतोषच्या वडिलांनी तसं केलं. गावही ह्या गोष्टीवर चकित झालं. आमदार वैयक्तिक कोणाला त्रास देत नव्हता हे खरं, पण कोणावर एवढी मेहरबानी ही करत नव्हता. सखारामच्या बाबतीतच हे कसं घडते ? ''पाहाय रे बॉ सखाराम, कोण्या दिवशी हे समदं तुह्या गळ्यात येईल. मगं तुले काहीच हालचाल करता येणार नाही...'' पण गाववाल्यांनी सुचविण्याआधीच संतोषचे वडील सावध होते.

दिवाळी झाली, शेतातले सोयाबीन आधीच निघाले, तुरी तेवढ्या फुलाकळ्यांनी लदबदल्या होत्या. पाऊस प्रमाणात झाल्याने यावर्षीची हंगाम चांगला होता. एक दिवस गावातून दोन पोकलन, दोन जेसीपी, दोन ढंपर एका जिपच्या मागोमागं पिंपळीच्या रस्त्यानं गेले. पाहणारांना वाटलं, पिंपळीच्या शिवारात एखाद्या धरणाचं काम निघालं असावं.. मात्र संध्याकाळपर्यंत सगळ्या गावात बातमी पसरली. सखारामच्या वावरातल्या ओढ्यावर धरणाचं काम सुरू झालं. त्याचं तीन हिस्से रान धरणात चाललं. म्हणजे धरणाच्या भिंतीखाली त्याचं फार तर तीन एकर रान उरणार. त्यातलं एकरभर रान ओढ्यात गेलेलं. म्हणजे फक्त दोनच एकर रान त्याच्या हाती राहणार. ही बातमी संतोषच्या आईवडिलांना कळली. तेव्हा ते उर बडवत रानाकडे पळाले. काम चालू होतं. त्या धबडग्यात त्याच्याकडे लक्ष द्यायला कोणालाच वेळ नव्हता.

त्या दिवशी शेजाऱ्याच्या मोबाईलवरून संतोषच्या वडिलांनी त्याच्याशी संपर्क साधला. तो एका मित्राला त्याच्या मोटारसायकलवर सोबत घेऊन पन्नास कि.मी. अंतर पार करून अर्ध्यारात्री गावी आला. त्याला पाहून त्याच्या आईवडिलांनी हंबरडा फोडला. त्यांच्या वडिलांचं म्हणणं, मोजणी नाही, माप नाही, काही नोटिस नाही... या लोकांनी बेधडक काम सुरू केलं. तुरीचं उभं पीक तुडविलं. ते जाऊ दे. पण सगळं धरणच आपल्या वावरात व्हायलं. आपण आजच भिकेले लागलो. तू आमदाराला भेटून काहीतरी कर आणि आमदारांचं नाव ऐकून त्याला एकाएकी लक्षात आलं की एवढ्या एका गोष्टीसाठीच आमदारानं आपल्याला वापरून घेतलं. आपल्याला त्यानं चांगलंच कैचीत धरलं. आज या धरणाला विरोध करतो म्हटलं तर तिकडे नोकरीचं काही खरं असणार नाही. नोकरीचं पाहू म्हटलं तर आज आपलं कुटुंब जमीनदोस्त होणार. धरलं तर चावते, सोडलं तर खाते, अशी त्याची गत झाली. सकाळी सकाळीच यशवंत सावकाराचा राजू त्याच्या घरी आला. 'अरे, तू कधी आला?' संतोषला पाहून त्यानं विचारलं. संतोषनं उत्तर दिलं नाही. ते पाहून तो पुढं म्हणाला, ''सोड, ते जाऊ दे, मी तसा सखाराम काकाला भेटायला आलो होतो. बरं झालं, तू भेटला. जयानं हा जो काही प्रकार सुरू केला. बोल,

त्याच्याबद्दल काय करायचं ठरवलं ?'' तसं त्यानं अजून नक्की काहीच ठरवलं नव्हतं. तरी पण एकदा आमदारांची भेट घेऊन पुढं काय करायचं ते ठरवू असं., त्याचं मन त्याला सांगत होतं.

''चाल, माह्यासंगं तालुक्याले, पोलिस स्टेशनमध्ये रिपोर्ट देऊ. 'जबरदस्ती ठेकेदाराचे माणसं तुझ्या वावरात धरण तयार करायले' असं रिपोर्टात लिहू. वकिलाला भेटू. हे काम सरकारच्या धोरणानुसार का आमदाराच्या? ते शोधून काढण्यासाठी वकिलाच्या सल्ल्यानं माहितीच्या अधिकाराखाली जिल्हाधिकाऱ्याला अर्ज देऊ. वकिलांन म्हटलं, तर या कामावर हायकोर्टातून स्टे मिळवू चाल, वेळ घालवू नको.''

एवढ्या झटपट निर्णय घेण्याची संतोषला सवयच नव्हती. शिवाय यात आमदारांचा किती हात आहे हेही त्याला माहिती नव्हतं. राजू म्हणजे आमदारांचा कट्टर विरोधक. झाडाची वाळलेली फांदी जरी तुटून पडली तरी तिच्या पडण्याला आमदाराच कारणीभूत अशी त्याची कायम विरोध करण्याची विचारसरणी. त्याच्या आहारी गेल्यानं काम व्यवस्थित मार्गी लागेल याचा भरवसा नाही. मात्र त्याने काम अधिकच गोंधळात पडेल हे नक्की. त्यानं राजूला फारसा प्रतिसाद दिला नाही. राजूनं त्याच्या आईवडिलांना सांगून पाहिलं. त्यांनी ही खालची जबान वर केली नाही. ''शेवटी मरा लेकहो, तुम्ही त्या खाटकालेच धार्जिण हा,'' असं म्हणून तो ताणाताणातच घराबाहेर पडला.

शाळा सोडून संतोषच्या आमदारांच्या जिल्ह्याच्या ठिकाणच्या बंगल्यावर चकरा सुरू झाल्या. पण चार-पाचदा सारखं एकच उत्तर साहेब मुंबइला गेले, सहाव्यांदा आमदारंची गाडी बंगल्यासमोर. आत ते कोणाशी तरी मोठमोठ्यानं बोलताहेत. तरी गेटवरच्या शिपाई म्हणाला, ''साहेब, मुंबईला गेले.'' ते ऐकून मात्र संतोषचा संयम संपला. त्याच्या मनातला विद्रोह जागा झाला आणि तो हातवारे करत मोठमोठ्यानं ओरडू लागला. ते ऐकून बंगल्यातली मंडळी बाहेर आली. आमदारांनी आश्चर्यानं संतोषकडे पाहात म्हटलं, ''अरे, संतोष तू ? कशाला एवढा आरडा-ओरडा चालविलास ? गेटवरच्या शिपायास रागावून आमदारांनी झापलं. कारे मुर्खा, आपली माणसं कोणती तीही तुला कळत नाही ? यानंतर पुन्हा असं करू नका, ये संतोष, ये घरात ये.. संतोषच्या पाठीवर थोपटत आमदारांनी त्याला आत नेलं. पाणी, कॉफी पाजली. त्याच्या कामाची चौकशी केली. ''मी आजच मुंबईला चाललो. पाटबंधारे मंत्र्यांना मी याबाबत विचारणा करतो. आणि त्यांना सांगून हे काम थांबवितो. ठीक आहे ?'' संतोष आमदारांच्या बोलण्यावर संतोष पावून बाहेर पडला. असं कसं म्हणावं तरी पण एक झालं. आमदारांना भेटण्यापूर्वी प्रचंड संतापलेला संताष त्यांच्यापुढे मात्र थंड झाला.

आमदार त्याला झुलवत राहिले. त्याची नोकरी चालू राहिली. अन् धरणाचं काम अवघ्या दोन महिन्यांत पूर्ण झालं. एकच्या जागी चार जेसीपी, चार पोकलण, आठ ढंपर, तेवढेच ट्रॅक्टर कामाला लागले. संतोषचे आईवडील धरणाच्या भिंतीवर चढून टबाटबा बोंबलत राहिले. पुढं वडील चिंतागती झाले, आई वेडी झाली. संतोष भयानक अंतर्मुख झाला. त्याचं शिकविण्यात लक्ष लागेना. एरव्हीच त्याच्यासाठी ना मस्टर होतं ना पगार. तो म्हणजे नुसता आवबे लड्डू जाव बे लड्डू. त्याचा परिणाम म्हणून तो कॉलेज बुडवायला लागला. अन् एक दिवस त्यानं कॉलेजला रामराम ठोकला. कॉलेजवर हजर राहण्यासाठी त्याला ना कोणी निरोप दिले, ना बोलविलं.

पावसाळा भरपूर झाला. पहिल्या पंधरवाड्यात धरण भरलं. आमदारांची विहिर धरण्याच्या भिंतीपासून पाचशे मीटरवर. धरणाच्या पोटभिंतीनूर विहिरीपर्यंत आठ इंची पाईप आमदारांनी धरणाची भिंत तयार

होण्यापूर्वीच गाडून ठेवलेला. त्याला व्हॉल्व्ह लावलेला. व्हॉल्व्ह खोला, पाहिजे तेव्हा विहिरीत पाणी घ्या. आमदारांचा फळझाडांचा बगीचा दिसामासी वाढू लागला. त्यांच्या माणसांची, गड्यांची, ट्रॅक्टरची ये जा वाढली. गावापासून पिंपळीवाटेने एक कि.मी. आलं की संतोषच्या वडिलांच्या वावरापर्यंत आडवी आलेली पांदणवाट खरं तर ती पुढंही गेलेली. पण आमदारांच्या वावरात जायचं म्हटलं तर पुनः पिंपळीवाटेला समांतर असणाऱ्या संतोषच्या वडिलांच्या शेताच्या धुऱ्यानं जावं लागते. इकडं शेतवाट नाही. धुरेही लहान लहान. संतोषच्या वडिलांचा पिंपळीवाटेकडचा शेजारी मार्तंड पाटील, गावातलं बडं प्रस्थ. त्यांच्या शेतातून गुरं-ढोरं माणसं, ट्रॅक्टर, गाड्या नेण्याऐवजी आमदारांची माणसं संतोषच्या वडिलांच्या शेतातूनच नेते...धरण झालं त्याचा आधीच राग होता संतोषच्या वडिलांना.. आता मात्र त्या जास्तच भर पडली. त्याचे वडील गडी-माणसांना अडवू लागले. एकदोनदा झोंबाझोंबी झाली. आमदारांच्या कानावर ह्या गोष्टी गेल्या. आमदारांनी संतोषला निरोप पाठविला. धरणाखालचं शिल्लक राहिलेलं शेत दोन लाख रूपये एकरानं मला दे. संतोषनं वडिलांना सांगितले. तर त्यांनी आमदारांना शिव्यांची लाखोळी वाहिली.

संतोषच्या वडिलांचं गावात, सोयऱ्या धायऱ्यात हसं झालं. पोराच्या शिक्षणानं घात केला, असं लोक बोलत. मात्र संतोषचे वडील काही प्रत्युत्तर देत नसतं. ना संतोष ला दोष देत ना आमदाराला ! फार तर ते नशिबाला दोष देत.

ही आताची मागच्या महिन्यातली गोष्ट. एक दिवस तलाठ्याचा संतोषच्या वडिलांना निरोप आला. तलाठी आमदारांच्या बैठकीत बसत असे. त्याच्या दारात पाय टाकणार नाही, असं म्हणून संतोषचे वडील तिथं गेले नाहीत. शेजारच्या तुकारामकडून त्यांना कळलं, ''सरकारनं पांदण रस्ते, शेतीरस्ते, शीवरस्ते लोकसहभागातून तयार करण्याची योजना आखली. त्यानुसार जुन्या काळी अस्तित्वात असणारे हे रस्ते आता नव्याने तयार करण्यात येणार आहेत. त्याच्या नकाशाही तलाठ्याजवळ तयार आहे. ज्यांनी अतिक्रमण करून हे रस्ते काढले असतील..'' तुकाराम बरंच काही बोलत होता, पण संतोषच्या वडिलांचे त्याच्याकडे ध्यान नव्हतं. आपल्या वावराच्या वरच्या अंगाला असलेला पांदणरस्ता आजही अस्तित्वात आहे. तेथे धरणाचा भाग आल्याने तो रस्ता पुढे धरणात बुडाला. त्यामुळे आपल्याला या योजनेशी काही देणेघेणे नाही.. पण भित्यापाठी ब्रह्मराक्षस या न्यायानं आठ दिवसात संतोषच्या वडिलांना धक्का बसला, वास्तविक पांदण रस्त्याची, शेती रस्त्याची ही कामे जवाहर रोजगार हमी योजनेतून करायची, पण आमदारांचे वावर ते पांदण या भागात जेसीपीचा वापर करून एका दिवसात शेतरस्ता तयार करण्यात आला. बरं केला तर केला तो पूर्णपणे संतोषच्या वडिलांच्या शेतातून केला. हा सरसकट अन्याय होता. या गोष्टीने दोघेही बापलेक हादरले. आमदारानं आपल्याला होत्याचं नव्हतं केलं, या गोष्टीची दोघांनाही चीड आली. ते दोघेही संतापाच्या भरात आमदारांच्या घरावर गेले. अन् आमदारांच्या मायच्या नावानं शिमगा करू लागले. बघे जमा झाले. सुमारे अर्धा तास हा प्रकार झाला, तेवढ्यात पोलिसांची गाडी आली आणि त्या दोघांना गाडीत टाकून घेऊन गेली. राजूनं पुन्हा राजकारण केलं. त्या दोघांची जमानत घेतली. मात्र यावेळी संतोषनं किंवा त्याच्या वडिलांनी राजूला कसालाही विरोध केला नाही. उलट राजू म्हणेल तसं त्यांनी केलं. तहसीलदार, एस.डी.ओ., कलेक्टरांच्या भेटी घेतल्या. निवेदने दिली, महितीच्या अधिकाराखाली पांदण रस्ते- शेतरस्त्यांबाबत माहिती मागितली. जबरदस्तीने शेतातून शेतरस्ता तयार केल्याबद्दल सरकारविरूद्ध पोलिसात तक्रार दिली. एवढ्याने भागले


नाही तर योग्य तो न्याय मिळावा यासाठी कलेक्टरांच्या कचेरी समोर संतोषला आमरण उपोषण सुरू करायला लावले. राजूनं सगळ्या वर्तमानपत्रावाल्यांना गोळा केलं. वाहिनीवाल्यांना आणलं. संतोषच्या कुटुंबावरच्या अन्यायाला वाचा फोडली. एवढेच नाही तर युवासेनेच्या माध्यमातून एक दबावगट निर्माण केला. जिल्ह्यातील पक्षनेते, गटनेते यांच्यामार्फत कार्यकारी अध्यक्षांपर्यंत फिल्डिंग उभी केली. तरीही जिल्हाधिकाऱ्यांना जाग येत नव्हती.

पाचवा दिवस उगवला. कुठून सूत्रं हलली, देव जाणे. जिल्हाधिकाऱ्यांसह स्वतः पालकमंत्री सकाळीच भेटीला आले. तक्रार ऐकली. आस्थेवाईकपणे चौकशी केली. संबंधित शेतरस्त्यासंबंधी योग्य ती शहानिशा करून आठ दिवसांत कार्यवाही करतो, असं आश्वासन त्यांनी दिलं. राजूचं म्हणणं प्रत्यक्ष कारवाई होईपर्यंत उपोषण चालूच ठेवायचं, पण त्यासाठी संतोषच्या वडिलांची तयारी नव्हती. पाचव्या दिवशी त्याची तब्येत खूपच खराब झाली होती. ''आणखी पुढे हे आमरण उपोषण लांबविलं तर कदाचित...'' नुसत्या विचारानं त्यांच्या अंगावर काटा आला. त्यांनी संतोषला उपोषण मागे घ्यायला लावलं. ही गोष्ट न आवडल्याने राजू तणतणत निघून गेला. संतोषला सरकारी दवाखान्यात भरती करायला सांगून पालकमंत्री, जिल्हाधिकारी गेले. दोघा-चौघांनी संतोषला उचलून एका कारमध्ये झोपविले. अन् संतोषच्या वडिलांना सोबत न घेता कार गेली. दोन तासानंतर सरकारी दवाखान्यात पोचले. तिथं चौकशी केली. तर तेथे संतोष नावाचा कोणी पेशंट आला नसल्याने कळले. मग त्यांनी खासगी दवाखाने धुंडाळले. संतोषचा कोणत्याच दवाखान्यात पत्ता नव्हता. संतोषचे वडील हवालदिल झाले. त्यांच्यावर पागल व्हायची वेळ आली. ''आपला मुलगा असा कसा गायब झाला ? कोणी केला ? अरे, कोणी कशाला ? त्या आमदाराचंच हे कारस्थान...नक्कीच...त्याच्या मायले, त्या आमदाराच्या....भोसडीच्याले मी हात दाखविल्या बिगर राहणार नाही...चाल, ये मनावं, असा मह्यामव्हरं.. बायल्याभोकाच्या. रानडावे काय करतं ? ....चाल,चाल, चाल ये....'' स्वतःशी बोलता बोलता संतोषच्या वडिलांचा कधी आवाज वाढला तेच त्यांना कळलं नाही.... ते बोलत बोलत भर चौकात उभे राहिले...त्यामुळे वाहनांची वाहतुक खोळंबली. काय झालं ? काय झालं ? जो तो चौकशी करू लागला. आणि त्याला उत्तरही मिळू लागलं...कुणी वेडा आहे. रस्त्यावर येऊन धिंगाणा घालतोय...अरे, मग पोलिस काय करताहेत ?.... ते आले पोलिस, पकडलं त्यांनी त्याला....चला, बरं झालं...उगीच एवढ्या वेळेची खोटी झाली...वाहनं चालू झाली. वाहन धारक रिलॅक्स झाले.... आपापल्या मार्गाला लागले.

काही वेळातच संतोषचे वडील लॉकअपमध्ये बंद झाले. मात्र त्यांचं बडबडणं बंद झालं नाही. ते आता न थांबता सुरू होतं. ◆◆◆

बाबाराव मुसळे
१४३,एल.आय.जी.,सेक्टर-२
आय.यु.डी.पी.कॉलनी, वाशिम-४४४५०५
भ्रमणध्वनी ९३२५०४४२१०

।। कविता ।।



दोन अभंग

।।१।।
आंबले अंतर
विटला जिव्हाळा
आणिक उमाळा / कोरडला.

जीर्ण आपुलकी
शीर्ण जवळीक
पर्ण सोयरिक / देठ सुटी.

दाण्याचे सुपाशी
जमले ना गोत्र
जात्याला का मात्र / दोष द्यावा.

।।२।।
मुद्दलात घाटा
निघाले दिवाळे
उदिमास टाळे / जगण्याच्या.


आतबट्ट्याचाच
केला वेवहार
गमावले फार / लाभ फुका.

आले वाट्यालागी
आयुष्य चोंबडे
फाटके घोंगडे / खुंटीवरी. ◆◆◆

सुखदेव ढाणके
'सर्वमंगल'
सहजानंद सोसायटी,
मोर्शी रोड, अमरावती
भ्रमणध्वनी [illegible]

अनुक्रमणिका

तो येतो



तो येतो,
तिच्या कपाळावर कुंकू ठेवतो.
ती मोहरून जाते.

तो येतो,
तिच्या गळ्यात काळ्या मण्यांची पोत घालतो.
ती शहारून जाते.

तो येतो,
तिच्या नाजूक हातात हिरवा चुडा भरतो.
ती हुरळून जाते.


तो येतो,
तिच्या पायात चांदीच्या तोरडया बांधतो.
ती हरखून जाते.

तिला वाटते
तो आपल्याला सजवतोय...मढवतोय.

पण त्या बिचारीला काय ठाऊक
त्यानं जखडून टाकलाय तिचा एकेक अवयव..घट्ट.
अन् तो निघून गेलाय बाजारात
कोठीवरचं गाणं ऐकायला ! ◆◆◆

प्रशांत असनारे
'अभिनंदन'
मुखर्जी बंगल्याजवळ,राऊतवाडी,अकोला
भ्रमणध्वनी ९७६३७१४३०४

॥ पुस्तक परीक्षण ॥



'मेलं नाही अजून आभाळ...'
व्यवस्थेच्या अंगावर चाल करून जाणारी कविता

। डॉ. केशव सखाराम देशमुख

शेतांमधून आणि गांवांमधून शिक्षण सुरू करून साहित्याच्या सर्जक प्रवाहमध्ये सामील झालेली नव्वदच्यानंतरची पिढी, जोरकस आणि महत्त्वाची मानावी लागते. ही पिढी कवितेत अधिक सक्रिय आढळते. तथापि कथा-कादंबरी प्रकारांमध्ये निर्माणशील वानवा आहे. नाटकांचे स्टेज याबाबतीत अजून रिकामे आहे. मात्र कविता मुबलक लिहिली गेली. या कवितेचा हिशेब भला आणि बुरा असा उभयलक्ष्मी आहे. हे उघडच आहे. 'ग्रामीण' ही संज्ञा स्वीकारून आज मोठ्या प्रमाणात लिहिली जाणारी कविता टणक, टोकदार, विचारसंपन्न, गद्यप्राय, प्रतिक्रियावादी, सवालमूलक आणि संघर्षवादी अशा स्वरूपाची आहे. ही कविता ग्रामवर्णनं, कृषीवर्णनं इतक्यापुरती आत्मखूष नाही. किंवा ही कविता लयबद्ध, गीतात्म, सौंदर्यवादी अशीही नाही. तर मोठ्या प्रमाणात आलेल्या ह्या कवितेने सरकारला प्रश्न विचारायला सुरूवात केली. तिने व्यवस्थेवर असूड सडकावयाला सुरूवात केली. ती आई-वडिलांनी उपसलेल्या श्रमाचा ताळेबंद मांडू लागली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कवितेने ऐरणीवर घेतल्या.

खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण यांच्यामुळे निर्माण झालेल्या नव्या पेचांचा ही कविता संशोध करू लागली. त्यामुळे १९९० नंतरची मराठी ग्रामीण कविता टाईमपासापासून दूर जावून, ती शोधाची जननी आणि 'प्रश्नवाहिनी' झाली. म्हणूनच या कवितेकडे डोळेझाक करणं, ना समीक्षेला परवडणारे आहे; ना आम वाचकांना परवडणारे आहे. मूळातच ही ग्रामीण कविता छंदोपासनेतून उत्पन्न झालेली नाही. शब्दांचे तिचे हत्यार शोषणांवर, अवर्षणांवर, लूटींवर, व्यवस्थेवर, जुलूम आणि अन्यायांवर परजत जाणारे हत्यार आहे. यादृष्टीने, 'खुट्यांवर टांगलेली दुःख'(एकनाथ पाटील), 'पिढीपेस्तर प्यादेमात'(संतोष पद्माकर पवार), 'अथक'(केशव सखाराम देशमुख),'भुईशास्त्र'(ऐश्वर्य पाटेकर),'मेलं नाही अजून आभाळ'(बालाजी इंगळे),हे महाराष्ट्रापुढे आज असणारे कवितासंग्रह लक्षणीय आणि आशयसंपन्न ठरू शकणारे आहेत. या कवींनी आठवणींत रमणारी गोष्ट कवितेतून केवळ सांगितलेली नाही. बापांच्या स्मरणगाथेवर हे कवी उभे नाहीत. ह्या कवींची कविता वर्णनांचे पूल ओलांडून विश्लेषणाजवळ जाणारी आहे. या कवींकडे परिश्रमपूर्वक घडविलेली भाषा आहे. त्यांचे अनुभवांचे ताजेपण वाखाणण्याजोगे आहे. आज ग्रामीण कवितेत कवींची संख्या शंभरचे आकडे ओलांडून पुढे जाणारी असली तरी, अनुकरणाच्या अंधत्वातून यातील पुष्कळ कवी बाहेर पडू शकतील, अशी धमक त्यांना दाखविता आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यातल्या पुष्कळ कवींना पुस्तकांची भर घालणारा नाद जडल्यामुळे कवितेची वाढ होण्याऐवजी स्वतःचीच अनुकरणे वाढत गेली. मात्र त्यांना कविता पुढे नेता आली नाही, हे दुर्दैवच म्हटले पाहिजे. अभिव्यक्तीचे 'युनिव्हर्सलायझेशन' (साधारणीकरण) मात्र मोजक्या कवींना साधले, असे खेदाने नमूद करावे लागते. तुमचा अनुभव नवा रस्ता निर्माण करणारा हवा, वर्तुळात वर्तुळ निर्माण करणारा नको ! म्हणूनच, ग्रामीण कविता पुष्कळ प्रमाणात प्रसवली जाते. परंतु तेथे पाहिजे जातीचे... य पिंडाची कविता मात्र ओंजळभरच गवसते. हे गवसल्याचे समाधान बालाजी इंगळे यांच्या 'मेलं नाही अजून आभाळ... कविता संग्रहातून हमखास हाती लागते. भाषा वापराचा सूज्ञपणा, अनुभवांची स्वच्छ समज, खेड्यांचे बदलते रूप, शेतींचे जळते प्रश्न आणि कृषक संस्कृतीची न संपणारी परवड ही सूत्रे बालाजी इंगळे यांच्या कवितेत जोरकसपणे येतात. शिवाय हा कवी भ्रमात राहणारा नाही. किंवा पारितोषिकानं मातणारा नाही. 'मातरं'हा त्याचा पहिला कवितासंग्रह सुमार दर्जाचा होता. ह्याचे भान या कवीला होते. 'मातरं'ची नोंद ठळक स्वरूपात झाली. पण त्या यशाचा वारा या कवीने मेंदूत शिरू दिला नाही. उलट त्याने शेतकऱ्यासारखीच चिंतनमशागत वाढवली, हंगाम पचवले, भाषा तपासली, अनुभव सुलाखून घेतले, मोकळे श्वास घेतले, आणि त्यानंतर त्याने नव्वद कवितांचा एकशे बारा पृष्ठांचा चांगला कविता संग्रह मराठीला दिला. 'मेलं नाही अजून आभाळ... अशा शीर्षकाचा हा संग्रह प्रसिद्धीत वाहवत जावून आत्मप्रतारणा करणाऱ्या असंख्य कवींना शहाजोगपण शिकवणारा म्हटला पाहिजे. लेखनासाठी एक 'इनव्हॉल्वमेंट' (गोवणूक) असावी लागते. त्याशिवाय कागदांवरचा शब्द तप्त पोलाद होत नाही ! गाव आणि शेती समजून घेणारा इंगळे हा कवी आधी चिंतक आहे आणि त्यानंतर कवी आहे. हे त्याची कविता वाचली की कळतेच.

इंगळे यांनी संग्रहात तीन भागांत कवितांचे तीन गुच्छ केले. या भागांना त्यांनी पहिल्या वावरात, दुसऱ्या वावरात, तिसऱ्या वावरात अशी उपशीर्षके दिली आहेत. खडतर परिश्रम करणारा वर्तमानस्थित शेतकरी, त्याची अवकळा प्रारंभीच्या भागांतील ३७ कवितांमधून प्रभावीपणे मांडण्यात कवीला यश आलेले आहे. दुसऱ्या भागात ३० कवितांचा समावेश आहे. या भागात

अल्पाक्षरी कविता फसल्या, तथापि मूड आणि भूमिका मात्र कवीने निसटू दिलेली नाही. राबणाऱ्या शेतकऱ्यांना कष्ट व मरण अखेरपावेतो कसे छळते, याचा मर्मवेध दुसऱ्या भागातील ३० कवितांमधून घेण्यात कवी नापास झालेला नाही. तिसरा आणि शेवटचा भाग संग्रहाच्या शीर्षकाबरहुकुम बेतला आहे. बावीस कवितांचा समूह अखेरच्या भागांत समाविष्ट आहे. या भागांत आत्महत्याप्रवण आजारांवर धीराचा उपचार कवीने ध्वनीत केलेला आहे. शेतकऱ्यांना हिम्मत पुरविणाऱ्या उर्जेचा साठा घेऊन येणाऱ्या कविता, संग्रहातल्या या शेवटच्या भागात आहेत. जगण्याचे 'कन्सर्न' (आस्थाविषय) या कवीला नेमके कळल्यामुळे इंगळेंची कवीता डिक्शनरी होत नाही. एक पक्के डिक्शन त्याला ठाऊक आहे. खेड्यातली बोली मरू शकते अशी भीती आज निर्माण झाली. आणि नवी सायबर भाषा, भ्रमण यंत्रभाषा, संगणकभाषा इंगळेंनी या कवितेत आणली. कवितेला एक नवा चेहरा दिला. अशा प्रयोगामुळे खरेतर कवितेतली संवेदना मरण्याचे भय असते. पण पर्यावरणच मरणसन्मुख झाले आहे त्याचे काय ? नवी भाषा, चिन्हचर्चा, गणितीयता ह्या गोष्टी नव्या पिढीत इंगळेंनी कवितेत आणल्या आहेत. ह्या गोष्टींसाठी त्यास सर्व गुण द्यायलाच पाहिजे. 'इकॉलॉजिकल' (पर्यावरणीय) बदल या कवीने गांभीर्याने टिपले आहेत. इंगळेंच्या सामर्थ्याची ही जागा नजरेआड करता येणारी नाही. या अनुरोधाने त्यांच्या कवितांचे पुढील दाखले विचार करायला लावणारे आहेत.

(१)
बैलगाडी – कासरा
घोडागाडी – लगाम
सायकल – पॅडल
मोटारसायकल – एक्सलेटर
बाप – पाऊस
(बाप-पाऊस २२)

(२)
भर ऊन्हात नांगरणी Speed 30 Kmph
मऊ ओल्या मातीत पेरणी Speed 60 Kmph
गच्च कोवळ्या पिकात पाळ्या
Speed 60 Kmph
तग धरलेल्या पिकाची रास
Speed 10 Kmph
आलेले मुक्कामाचे गाव
तेच बारमाही दुष्काळी
(मुक्कामाचे गाव ०३)

(३)
999/-
Lifetime Card
आयुष्यभर
इनकमिंग फ्री !
9999/-
मालाची पट्टी
वर्षभर
उपासमार फ्री !
(बापाचं कम्युनिकेशन १५)

ह्या कवितांमधील भाषा आणि चिन्हचर्चा जागतिकीकरणाचा रासवट ध्वनी टिपणारी जशी आहे. त्याचबरोबर बदल आणि व्यवस्थेची कृषकपरंपरेशी बदमाशी अधोरेखीत करणारी आहे. 'महीमाय' किंवा 'मव्हा बाप' इतकेच घोकत रडत कुढणारा हा कवी नाही. तर नव्या वर्तमानातही जुनीच वेदना. नव्या भाषेत पूर्वीप्रमाणेच भळभळत आहे हे पकडणारा हा 'विचारांचा' कवी आहे. केवळ 'स्टायलायझेशन' (शैलीकरण) करून कविता नव्या रूपांत लिहिता येत नाही. ठणकही जपता व मांडता यावी. आज नवे जग. नव्या संज्ञा. नवी साधने आली. ती खेड्यांत मिसळली. पण जखम तीच, वेदना तीच आणि प्रश्नही तेच. पेच सुद्धा तेच अशा नव्या पेचांचा पंचनामा करणारी कविता इंगळे लिहितात. म्हणून त्यांच्या कवितेचे मूल्य तसूभर अधिक आहे.

शेतकऱ्यांच्या दुःखाला मुखर करणारी गणितीय शैली वापरणारा नव्या पिढीतला हा कवी आहे. नंबर किंवा अंक, चिन्ह किंवा रेषा यांच्या 'रूक्षवंत' प्रतिकवापर हा कवी खुबीने करतो. असे करताना त्याने

'पर्सेप्शन' (संवेदन) ढळू दिलेले नाही. किंवा 'सेन्सेशन' (वेदन) सुटू दिलेले नाही. गुळगुळीत भाषा, अश्रू उगाळणारे निवेदनकौशल्य आणि गरिबीची एकच एक ध्वनिमुद्रिका ऐकवणारा हा कवी नव्हे ! गणित व भूमितीची चिन्हभाषा प्रश्न आणि वेदनेला अर्थरूप देऊ शकते. हे ओळखून कवितेला ताजेपण इंगळे बहाल करण्यात यशस्वी होतात.

उदाहरणार्थ

अनुभव + पाऊस × लागुड
सालभराचं नियोजन = पदरात काय ?
हे सूत्र मांडून
बाप सोडवत असतो
आयुष्याचं गणित.

(बापाचं गणित ०४)

किंवा (२)

त्याच्या भाग्याच्या रेषाखंडाला
दुष्काळ,अतिवृष्टी,नापीक,कर्ज
या रेषा नेहमीच छेदत असतात
आणि त्यातून निघतो
दुःख हाच छेदनबिंदू !

(बापाचं गणित ०५)

किंवा

'बँक बॅलन्स'(पृ-१८), 'चुकीचे पण बरोबर उत्तर' (पृ-२६),'सौंदर्यसल्ला'(पृ-३४) ह्या कवितांमध्ये सांखिकीय नवी परिभाषा श्रम आणि वेदनेच्या कृषक जाणिवांना प्रगद्य करण्यासाठी कवीने उपयोजिलेली आहे. त्यामुळे रसहानी न होता कवितांच्या बीजांमधील वास्तव कळायला चटकन मदत होते. उपकारक प्रयोगशीलता हे या कवितेचे बलस्थान म्हटले पाहिजे. हे सर्व जरी खरे असले तरी बालाजी इंगळे यांची कविता 'माहितींची वाहिनी' होणारी नाही. बदलत्या वेदना आणि संवेदनांचा पट मांडणे हीं या कवितेची खरी प्रकृती आणि प्रतिमा आहे. हा कवी कवितेतून सत्त्व आणि तत्त्व हातचे सुटू देत नाही. त्यामुळेच नव्या कवीत त्याची कविता वाचकांचे चटकन लक्ष वेधून घेऊ शकणारी आहे. आणि म्हणूनच या कवितेचे 'परिणामलक्ष्यीत्व' (प्रॅग्मॅटिक) कमी होताना दिसत नाही. 'स्टार्ट ते टॉप गिअर' ही या संग्रहातील एक कविता पर्यावरणीय अभियांत्रिकीकरण यांच्या प्रतिमांतून उलगडत जाते. नांगरी आणि नागरी संस्कृतीतील अंतर आणि दाह प्रस्तुत कवितेतून जीवघेणा होत जातो. म्हणून वर वर शब्दप्रधान वाटणारी ही कविता आशयरूप स्वीकारून अंगावर धावून येते. नव्या व्यवहारांची नवी परिभाषा उपयोजून आकाररूप घेतलेली 'बँक बॅलन्स' कविता 'नागवणूक' ही शेतकऱ्यांच्या मागे कशी हात धुवूनच लागली आहे, हे नेमकेपणाने साकार करते. ज्या बापाच्या आयुष्यात केवळ कष्टच आहेत, त्या बापाला वेदना कशी आजन्म लपेटून असते हे कवीने 'समाधान' या कवितेतून सूचकतेने सांगून टाकले आहे. जगाचा पोशिंदा हा शेतकरी, त्याची फरफट मात्र अथांबच आहे, हे सांगणारी 'सगळं सगळं झालं' कविता वाचकास विचार करावयास लावते.

या संग्रहात एक कविता दुसरीसारखी नाही. कुणाचे अनुकरण करून आपली उंची लहान करणारे अज्ञान या कवीकडे नाही. 'सारभूत' (कोअर) मांडणारा कविस्वभाव सर्व कवितांतून जाणवतो. या सर्व कवितेतून चांगले जगण्याचा नीतीपाठ जरूर आहे. शिवाय 'हंगामवीर' शेतकऱ्यांना आज 'स्ट्रेटेजी'(रणनीती) आखण्याची गरज आहे, हे वर्तमानभान प्रदान करण्याचे बळही या कवितेत आहे. यादृष्टीने 'आभार' (पृ-४५), 'हिशोब'(पृ-७४), 'रान नभात'(पृ-९२),'इंडियन आयडॉल'(पृ-९६),'फालतूपणा'(पृ-९८),'तमाम कवींनो'(पृ.९९), 'सत्य'(पृ-१०२),'जगून घे'(पृ-१०४), 'अंधार पेरण्याऐवजी'(पृ-१०६), 'बाप तू जग'(पृ-१०७) आणि 'हे श्वासा' (पृ-११०) ह्या या

संग्रहातल्या कवितांमधून नवा नीतीपाठ आणि नवी रणनीती अवतीर्ण होत गेलेली आहे, जी लोकशाहीवादी आणि शाही लोकांच्या विरोधात दंड थोपटणारी सुद्धा आहे. आत्मविश्वास हरवलेल्यांना बळ देणारी ही कविता जगण्याचे तसेच लढण्याचे हत्यार बनते. शब्दांचा खेळ खेळण्यापेक्षा ज्या व्यवस्थेने आमच्या जगण्याचा खेळ सुरू केला आहे, त्या व्यवस्थेला प्रश्नोत्तरे मागणारी ही कविता नव्या आशा पल्लवीत करते. हीच या कवितेची खासियत आणि ओळख म्हटली पाहिजे.

या संग्रहातून या कवीची गुणवैशिष्ट्ये ठळक होतात. जसे की, इंगळे शेतीच्या बांधिलकीला विसरत नाहीत किंवा आपली संघर्षाची सज्जता कमी होऊ देत नाहीत. माती आणि गाव यांच्यात जे जळू लागले आहे त्या जळणाऱ्या धगीमधून शब्द शोधणारा हा कवी आहे. त्यांच्या या कवितेत नवे तंत्रज्ञान आणि माणसांतील ओल यांची सुंदर सांगड घातली गेली. हे त्याचे निराळेपण त्याच्या कवितेची ओळख निश्चित करायला मदत करते.

बालाजी इंगळे यांचा हा संपूर्ण संग्रह कुठून कुठे निघाला, असा प्रश्न विचारला तर, त्याचे उत्तर असे आहे – खडतर श्रमांपासून ही कविता प्रवासला निघते. भोगवटा मांडत तिचा प्रवास सुरू होतो. मरण – आत्महत्यांनी मरणकळांचा पटही या कवितेतून जीवघेणा होत जातो. आणि 'मेलं नाही अजून आभाळ...' असं नमूद करीत आशा पेरत हा संग्रह थांबलेला आहे. 'बापा'चा एक मोठा रोल या कवितेत महानायकाप्रमाणे विस्तृत पसरलेला आहे. तर निवेदक म्हणून, साक्षीदार म्हणून, संचालक म्हणून स्वतः कवी या कवितेतून दरक्षणी भेटीला येतो. समाधानापेक्षा अस्वस्थता मुठीत ठेवणाऱ्या या संग्रहातील कवितांचे नेमके तेच गुणवत्ताबल आहे. संग्रहात काही एक कविता शब्दप्रधान होत गेल्या आणि आशयाची हरवणूक करून बसल्या आहेत. उदा. 'मेमरी कार्ड'(पृ-१२), 'परिवर्तन' (पृ-२३), या कवितेत 'बापा'ला नायक चुकीने केले गेले आहे. त्याऐवजी, 'बापा' जागी 'नवी पिढी' असा बदल केला तर या कवितेची अर्थहानी टळू शकली असती. 'पश्चाताप'(पृ-२४) कविता पश्चाताप करणारी आहे. अल्पाक्षरी कविता. उदा. 'एकांत'(पृ-४०), 'चिवट हराळी'(पृ-५०) वाचकांना अपेक्षित समाधान आणि पुरता आशय देण्यात उण्या पडतात. ह्या मर्यादा लक्षात घेवूनही या संग्रहाचे आशयनिहाय देखणेपण लपणारे अर्थातच नाही. उद्योगक्रांती झाली, शेतीक्रांती सुरू आहे आणि माहिती क्रांतीचाही स्फोट झालेला आहे. या क्रांतीचे भान ओळखणारा विवेक, बालाजी इंगळे यांना मिळाला आणि त्यांची ही कविता ते अवघे बदल पोटांत घेऊन साकार होत गेली आहे. या कवीला बदललेले अर्थशास्त्र आणि जीवनाचे गणित कळते. त्यामुळे तो स्वप्नविरोधी आणि वास्तव सन्मुख रचना कागदांवर उतरू शकला आहे. भासापेक्षा भानाला प्राधान्य देणारी सजगता या कवीकडे निश्चितच आहे. म्हणूनच तो व्यवस्थेचे नवे अर्थशास्त्र ओळखणारी ही चांगली कविता लिहू शकला. इंगळेंनी कवितेचे गाणे होऊ दिले नाही. अथवा गद्यही होऊ दिले नाही. भाषेलाही स्वतःवर स्वार होऊ न देण्याची सावधगिरी बाळगण्याची लष्करी सतर्कता बालाजी इंगळे यांच्याकडे आहे. 'मेलं नाही अजून आभाळ... त्यामुळेच गुणवत्तेत कमी पडणारे पुस्तक ठरू शकत नाही. ◆◆◆

! मेलं नाही अजून आभाळ...
। बालाजी मदन इंगळे
। लोकवाङ्मय गृह,मुंबई-४०००२५
! पृष्ठे -११२
। किंमत - १०० रुपये
। पहिली आवृत्ती - जुलै २०१०

डॉ. केशव सखाराम देशमुख
संचालक,भाषा व वाङ्मय संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी,नांदेड-४३१६०६
भ्रमणभाष ९४२२६७१६३१

।। पुस्तक परीक्षण ।।



भुईशास्त्र : शेतकऱ्यांच्या व्यथेची लढाऊ कविता

सुदाम राठोड

जगातल्या प्रत्येक समाज समूहाचं स्वतःचं असं एक सांस्कृतिक संचित असतं आणि त्यातूनच त्या त्या समाजाची जडणघडण होत असते. कितीही नाकारलं तरी आपली परंपरेशी जोडलेली नाळ पूर्णपणे तुटत नसते. जुन्याला दडपून टाकण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्यातल्या शाश्वत मूल्यांचे चिरंतन कोंभ सातत्याने उगवतच राहतात. याच पार्श्वभूमीवर, सशक्त परंपरेचा धागा पकडून भूईच्या आखाड्यात कायम पराजित होणाऱ्या शेतकऱ्याचे नवे 'भुईशास्त्र' मांडणारा कवी ऐश्वर्य पाटेकर दाखल झाला आहे.

संतपरंपरेशी नातं सांगत समकालीन वास्तवाचा नवा अन्वयार्थ लावणारा हा कवी गेली अनेक वर्ष विविध वाङ्मयीन नियतकालिकांतून, दिवाळी अंकातून व्यक्त होत राहिला. त्यानंतर पाटेकरांचा 'भुईशास्त्र' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. यात एकूण ६६ कविता असून 'दृष्टांतपाढे', 'हुर्दुकटीपा','गर्भओवी', 'भुईशास्त्र', 'वृषभलीला' अशा विभागात विभागलेल्या आहेत.

ज्या मातीनं या कवीचा पिंड घडवला, ज्या मातीनं त्याला हसवलं रडवलं, त्या संपूर्ण ग्रामव्यवस्थेचे पडसाद त्याच्या कवितेत उमटतात. तो जे जगतो आहे, भोगतो आहे, पाहतो आहे, तेच त्याच्या कवितेचे विषय आहेत. त्यामुळे ती विद्रोही असली तरी आक्रस्ताळी नाही. आधुनिक असली तरी फॅशनेबल नाही. आत्मसंवादी असली तरी आत्मकेंद्री नाही. संस्कारित असली तरी संकरीत नाही. श्रद्धाशील असली तरी अंधश्रद्धाळू नाही. ही कविता नैतिकमूल्यांचा ऱ्हास होतांना, नव्या हरिपाठाचा परिपाठ आहे. 'दृष्टांतपाढे' या पहिल्याच विभागातील 'तुकारामा' या कवितेत

थांब तुकारामा ऐक माझे पाढे
वैकुंठाशी घोडे ददू नको
एवढ्या टापूत नाहीच माणूस
सारेच खवीस जित्राब गा
झाला तो वेव्हार आधी निपटून
मगच विमान वैकुंठाशी... (पृ.९)

माणसाला जित्राब आणि खवीस करणारा व्यवहार कवीला अस्वस्थ करतो. म्हणून तुकारामाला माणूसपण रूजवून मगच वैकुंठाला जा. असं कवी म्हणतो. वर्तमान भयंकर स्खलनशील आहे. यात शोषण ही सहजप्रक्रिया बनलेली आहे. मग या व्यवस्थेत शोषितांनी कोणत्या सुखाची आस बाळगावी ? कारण इथं तर 'दुभत्या गायीची दूध उडालेली कास' अन हातात लुचून दिलेल्या बिनदाण्याच्या कणसाशिवाय काही नाही. शेतकऱ्याचं दुःख कसं आणि कोणतं आहे. याचा शोध पाटेकरांची कविता घेते आहे.

आपल्या हिरव्या पिकाचा उडालेला राहंकाळ
आपण उघड्या डोळ्याने पाहतोय
की आंधळ्या डोळ्याने ?
हा प्रश्न बाजूला ठेवून
आपण हात चोळीत उठायचं की मुठी वळवीत ?
हे मी तुमच्यावर सोपवलंय (पृ.१४)

आजपर्यंत शेतकऱ्यांचे कैवारी म्हणवून घेणारे, शेतकऱ्यांना उद्ध्वस्त होताना, 'आपण उघड्या डोळ्याने पाहतोय की आंधळ्या डोळ्याने' असली वांझ चर्चा करीत राहिले. त्यांनी उपाय शोधण्याचा प्रयत्न केला नाही. मात्र हा कवी यासारख्या फालतू प्रश्नांना बाजूला सारून, शेतकऱ्यांना उद्ध्वस्ताच्या दारात घेवून जाणाऱ्यांविरूद्ध बंड पुकारायचं की थंड राहायचं असा रोकडा सवाल उपस्थित करतो. बंड करणे ही तेवढी सोपी गोष्ट नाही. ही व्यवस्था बंड करणाऱ्यांची काय हालत करते हे कवी अनुभवून आहे.

बोलण्या आधीच कंबरेत लाथ
उपसून हात नेले माझे... (पृ.१६)

व्यवस्थेनं कंबरेत लाथ घातलेल्या आणि उपसून नेलेल्या हातांच्या माणसांची व्यथा, हरिपाठाच्या स्वरूपात हा कवी नव्याने आविष्कृत करतो. हा 'हरिपाठ' नुसत्या शेतकऱ्यांचा नाही, तर गावागाड्यातील अलुतेदार-बलुतेदारांपासून राजकारण्यांपर्यंत समग्र ग्रामव्यवस्थेला व्यापून टाकणारा समकालीन वास्तवाचा नवा आविष्कार आहे.

चक्रधर चिंधूनं फाशी घेतली
शेताची पत नव्हती टिकली
की पिकाची रया सारीच गेली
की कर्जाच्या पायी शेती विकली
-का दांडग्या चोरांनी होती लुटली ? (पृ.२६)

'चक्रधर चिंधू' या शेतकऱ्याच्या आत्महत्येचं मूळ शोधण्याचा प्रयत्न कवी करतो. तसेच दत्तू तांबे, कृष्णा गावडे, गोयंदा सुतार, जनी मोठ्याई, मच्छिंद्र पिंगळे, पांडुरंग कोल्हे, नामदेव परब, विष्णू भट, चांगू गणपत, बंका चांभार, चोखा धनगर या सर्व गावागाड्यातल्या उद्ध्वस्त झालेल्या मंडळीची गाथाही कवी मांडतो.

या देशात एकीकडे भौतिक समृद्धीचा कळस, आणि दुसरीकडे प्राथमिक गरजांचीही पूर्तता होत नसलेला, दोन टोकाचा समाज आहे. मूठभर भांडवलदार आणि राजकारण्यांनी शेतकऱ्याचे शोषण अधिक तीव्र केले आहे. देशाचं 'पोट' चालवणाऱ्या शेतकऱ्याचं पोट मात्र रिकामचं राहातं, नव्हे ठेवलं जातं.

आणि सर्वच भाकरी नेस्तनाबूत
होत जाणाऱ्या दिवसात
भुकेची 'दंतकथा' जन्म घेते आहे...(पृ.३७)

स्वतः पिकवूनही पिकावर हक्क नसलेल्या शेतकऱ्यांच्या 'भाकरवाटा' नेस्तनाबूत केल्या जातात अन भुकेची दंतकथा तशीच अविरतपणे जन्म घेत राहते.

'हुर्दुकटीपा' या विभागात, कवी आणि आईचा संवाद आहे. कवीच्या वाट्याला आलेला संघर्षमय जीवनाचा आर्तव्याकूळ हुंकार आहे. कुटुंबातल्या नात्यागोत्याची हळूवार गुंफण आणि कठोर अशी गुंतागुंत आहे. कवीच्या कोरडवाहू आयुष्यातील हुर्दुकस्थळ आणि त्यातील आंतरिक कोलाहलाने वाचकांना गलबलून येतं.

मशागतीतून एकुलतं मागं राहिलेलं धसकट
खसकन खुपसलं पायात
हाच तो बाप, ज्यानं मोडला आईचा खोपा
छाकट्या छिनालगवश्या बाईसाठी
तो रात्रंदिनी सोलवटून काढायचा माझी आतडी
मी भ्यायचो पाहून त्याची
निगरगट्ट गेंड्याची कातडी (पृ. ४१)

हृदय पिळवटून टाकणारा हा अनुभव बापाचं उग्र चित्र उभा करतो. तसेच बांधाच्या वादावादीवरून आईचं डाकं फोडणारे चुलते,चोरून भाकर खाल्ली म्हणून झिंज्या उपटणारी आजी, कुत्र्यासारखा वसकन अंगावर येणारा गाव, बहिणींच्या हातांवर दिले जाणारे बोट बोट चटके, अशा विस्कटलेल्या कुटुंबातील रक्ताची नाती कशी स्वार्थी आणि हिंसक झाली, त्याचे चित्रण कवीने केले आहे.

'भाकर आणि आई' या कवितेत, आईने उपसलेल्या कष्टाची, तिच्या हाडामांसी रूतून बसलेल्या अठराविश्व दारिद्र्याची, तिच्या सहनशीलतेची चित्तरकथाच कवीने उभी केली आहे. एका प्रसंगात, स्वतः फाटकं नेसून लेकराला चांगले कपडे घालायला देणाऱ्या आईला कवी विचारतो –

''आई, तू फाटकं घालतेस अन
मला मात्र चांगला सदरा !''
फाटकं आभाळ कवेत घेऊन आई म्हणायची
''लेका, तुझ्या आयीला लोक फाटेल म्हन्तील
पर बाटेल म्हन्नार नायी,
तूही असाच फाटत जा, पर वाटू नकोस''(पृ.४४)

दारिद्र्यात जगणाऱ्या परंतु सत्त्वशील असणाऱ्या आईची मानसिकता अधोरेखित करणाऱ्या या ओळी संपूर्ण ग्रामसंस्कृतीतील स्त्रियांच्या जगण्याचं तत्त्वज्ञान आहे. स्वतःच्या पोरांना जगवण्यासाठी धडपडणारी ही आई, अगतिक असली तरी हतबल नाही. परिस्थितीला अजिबात शरण जाणारी नाही. उलट कवीला नवी उमेद, नवं बळ ती देते. फाटकेपणातही आपलं शील जपण्याचं तत्त्व सांगते.

आजच्या शिक्षणव्यवस्थेत ग्रामीण मुलांची होणारी कुचंबना, घुसमट आणि त्यांच्या जगण्याशी समांतर नसलेल्या शिक्षण पद्धतीवर हा कवी हल्ला करतो.

तुमचे पाढे म्हणावे लागतात मास्तर
पर आमचे पाढे भोगावे लागतात ! (पृ.५१)

बोलणं आणि भोगणं यातलं अंतरच कवी स्पष्ट करतो.

'गर्भओवी'तल्या कविता काहीशा गूढ आणि शृंगाराची हलकीशी किनार लाभलेल्या आहेत. कधी शृंगाराला ही कविता अध्यात्माच्या पातळीवर नेवून ठेवते.

या विभागातील कविता अल्पाक्षरी असल्या तरी सूचक आहेत.

घागरीला स्पर्श झाला
पाणी लाजाळले
कृष्ण शरमेला थोडा
अंग राधाळले (पृ.६४)

किंवा

जनाबाई डोळे झाक
विठू शेजेवर
धर आभाळ तोलून
भार उरावर (पृ.५९)

'भुईशास्त्र' या विभागातील कविता संतपरंपरेशी नातं सांगणाऱ्या आहेत. सर्व जातीधर्मांना समावून घेणारी ही समृद्ध परंपरा महाराष्ट्राच्या रोमारोमात भिनलेली आहे. 'विठ्ठल' या सर्व संताचं आराध्य दैवत असल्यानं कवीही त्याच्याशी संवाद साधतो. संपूर्ण संतमांदियाळीशीही संवाद साधतो.

मुक्ते, ज्ञान्याला ताटीचे अभंग सांगून
तू वैफल्यातून बाहेर काढलंस
इथे ढेकळाधस्कटाच्या गुंतावळ्यातून
मला कुणीच का सोडवत नाही
जगण्याच्या चिखलमातीचं मीही लिहिलंय
भुईशास्त्र
तू म्हणू शकत नाहीस याचं मडकं कच्च ! (पृ.७१)

शेतकऱ्याचं अवघं जगणंच चिखलमातीनं भरलेलं असतं. या मातीतल्या असंख्य अनुभवांनी परिपुष्ट झालेल्या शेतकरी कुटुंबातील हा कवी, कच्चा नाही. त्यानं लिहिलेलं भुईशास्त्रही कच्चं नाही. याची ग्वाहीच येथे दिली जाते. मात्र

घोर नवलाव झाला
माणसाने माणूस मारियेला (पृ.७२)

माणसातलं 'माणूसपण' संपल्याची खंतगाथा भुईशास्त्रात अखंडपणे सुरू राहते. नामदेव, जनाबाई, मुक्ताबाई, चोखामेळा, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्याशी कवी संवाद साधतो, आपल्या जगण्याची व्यथा सांगतो. संतांची भिस्त विठ्ठलावर तर कवीची भिस्त मातीवर. ही मातीच त्याच्या पोटाला भाकर देते. म्हणूनच कवी भाकरीची कविता लिहितो.

भाकर
विठ्ठल
भाकर
अभंग
भाकर
कीर्तन
भाकर तमाशा
भाकर गोमाशा !
असतो भाकरीला भुकेचा वास..
व्यवस्थेच्या दाढेखाली सरकत जातो
एकेक घास ! (पृ.७९)

भाकर विठ्ठल असण्यापासून ते भाकर गोमाशी असण्यापर्यंतची अनुभूती कवीला मिळते म्हणून समकालीन वास्तवावर कवी बोट ठेवतो. ही व्यवस्था शेतकऱ्याचं सर्व बाजूंनी शोषण करते. ही शोषणाची पातळी हक्काच्या ताटातील घास हिरावून, भाकरीलाच मोहताद करण्यापर्यंत जाते. या व्यवस्थेचे सूत्रदार भुकेचं आदिम सूत्र नेस्तनाबूत करतात आणि शेतकऱ्यांची चूल पेटण्याआधीच विझवतात. म्हणूनच

कवर मातीला धरून ठेवणे
हातात रूमणे घ्यावे तात्या (पृ.९६)

असा विद्रोहाचा सूर काही कवितांतून उमटतो.

'वृषभलीळा' या शेवटच्या विभागात 'बैल' ही प्रतिमा विविध प्रवृत्तींचा निर्देश करताना दिसते. कधी हा बैल 'हिरवे पीक नष्ट करणारी जमात' म्हणून येतो. तर कधी 'मुलखाचा राजा' म्हणून येतो. कधी 'हरामाचा

चारा' खाणाऱ्या निरूपयोगी माणसाच्या रूपानं येतो तर कधी 'माजलेला अंडील बैल' होवून खुरांखाली पीक तुडवताना येतो. अशा नानाविध रूपात बैलाचे दर्शन कवीने घडविले आहे. बैल आणि शेतकरी यांचं एक हृद्य नातं असतं. आयुष्यभर मालकासाठी राबणाऱ्या बैलाचं मनोगत एका कवितेत व्यक्त झालं आहे.

सणासुदीला चंदी दे, औत न सांडवता तुझी शेती
सालोसाल नेटकी करीन !
निकामी होता कत्तलखाना नको
गोठ्यातच भरू दे !
माझं व्याकूळ मरण तुझ्या डोळ्यात भरू दे !
(पृ.१११)

कष्टाशी इमान राखणारा बैल शेवटी मालकाकडे गोठ्यातलं मरण मागतो. हे मरण मालक डोळ्यासमोर असताना यावं. ही बैलाची मापक अपेक्षा हृदय हेलावून टाकणारी आहे.

'भुईशास्त्र' या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने कवी ऐश्वर्य पाटेकर यांच्या कवितेच्या संदर्भात काही निरीक्षणे नोंदविता येतात. ऐश्वर्य पाटेकर यांची कविता नव्वदोत्तरी ग्रामीण कवितेत आशय आणि रूपबंधाच्या दृष्टीने वेगळी आहे. या कवीला कविता या माध्यमाची गंभीर जाण आहे. 'भुईशास्त्र' या कवितासंग्रहातील कविता नव्या प्रतिमा, नव्या जाणिवा व्यक्त करणाऱ्या आहेत. या कवितेला सद्यस्थितीचे भान आहे. एकूण नवदोत्तरी कवितेच्या प्रवाहात ही कविता महत्त्वाची आहे. ◆◆◆

'भुईशास्त्र':ऐश्वर्य पाटेकर, शब्दालय प्रकाशन,प्रथमावृत्ती जाने.२०११, पृ.११२, मूल्य १२० रूपये.)

▌सुदाम राठोड
मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद
भ्रमणध्वनी ९७६७५३८६९५

लेखकांसाठी सूचना

- लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
- लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
- लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
- लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतः जवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
- लेखनाच्या स्वीकृतीसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे दोन महिन्यात कळविला जाईल.
- लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
- निर्णय कळविण्यासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टकार्ड लेखनासोबत पाठवावे.
- नव्या लेखनाचे 'युगवाणी'त स्वागत आहे.

मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त व अहवाल : एप्रिल - मे - जून २०११

२०११ ते २०१६ ह्या कालावधीसाठी नवनिर्वाचित अध्यक्ष, कार्यकारी मंडळ सदस्य व मावळत्या कार्यकारी मंडळातील सदस्यांची पहिली एकत्रित सभा दि. ०३ एप्रिल २०११ रोजी झाली. मावळत्या आणि नव्या मंडळातील बहुतांश सदस्य सभेस उपस्थित होते. विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी श्री. मनोहर म्हैसाळकर यांची पुनश्च निवड झाली. अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर यांनी नवीन कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांची घोषणा केली.

सर्वप्रथम अध्यक्षांनी घटना नियम १३ प्रमाणे श्री. वामन तेलंग (नागपूर) व प्रा. अजय देशपांडे (वणी) ह्यांची नामनियुक्त सभासद म्हणून नवीन कार्यकारी मंडळावर नियुक्ती केल्याची माहिती सभेस दिली.

उपाध्यक्ष	१) डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी
	२) वामन तेलंग
	३) नामदेव चं. कांबळे (वाशीम)
सरचिटणीस	सौ. शोभा उबगडे
चिटणीस	१) डॉ. विलास चिंतामण देशपांडे (कार्यालय)
	२) डॉ. रमेश जनबंधू (अर्थ)
	३) श्री. प्रदीप दाते (शाखा-समन्वयन)
कोषाध्यक्ष	श्री. विलास मानेकर
युगवाणी संपादक	प्रा. अजय देशपांडे (वणी)
संचालक परीक्षा समिती	शुभदा फडणवीस
संचालक ग्रंथालय	डॉ. इंद्रजित ओरके
संचालक सांस्कृतिक संकुल	मनोहर म्हैसाळकर (अध्यक्षांकडे)
	शरद ठाकरे (शासन समन्वयक)
संचालक समिती आमंत्रक	प्रकाश एदलाबादकर

अनुक्रमणिका

संमेलन समिती आमंत्रक — डॉ. रवींद्र शोभणे

कार्यकारी मंडळ सदस्य — डॉ. रमाकांत कोलते (यवतमाळ), सौ. संयोगीता धनवटे (नागपूर), डॉ. श्रीकांत तडके (मूर्तिजापूर), डॉ. प्रमोद गोविंद मुनघाटे (नागपूर), डॉ. मोना मिलिंद चिमोटे (अमरावती), प्रा. रमेशचंद्र मुनघाटे (गडचिरोली), प्रा. मोहमद जाकिर मो. शेख (चंद्रपूर),डॉ. मधुसूदन गादेवार (भंडारा), श्री. माणिक मंगला गेडाम (गोंदिया), श्रीमती अरूणा सदाशिव कुल्ली(बुलढाणा).

०१ एप्रिल २०११ :

विदर्भ साहित्य संघाच्या नव्याने सुरू झालेल्या 'चित्रलिपी'ह्या उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध घरंदाज गायक / गायिकांच्या गायकीवर आधारित 'ख्याल' डॉक्युमेंटरी फिल्मस् डिव्हीजन, नागपूर यांच्या सौजन्याने दाखविण्यात आली. ह्याच कार्यक्रमात विदर्भ साहित्य संघातर्फे 'सप्तक' व 'नादब्रह्म' यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या 'स्वरमंडळ' या उपक्रमाचा आरंभ झाला. 'स्वरमंडळ' उपक्रमांर्तगत अनघा दिघे या उदयोन्मुख गायिकेचे शास्त्रीय गायन झाले. त्यांना मिलिंद इंदुरकर यांनी तबल्यावर व रवींद्र दिघे यांनी संवादिनीवर संगत केली.

०९ एप्रिल : कलाम - ए- गालिबचे प्रकाशन :

विदर्भ साहित्य संघ आणि मंगेश प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने गज़ल अभ्यासक डॉ. विनय वाईकर यांच्या 'कलाम - ए - गालिब' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते साई सभागृहात झाला. डॉ. अक्षयकुमार काळे यांनी ग्रंथावर भाष्य केले.

११ एप्रिल : मध्य प्रदेशाच्या सांस्कृतिक कार्य मंत्र्यांची विदर्भ साहित्य संघास सदिच्छा भेट.

मध्य प्रदेशचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. लक्ष्मीकांत शर्मा आणि मध्य प्रदेशात नुकत्याच स्थापित झालेल्या मध्य प्रदेश मराठी साहित्य अकादमीचे निदेशक गणेश बागदरे यांनी विदर्भ साहित्य संघास सदिच्छा भेट दिली.

२३ एप्रिल २०११ :

ज्येष्ठ समाजवादी नेते अॅड्. गोविंदराव पानसरे ह्यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली.

१ मे २०११ : नाना जोग यांना आदरांजली

रंगकर्मी नाना जोग यांच्या स्मृतिदिनी त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

८ मे २०११ : वाङ्मय पुरस्कार सोहळा

विदर्भ साहित्य संघ, नागपूर आणि देवयानी प्रकाशन,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने देवयानी प्रकाशनाच्या वर्धापन दिनी ज्येष्ठ साहित्यिकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारे २००९-१० चे विशेष वाङ्मय पुरस्कार, प्रदान करण्यात आले.

अनुक्रमणिका

९ मे २०११ : रवींद्रनाथ टागोर यांची १५० वी जयंती

भारतीय साहित्याचे पहिले नोबेल पारितोषिक प्राप्त, थोर साहित्यिक – कलावंत, कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून विदर्भ साहित्य संघाच्या अन्य भाषा साहित्य विभागातर्फे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ह्या कार्यक्रमात सुकुमार चौधरी, रंजना पाठक, चंद्रकांत चन्ने आणि श्याम माधव धोंड यांनी रवींद्रनाथाचे साहित्य, कवित्व व चित्रकला यावर भाष्य केले.

१४ मे २०११ :

कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या १५० व्या जयंती निमित्त विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात 'चित्रलिपी' ह्या उपक्रमांतर्गत फिल्मस् डिव्हिजनच्या सौजन्याने गुरूदेवांच्या जीवनातील विविध पैलूंचे दर्शन घडविणारी व शांति निकेतनची वैशिष्ट्ये असलेल्या अशा दोन चित्रफिती प्रदर्शित करण्यात आल्या.

२८ मे २०११ :

'स्वरमंडळ' हे व्यासपीठ विदर्भ साहित्य संघाने नवोदित गायक व वादक यांना उपलब्ध करून दिले आहे. 'विदर्भ साहित्य संघ', 'नादब्रह्म' आणि 'सप्तक' व 'सृजन' यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. मिलिंद इंदुरकर यांच्या शास्त्रीय गायनाची मैफल विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात झाली. त्यांना संवादिनीवर त्यांचे गुरू जयंत इंदुरकर यांनी संगत केली. तबल्यावर श्री. राम ढोक यांनी तर तंबोऱ्यावर कु. नेहा रामेकर यांनी संगत केली.

११ जून २०११ :

विदर्भ साहित्य संघाच्या 'चित्रलिपी' या उपक्रमांतर्गत दि. ११ जून रोजी शास्त्रीय संगीत आणि वाद्य संगीतातले ज्येष्ठ – श्रेष्ठ कलावंत अहमदजान त्रिरकवा, बेगम अख्तर, पं. रवि शंकर, उस्ताद अमीर खान आणि उस्ताद अल्लारखाँ यांची वृत्तचित्रे प्रदर्शित करण्यात आली.

१८ जून २०११ :

अन्य भाषा साहित्य विभागातर्फे कवि अज्ञेय, बाबा नागार्जुन, फैज अहमद फैज, शमशेर बहादुरसिंग. केदारनाथ अग्रवाल ह्यांच्या जन्मशताब्दीच्या कार्यक्रम श्री. एस. एन. विनोद ह्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

२५ जून २०११ :

'स्वरमंडळ' उपक्रमांतर्गत देवानंद गढीकर, नागपूर यांच्या मृदंग वादनाचा कार्यक्रम झाला.

२६ जून २०११ :

डॉ. उषाताई देशमुख ह्यांचा अमृत महोत्सवी सत्कार सुप्रसिद्ध कथालेखिका सौ. आशा बगे ह्यांच्या हस्ते करण्यात आला. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यावेळी डॉ. उत्तम रूद्रवार (पुसद) , डॉ. सुलभा हेर्लेकर (नागपूर), डॉ. आशा सावदेकर (नागपूर) यांची समयोचित भाषणे झाली. डॉ. गोविंद देशपांडे (यवतमाळ) यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य मदन धनकर (चंद्रपूर) यांना आभार मानले. प्रकाश एदलबादकर यांनी सूत्रसंचालन केले.

अनुक्रमणिका


वि. सा. संघाची प्रकाशने

मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	१६.०० रू.
लोक साहित्य संपदा : संपा. ना. रा. शेंडे	६.०० रू.
आणखी गडकरी : डॉ. मधुकर आष्टीकर	१०.०० रू.
केशवसुत वाङ्मय सूची : सौ. उज्ज्वला आयाचित	१.०० रू.
तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ : डॉ. र. शं. केळकर	४.०० रू.
'प्रातिभ' : प्रातिनिधिक लघुकथा संग्रह (१९८०) संकलन प्रा. ज. रा. फणसाळकर	२०.०० रू.
समग्र बजाबा : संपादन/संकलन – द. भा. प्रधान	२०.०० रू.
हिंदी–मराठी भाषा प्रवेशिका : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	४.०० रू.
ज. के. उपाध्ये यांची कविता (१८८३–१९९३) : संपादन डॉ. आशा सावदेकर	३०.०० रू.
दक्षिणेतील दोन आचार्य : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	५.०० रू.
मराठी गद्य : प्रा. श्री. गो. काशीकर	३.०० रू.
कविता विदर्भाची : संपादक डॉ. सौ. आशा सावदेकर	५०.०० रू.
छंदशास्त्र : एक अध्ययन : कुंदर दिवाण	१०.०० रू.
वसंत वैभव : (कै. व. कृ. वऱ्हाडपांडे) संपादन : डॉ. सौ. कुंदा केळापुरे / डॉ. मदन कुळकर्णी	८०.०० रू.
धन्यतेची थाप (निवडक प्रस्तावना) : डॉ. वि. भि. कोलते	१००.०० रू.
वक्ता दशसहस्त्रेषु : (प्रा. राम शेवाळकर यांची भाषणे) – संपादक डॉ. वि. स. जोग	१२५.०० रू.
अध्यक्षीय भाषणे : खंड १ : संपादक तु. ना. काटकर	७५.०० रू.
अध्यक्षीय भाषणे : खंड २ : संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी	२५०.०० रू.
विविध प्रवाही साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी	२५०.०० रू.
युगवाणी साहित्य सूची : संपादक केशव जोशी	० ७०.०० रू.
युगवाणी साहित्य सूची (पूरवणी) : संपादक केशव जोशी	० ५०.०० रू.
वैदर्भीय साहित्य संघ – अमृत महोत्सवी स्मरणिका (१९९९) संपादन वामन तेलंग	२००.०० रू.
सांजदिव्याचे हंबर – शिवा राऊत (निवडक कविता) संकलन/संपादन : डॉ. आशा सावदेकर / वामन तेलंग	६०.०० रू.
कै. वा. ना. देशपांडे यांचे स्फुट लेखन : ३ खंड : तुलाधर, चित्रगुप्त, त्रिविक्रम (संपादकः प्रा. राम शेवाळकर)	३००.०० रू. (प्रत्येकी)
युगवाणी, माडखेलकर विशेषांक १९९८ : संपादन डॉ. सुलभा हेर्लेकर	४०.०० रू.
कुसुमावती देशपांडे जन्मशताब्दी विशेषांक : (२००४–०५), युगवाणी संपा. डॉ. सुलभा हेर्लेकर	४०.००



चित्र : प्रा. विजय रुद्रकार

अनुक्रमणिका



श्री विदर्भ साहित्य संघ

विदर्भ विषयः सारस्वतीजन्मभूः ॥

मकर संक्रांत १९२३

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

वार्षिक वर्गणी : १५० रूपये

पत्ता :
विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७
फॅक्स : ०७१२-२२८७९४३, २५४००१४

संपादकीय पत्रव्यवहार :
वामनघाट मार्ग, हनुमान नगर,
वणी ४४५३०४, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी : ९८५०५९३०३०
ई-मेल : srushti_ajay@rediffmail.com
yugwanivss@rediffmail.com

अनुक्रमणिका